म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य.
क्र. २०४८.

# प्राचीन मराठी कविता

## खंड ३ रा

संपादक : ज. शा. देशपांडे

REFBK-0015580
REFBK-0015580
मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळाने पुरस्कार दिलेले

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय प्रकाशन

बा. क्र. १५५८०

# प्राचीन मराठी कविता

## खंड ३ रा

### कृष्णदासांची बाळक्रीडा

व

### विष्णुदास नाम्याची चक्रव्यूह कथा

संपादक : ज. शा. देशपांडे

REFBK-0015580

मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय

प्रकाशक :
वासुदेव विष्णु भट
प्रमुख कार्यवाह,
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय
दादर-मुंबई १४

आवृत्ती १ ली : १९६६

किंमत दोन रुपये

मुद्रक :
पु. गो. पाटील
सत्कार प्रिंटिंग प्रेस
अलिबाग, जि. कुलाबा

# प्रास्ताविक

प्राचीन मराठी कवितांच्या प्रथम खंडांत ( १९६२ ) विठ्ठल कळपूरकरांची रासक्रीडा, नामा पाठकांची चंद्रहासकथा, विश्वनाथ कवींचें ब्रम्हांडपुराण व चोंभाच्या उषाहरणाची कांहीं पृष्ठें प्रकाशित केली गेली. द्वितीय खंडांत ( इ. स. १९६४ ) नामा पाठकांची स्फुट काव्यें समाविष्ट झाली. प्रस्तुत तृतीय खंडांत कृष्णदासांची बाळक्रीडा व विष्णुदास नाम्याची चक्रव्यूहकथा ही दोन्ही महानुभावीय स्वरूपाची काव्यें घेतली आहेत. प्रत्येक काव्याबद्दल माहिती व विवेचन निराळे जोडले आहे.

तंजावर येथील सरस्वती महाल ग्रंथालयाचे संचालक व धुळें येथील राजवाडे संशोधन मंदिराचे श्री. द. रा. भट व पुणे येथील भारत इतिहास संशोधक मंडळाचे श्री. तात्यासाहेब खरे यांच्या मदतीमुळे या दोन्ही काव्यांची व माबळभट चरित्राची ( परिशिष्ट ) नक्कल करून घेता आली. लातूर येथील श्री. व. स. तोंडोळीकर यांनी बाळक्रीडेमधील कांहीं स्थानाबद्दल उपयुक्त माहिती दाखवून दिली. तसेंच या खंडाला व पुढील तीन खंडांना महाराष्ट्र सरकारच्या साहित्य संस्कृति मंडळाचें रु. ४१२५ चें अनुदान मिळालें आहे. या सर्व व्यक्तींचे, संस्थांचे व हें प्रकाशन करणाऱ्या मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या संचालकांचे मनःपूर्वक आभार मानतो.

—ज. शा. देशपांडे

रुक्मिणी निवास
पहिली गल्ली, हिंदु कॉलनी
दादर, मुंबई १४.
१५–८–१९६५

# अनुक्रमणिका


पृष्ठें

कृष्णदासांची बाळक्रीडा—

बाळक्रीडा .... .... १

परिशिष्ट ( माबळभट चारित्र ) ... .... ५२

विष्णुदास नाम्याची चक्रव्यूह कथा—

माहिती व विवेचन .... .... ५५

चक्रव्यूह कथा .... .... ५७

शब्दकोश—

बाळक्रीडा .... .... ८४

चक्रव्यूह कथा .... .... ८७

2084 ... 2213...

# शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओवी क्रमांक | छापलेला मजकूर | दुरुस्त मजकूर |
|---|---|---|---|
| २ | २५ | मेरुवाळा[2] | मेरुवाळा[3] |
| ,, | २७ | आम्हाळें तळें[3] | आम्हाळें तळें[5] |
| ,, | — | तळटीप | ५. पंचालेश्वर येथील प्राचीन तळें. त्याचें नांव 'आत्मालय' होतें. |
| ६ | ९८ | तेवं बोल | तवं बोले |
| ८ | १५६ | येस | येसा |
| ९ | १७० | जोहाकरी | जोहार करी |
| १० | १७६ | रुसीमान भा= सुरवी यां | रुसी मानभावो सुरवीयां |
| १२ | २१८ | सभरा भरी | सभराभरी |
| १३ | २४३ | दात्रोदरें | दामोदरें |
| १४ | २५५ | छृतालागी | घृतालागी |
| १५ | २७८ | पाटसा उगे | पाट साउमे |
| १६ | २८६ | काठ वटीं | काठवटीं |
| ,, | २८९ | ही वज्वर | हींवज्वर |
| ,, | २९९ | उपद्रो | उपोद्रो |
| २० | ३५४ | धावो | घावो |
| २१ | — | तळटीप १ | 'स्वकरी' नंतर पूर्णविराम |
| २२ | ४०९ | सवस्वरू | सर्वेस्वरू |
| २३ | ४१३ | दवरायें | देवरायें |
| ,, | ४२२ | ह | हा |
| २९ | — | तळटीप २ | 'मुळांत' शब्द नको |
| ३० | ५५५ | दुजी भेंतुं | दुजीभें तुं |
| ३१ | ५७७ | शास्मा | शास्त्रा |
| ,, | ५८८ | एस | ऐसा |
| ३३ | ६२१ | वंदिल | वंदिला |
| ,, | ६२६ | व्रह्मा | ब्रह्मा |
| ३५ | ६६० | हरजी | हरनी |
| ३८ | ७१९ | ब्रम्ह्मीयानें | ब्रह्मीयानें |
| ३९ | ७३९ | श्रीकृष्ण[3] | श्रीकृष्ण[2] |
| ,, | ७४५ | मागाना[1] | मागाना[3] |

| पृष्ठ | ओवी क्रमांक | छापलेला मजकूर | दुरुस्त मजकूर |
|---|---|---|---|
| ,, | तळटीप १ | सांदिपना | सांदिपनी |
| ४० | ७५७ | कसु | कंसु |
| ४३ | ८१५ | वोहारी | वोहरी |
| ,, | तळटीप | वोहरी | वोहरी |
| ४४ | ८३३ | ताण | तीणें |
| ,, | ८४५ | नीभ्रासिले | नीभ्रांसिले |
| ,, | तळटीप | निर्भविले | निर्भछिले |
| ४७ | ८८८ | चर्णघात | चर्णघातें |
| ५१ | ९८५ | कठिणाये | कठिणा ये |
| ५२ | १२ | गगाचार्य | गर्गाचार्य |
| ५४ | ५८ | काळांचा | काष्ठांचा |
| ५८ | २५ | वेगळ | वेगळा |
| ६२ | १२७ | जम्म | जन्म |
| ,, | १३० | कैरवदळ | कौरवदळ |
| ६५ | १९६ | माहाभारी | माहामारी |
| ६९ | २७४ | मागुता | मागुती |
| ७० | ३१८ | (म) गर | (म) गर : |
| ७४ | ४१८ | अस्वास्थामा | अस्वस्थामा |
| ७६ | ४४८ | प्रार्थ | पार्थ |
| ,, | ४७० | ध्वजतंत्रि | ध्वजस्तंत्रि |
| ७८ | ५१८ | दानकरू | दीनकरू |
| ८१ | ५८८ | अवधियांची | अवघियांची |
| ,, | ५९४ | कनानें | कर्नातें |
| ८३ | ६२१ | अधवा | अथवा |
| ८६ | शब्दकोश | मुडपधसणी | मुडपघसणी |

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. १५५८०

# कृष्णदासांची बाळक्रीडा

## माहिती व विवेचन

बाळक्रीडा हें ९९० ओव्यांचें ओवीबद्ध काव्य तंजावर येथील सरस्वती महाल ग्रंथसंग्रहालयांत M. S. १४३४ या क्रमांकाखालीं नमूद झालें आहे. प्रस्तुत काव्याच्या ओवीला सुरुवात होण्यापूर्वी व नमनानंतर मध्ये अशुद्ध संस्कृत ओळी येतात. त्या खालीलप्रमाणें :—

'नदीनां गोमती तुल्यं कृष्णतुल्य न देवताः ॥
स्वर्गे मृत्ये पाताळे न द्वारकाः समानो परी ॥१॥
अंगनीत्रंग सागरः तस्यावतार पुनः पुनां ।
भुक्ती मुक्ती वायकं तस्यावतारं जनार्दना ॥२॥
कृष्णे ती मंगळं नामं तस्यां वानी प्रवर्तते ।
स्यामपीतचरणांबुज सर्व पाप प्रमुच्यते ॥३॥
कृष्ण कृष्णेति कृष्णेति स्मरंन् नीत्येस्यां ।
जलभीत्वा यथापदा नरकेद् दर्दुरामही ॥४॥

काव्याचें नमन, प्रथम प्रसंगातल्या ओव्या व काव्याची धाटणी यावरून हें काव्य महानुभावीय असल्याचें स्पष्ट दिसतें. याच नांवाचें व या काव्याबरोबर बरेंच साम्य असलेलें एक काव्य 'प्रतिष्ठान' मासिकांत जानेवारी ते एप्रिल १९५८ मध्यें प्रकाशित झालें. त्याचे दहा प्रसंग असून पहिले दोन प्रसंग व तिसऱ्याच्या ४८ ओव्या उपलब्ध नाहींत. पुढच्या उपलब्ध ओव्या ८९८ आहेत. तिसऱ्या प्रसंगाची ४९ वी ओवी प्रस्तुत महानुभावीय प्रतीच्या १५८ ओवीशी जुळते. प्रतिष्ठानमधील काव्याची पूर्ण प्रत सुमारें साडेदहाशे ओव्यांची असावी. तिची शेवटली ओवी "**या ग्रंथाचें महिमान । जो जाणेल सज्ञान । तेणें पापा होय दहन । कृष्णदास मुद्गल म्हणें ॥**" अशी असून तींत कवीचें नांव कृष्णदास मुद्गल असल्याचें नमूद केलें आहे. कृष्णदास मुद्गलांचें रामायणांतील युद्धकांड पाहतां बाळक्रीडेची भाषा कृष्णदास मुद्गलांच्या भाषेसारखी वाटत नाही. साधारणतः महानुभावीतर काव्यांवर महानुभावीय संस्करण चढवल्याचें आढळतें. पण या बाबतींत तसा प्रकार वाटत नाही. तंजावर प्रतीची भाषा व शब्द बरेच जुने असल्याचें दिसून येते व तीच अधिक जुनी व मूलभूत वाटते. प्रतिष्ठानमधील काव्यासंबंधी मराठवाड्यांतील विद्वानांच्याबरोबर पत्रव्यवहार करण्याचा प्रयत्न केला परंतु सहकार्य मिळालें नाही.

तंजावर प्रतींत 'ण' ऐवजी 'न', 'श' ऐवजी 'स', 'द्ध' हें अक्षर 'ध्द' असें अनेक ठिकाणीं आढळतात. जुन्या हस्तलिखिताप्रमाणें 'ख' ऐवजी 'ष' येतो.

अशुद्धताहि फार आहे. अनेक ठिकाणीं अक्षरें व शब्द गळाल्याचें दिसतें. प्रतिष्ठान प्रतींच्या अनुरोधानें शक्य तितक्या दुरुस्त्या केल्या. दुरुस्त्या करणें कांहीं झालें तरी जरूर असल्यानें त्याबरोबर 'ष' ऐवजी जरूर तेथें 'ख' इत्यादि फरक केले. या दोन प्रतींत भिन्नता बरीच असल्यानें पाठभेद देता येण्याजोगे नाहींत. जरूर तेथें उपयुक्त पाठ दिले आहेत. पुणें येथील भारत इतिहास संशोधक मंडळांतले माबळभट चरित्र (परिशिष्ट) बाळक्रीडेच्या ६ व ७ या प्रसंगांशी थोडेफार जुळते त्यांत शेवटीं कवींचें नांव 'कृष्णदास तानो' असें आहे. ही कृष्णदास नांवापुढें जोड कशाची तें कळत नाही.

काव्याच्या पहिल्या प्रसंगांत माहूरचा व दोन तळ्यांचा उल्लेख येतो. माहूर येथें मेरुवाळा हें तळें अजून आहे असें कळतें. या तळ्याचा उल्लेख श्रीचक्रपाणी चरित्रांत आढळतो. 'आम्हाळें' हा शब्द 'आत्माळे' याचें अपभ्रष्ट रूप दिसतें. पंचालेश्वर येथें आत्मऋषीनें निर्माण केलेलें आत्मालय नांवाचें तळें होतें असें 'आत्मतीर्थप्रकाश' या ग्रंथात सांगितलें आहे ('आत्मालये तेया ठेविलें नाम' – ६११). पंचालेश्वर येथें गोदावरी नदी आहे. तिला 'गोतमी' नांव गौतमऋषीवरुन दिलें गेलें. 'गोमती' ऐवजी 'गोतमी' नांव पाहिजे.

कृष्णदास नांवाचे अनेक कवि व व्यक्ती होऊन गेल्या. त्यांची मिळाली तेवढी माहिती खाली देतो—

१) महानुभावीय रुक्मिणी स्वयंवरकार संतोषमुनींचे गुरू कृष्णदास: यांच्याबद्दल माहिती नाही – काल साधारण सोळावे शतकाचा आरंभ – हा ग्रंथ हैदराबादचे कृष्णदास महाराज यांनी नुकताच प्रकाशित केला (इ. स. १९६४).

२) भागवत दशमस्कंधटीका, कृष्ण चरित्र कथा यांचा कर्ता कृष्णदास सामा अथवा सामराज. सोळावे शतक पूर्वार्ध. (मराठी संशोधन पत्रिका – जानेवारी १९५५ व महाराष्ट्र सारस्वत)

३) आदिपर्वकार कृष्णदास दामा – एकनाथ पूर्वकालीन कवि. याच्या काव्याचे कांहीं उतारे व माहिती 'नवें नवनीत' मध्यें दिली आहे.

४) कृष्णदास नामा – याचे एक लहान सुदामचरित्र प्रकरण व त्रुटित विराटपर्वहि आढळतें. कर्णपर्वाच्या एका प्रतींत कवीचें नांव कुठें कृष्णदास नामा तर कुठें विष्णुदास नामा असें येतें. विष्णुदास नाम्याच्या चक्रव्यूह कथेंतहि 'कृष्णदास' असें नांव मधून मधून येतें.

५) कृष्णदास मुद्गल – एकनाथाचे समकालीन 'युद्धकांडाचे कर्तें'.

६) महानुभावीय दिवाकर शिष्य कृष्णदास – यांचे वनपर्व उपलब्ध आहे. हा एकनाथांच्या आसपासच्या कालांत असावा.

७) कृष्णदास डिंभ – सतरावे शतक. या महानुभावीय कवीचें 'आत्मतीर्थ प्रकाश' हे काव्य संपूर्ण माहितीसह कृष्णदास महाराजांनी प्रसिद्ध केलें आहे (१९६३).

८) जयरामस्वामी वडगांवकरांचे गुरु कृष्णप्पा अथवा कृष्णदास.

९) 'सीमंतकहरण' काव्य कर्ता केमा कृष्णदास – याचा उल्लेख भाव्यांच्या महानुभावीय ग्रंथसूचीत येतो.

१०) दत्त विजय कर्ता कृष्णदास – महानुभावीय ग्रंथसूची.

११) कृष्णदास कवि धावडेकर दत्तराज गुरु– महानुभावीय ग्रंथसूची.

१२) कृष्णदास जयराम – पदें असून महानुभावीय.(महाराष्ट्र सारस्वत).

१३) कृष्णदास बैरागी — मूळ नांव एकनाथ धर्माधिकारी-ग्रंथ चैतन्यलीला. अठरावें शतक (महंत कृष्णदास बैरागीकृत चतुःश्लोकी भागवतावरील निरूपण. श्री. वा. सी. बेंद्रे, १९५५ व तुकाराम महाराजांची गुरुपरंपरा– श्री. वा. सी. बेंद्रे, १९६०. पहिल्या पुस्तिकेंत पांच प्रसंग आहेत.)

१४) कृष्णदास पंडित — संत कवि काव्य सूचीत उल्लेख.

१५) कृष्णदास गोविंद — ,, ,, –अश्वमेध. बाळक्रीडा, रासक्रीडा इत्यादि ग्रंथ-काळ १६८०–१७३०

हरिदास कान्हा शिष्य हरिदास सूत कान्हा याचा पुत्र कृष्णदास याची भागवत दशमस्कंधावर टीका आहे. हे दोघे एकच असण्याचा संभव आहे. ११ अध्यायाचे व ३७१ ओव्यांचें एक बाळक्रीडा काव्य एका बाडांत आढळतें. हें काव्य जुनें नाहीं. हा कवीदेखील कृष्णदास गोविंद असण्याची शक्यता आहे.

१६) एकनाथ चरित्रकार कृष्णदास जगदानंदन —(म. सा.).

१७) दामोदर गणेश जोशी ऊर्फ कृष्णदास — अठरावें शतक
(महाराष्ट्र कवि चरित्र)

१८) पदें करणारा कृष्णदास — काव्यसंग्रहांत याची पदें आहेत. हा दुसऱ्या बाजीरावाचा समकालीन दिसतो. महाराष्ट्र सारस्वतांत सुदाम चरित्रकार कृष्णदासांचा उल्लेख आहे. या काव्यांत आर्या व वृत्ते वापरलेली दिसतात.

वरील कृष्णदासापैकी (१) खेरीज बाळक्रीडाकर कोणी असावेतसे दिसत नाहीं. संतोष मुनींच्या गुरु कृष्णदासाबद्दल माहिती नसल्यानें त्याबद्दल कांहींच ठरवता येत नाहीं. बाळक्रीडेचे हस्तलिखित इ. स. १६५१ चें आहे. भाषा, घाटणी वगैरे लक्षांत घेता हें काव्य नाथपूर्वकालीन वाटतें. हें भागवत दशमस्कंध टीकेचा भाग असावा असें काव्याच्या शेवटानंतरच्या नोंदीवरून वाटतें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम......६५६८० ... वि: ......८।१।८१
क्रमांक ......२०४८ ... नों दि......२२।३।८१

# बाळक्रीडा

॥ श्री ॥

श्रीपरेशायेनमः ॥ श्रीकृष्णायेनमः ॥ श्रीदत्तात्रेयेनमः ॥ प्रथम नमु विघ्नहरा ॥ जो प्रीतीचा सोईरा ॥ तो अव्यक्त परा ॥ परा तो व्यक्त जाला ॥ १ ॥ जो म्या नमीला गणपती ॥ तो सकळ गणांचा चक्रवर्ती ॥ मुक्तीफळे घेउन हातीं ॥ वाट पाहे भक्ताची ॥ २ ॥ तो गणराज नमीला ॥ नटारंभी खेळतु देखीला ॥ नानारूपें नटला ॥ मायावेषें ॥ ३ ॥ ये सृष्टीचीये आंगणी ॥ विनायिकें घेतली अवगनी ॥ राक्षस खडे झाडुनी ॥ भूमीका चोखाळिली ॥ ४ ॥ साधुसंतातें स्थापिलें ॥ तयातें आपुलें दाखविलें ॥ तेणें रुपे निवाले ॥ ठाकले पाहतांचि ॥ ५ ॥ सुलक्षनीक सुंदर ॥ रूप नटले मनोहरः यैसे अनंत अवतारः पालटु दावी ॥ ६ ॥ जें सोगयें (?) भृष्टी रंगनी ॥ ते करी संपादनी ॥ निज भक्त देती वोवाळणी ॥ जीव जोती रत्नें ॥ ७ ॥ श्रीमुखें नांव वानुनी ॥ तयासी मोक्षपद सांगोनी ॥ आचार पेठवनी घेउनी : कोडी गुणा देतु असे ॥ ८ ॥ यैसा युगानयोगी संभवतु ॥ येकलाची जाला बहुतु ॥ तो नांदतुसे संततु ॥ निजधामीं ॥ ९ ॥ तो गणराज गणपती ॥ म्या नमीला अल्पमती ॥ अभय करू ठेवुनी मस्तकी ॥ कृपादान दिधले ॥ १० ॥ तो कृपासिंधु मायेबापु ॥ सर्व भूतीं व्यापकु ॥ तेणें मस्तकी ठेउनी हातु ॥ मतीप्रकाश दीधला ॥ ११ ॥ आतां नमु सारजा शक्ती ॥ जे चराचरा जीयेचा हातीं ॥ ते अनंत खेळत असे खेळती ॥ मती ईश्वराचीया ॥ १२ ॥ ते जीवजातां हंसवहनी ॥ वीणा पुस्तक करी घेउनी ॥ ते नमीली जीवसंभवनी ॥ चैतन्यमाया ॥ १३ ॥ तीयेसी नमस्कार करुन ॥ मग वंदु श्रीगुरुचे चरण ॥ तेणें अज्ञानअंधकार फेडुन ॥ उजळीला ज्ञानदीपकु ॥ १४ ॥ तया श्रीगुरुचा उपकारू ॥ कोडी जन्में मीं नव्हे निस्तरू ॥ पाहातां सान मेरू ॥ अगोचरिया महिमेसीं ॥ १५ ॥ तया श्रीगुरुचे वचन ॥ तेंची मीया करुन अंजन ॥ मग देखिले नीर्वान ॥ श्रीदत्तात्रें माउली ॥ १६ ॥ तो नमु श्रीगुरु ॥ मग साधुसंता नमस्कारू करूं ॥ जेहीं नमीला ईश्वरू ॥ तया नमन कवेश्वरा ॥ १७ ॥ जे जे अनुसरले भगवाना ॥ नमन तयांचेया चरणां ॥ आईक तयापरीस तयां सज्ञाना ॥ नमन माझे ॥ १८ ॥ जे धर्म-

परायण ॥ भूतकृपा आंतक्रन[१] ॥ आचार्ये सुवीद्य ब्राह्मण ॥ तयासी नमन माझें ॥ १९ ॥ आणि वैश्य क्षेत्री सूद्रादीक ॥ आणि कांहीं याती अनेक ॥ जे जे जाणती ब्रम्हसुख ॥ तयासी नमन माझें ॥ २० ॥ आतां समस्तां नमस्कारु करुनी ॥ मग नमीन चक्रपाणी ॥ जो अनुसयाकर-रत्नी ॥ अवतारू केला ॥ २१ ॥ तो अत्रीनंदनु । प्रथम योगीया अवत्रोनु ॥ उद्धरिला भक्तीजनु ॥ श्रीदत्तवेषें ॥ २२ ॥ जो अविनाश अपरांपरू ॥ तो केवि जाला साकारू ॥ कुतायौगीचा आचारू ॥ पाहावया भक्ताचा ॥ २३ ॥ तो प्रथम योग पवित्र ॥ म्हणौनि तो अमोघ अवतार ॥ सकळ देवांचा दातार ॥ तो श्रीप्रभुरावो ॥ २४ ॥ कृत त्रेत द्वापार काळी ॥ तो अद्यापी खेळे भूमंडळीं ॥ स्नान करी प्रातःकाळीं ॥ मेरूवाळा[२] ॥ २५ ॥ माध्यानी माहोरा[२] भीतरी ॥ अवधूतवेषें भिक्षा करी ॥ खेळु क्रीडा पंचाळेस्वरीं ॥ नित्य खेळें ॥ २६ ॥ आम्टाळें तळें[३] ॥ तेथें प्रतिदिनि क्रीडा खेळें ॥ गोमती[४] तीये वेळे ॥ तेथें नव्हती ॥ २७ ॥ तीसी यावया हेची कारण ॥ द्यावया दत्तात्रयांचे दरूषण ॥ सायंकाळीं निद्रास्थान ॥ करिती रुसीमाजी ॥ २८ ॥ अवधूतवेषें खेळती ॥ भ्रमण प्रतदिनी करिती ॥ तो अवतरला आदीमूर्ती ॥ श्रीसर्वेश्वरू ॥ २९ ॥ तो योगीयांचा वेळाईतु ॥ आणि भक्तांसी भुक्ती मुक्ती देतु ॥ यैसा ये सृष्टीमध्ये खेळतु ॥ अद्यापवेन्हीं ॥ ३० ॥ तयांचयां स्मरणें ॥ धुरुस आढळ पद दीधले जेनें ॥ तो नमिला सुद्ध अंतक्रनें ॥ श्रीदत्तात्रेयोः ॥ ३१ ॥ तो भुक्तीमुक्तीदायकु ॥ त्यांची सरी न पवे अवतारू अन्यकु ॥ तो नमिला भावपूर्वकु ॥ रावो सैंहाद्रीचा ॥ ३२ ॥ तो आरळकुतापहरू ॥ मदळसे देउनी अभय करू ॥ तो रेणुकेचा दातारू ॥ यैसे पुराणें बोले ॥ ३३ ॥ करुनी साष्टांगी नमस्कारू ॥ माझा मस्तकीं ठेविला अभयंकरू ॥ तेणें कवीतामती जाला विस्तारू ॥ भवसागरू तारावया ॥ ३४ ॥ पुढीलें कथेचा प्रकाशु ॥ सांगीजेल सुरसु ॥ आतां उद्धरीजैल वंसु ॥ यादवांचा ॥ ३५ ॥ कृत त्रेत जालयां उपरी ॥ पवित्रा द्वापाराभीतरी ॥ कैसे अवत्रले मुरारी ॥ भक्त उद्धरावया ॥ ३६ ॥ धन्य धन्य ते उतर दिसा ॥ येणें जाले ऋपीकेषा ॥ ते पूर्व कथा परियेसा ॥ कृष्णदासु सांगतुसे ॥ ३८ ॥ प्रसंग पहिला ॥ १ ॥

१ अंतःकरण

२ माहूर.

३ माहूरमधल्या तळ्याचे नांव असावे.

४ गोदावरी.

## ॥ प्रसंग २ ॥

तेयें यमुनेचा तीरीं ॥ माहा विस्तीर्ण मथुरा नगरी ॥ तेथें राणा राज्य करी ॥ दैत्य कंसासुरु ॥ ३८ ॥ तो गहन प्रचंड ठावो ॥ तेथें कंस केसीया महाबाहो ॥ अक्रूर मंत्री या रावो ॥ आचारवंतु ॥ ३९ ॥ त्या नगराची महंतता ॥ सांगता विस्तारी जाईल कथा ॥ पृथ्वीचे रायें समस्ता ॥ वोच-कल देखोनीयां ॥ ४० ॥ हाटवटिया चौवारे ॥ तेथें नांदती वेव्हारे ॥ दुकानें आवधी मंदिरे ॥ काश्मीराची ॥ ४१ ॥ येकवीसा खणावरी ॥ पाहाती राजकुमरी ॥ मृदंग काहाळा घरोघरी ॥ शिवपुजा करिताती ॥ ४२ ॥ ते शिव भक्त दारुण ॥ नगरी कुळ देवताचीच आन ॥ सकळां इसुतीचर्चन[1] ॥ कस्तुरीचें ॥ ४३ ॥ कंठी रुद्राक्षाच्या माळा ॥ हरीजागरणें घरोघरीं सकळां ॥ आचार विध सकळां ॥ शिवभक्तीचा ॥ ४४ ॥ यैसी ते शिवनगरी ॥ वेद-ध्वनें घरोघरीं ॥ राहाटपाट दारोदारीं ॥ श्रींधारवाडीयासी ॥ ४५ ॥ हे वाहेरील नगर ॥ तेथे लोक नांदती अपार ॥ रायाचे दुर्ग प्रचंड थोर ॥ तयाचें नांव मालखंडा ॥ ४६ ॥ तया मालखंडेयाचा विस्तारु ॥ बारा गावांचा भोंवता फेरु ॥ उंच यौजनें येरू गंभीरु ॥ आगड तीन भोंवताले ॥ ४७ ॥ ते आगडी—संयेभ[2] उदक ॥ भीतरी होडी नावा अन्येक ॥ लोक खेळती कवतीक ॥ यमुनेमाझारी ॥ ४८ ॥ ते येमुनाची विस्तारली ॥ सैाभोवती बांधली ॥ तीची पाहातां खोली ॥ मनें कल्पवेना ॥ ४९ ॥ तया भीतरीले पौकळी ॥ झेंपावती आकाश पोकळी ॥ हुडेहुडां झळाली ॥ पताका [3]पगरें शौर्याची ॥ ५० ॥ दुसरी पोकळीचा विस्तारू ॥ तो लोहोबांध अपारु ॥ तीसरी मनोहरु ॥ रत्नेंजडीत ॥ ५१ ॥ ते फटिकांची बांधनी ॥ सोमकांत खणोखणी ॥ हुडेंहुडा खेवनीं ॥ हिरेमानीकाची ॥ ५२ ॥ तैस्या तीन पौवळी तीन आगड ॥ तयांसी दारवठें सातसात माहा प्रचंड ॥ पानदरी उदंड ॥ लोकांस वावरावया ॥ ५३ ॥ तया भीतरी राणीवंसा ॥ ते कंसाचे निज मंदिर परियसा ॥ कांचनीबंध भूमीका सायासा ॥ भीतरी भावी[4] कास्मीरे बांधलीया ॥ ५४ ॥ येकवीस खणांची दामोदरें ॥ रत्नेंखचितें मंदिरें ॥ खांबी पुतळीया मयोरें ॥ झळकुंवे मोतीयांचें ॥ ५५ ॥ सोम-कांताचीं बाळानी ॥ कळस सोनियाचे गगनी ॥ आंतुले मंदीर धुपैानि ॥

---

१ विभूति, राख

२ स्वयंभु

३ फरारे

४ बावी

परिमळे दर्वताती ॥ ५६ ॥ आंगणी नागचांपेयांची झाडें ॥ मयोरें क्रीडा करिती चहुंकडे ॥ जाईजुईचे मांदाडे ॥ झेंपावती ॥ ५७ ॥ दिवसु गेलीया अस्तमाना ॥ वीर करितातीं साहना ॥ दुर्गाभोंवती प्रदक्षणा ॥ माहावीरांची ॥ ५८ ॥ आतुर्वळीये नीसांचर ॥ हांकी गर्जवीती आंबर ॥ तेथें दुष्ट तस्कर ॥ बोलोंचि नये ॥ ५९ ॥ खर्गे झळकती वीरांकरीं ॥ ढोल दमामे संखभेरी ॥ रणसींगे काहाळा मोहोरी ॥ गीडीबीडीयां लेख नाही ॥ ६० ॥ यैसा हा मालखडा ॥ काळ जैसा ॥ ६१ ॥[1] कवणें येके दिवसीं ॥ रावो बैसला सभेसी ॥ बंधु केसिया भुजेसी ॥ दृष्टीसी प्रधान आक्रूरू ॥ ६२ ॥ कंसाचे आंगल (ग) वीरु ॥ माल मुष्टीक चानोंरू ॥ कागबगु आघासुरू ॥ यमळा आर्जुणु ॥ ६३ ॥ ताडमाडा सुरु ॥ धेनकु रीठासुरू ॥ गंधासुरू आसुरू ॥ रजकु बळीयाडा ॥ ६४ ॥ हें आंगलग वीर दारून ॥ गर्वी चढीनले अती गहन ॥ त्या स्त्री पुरुष त्रुणासमान ॥ मेरू ठेंगणा ॥ ६५ ॥ सर्वांगी चंदनाचिया उठी ॥ कस्तूरीचे टिळे ललहाटी ॥ रुद्राक्षाच्या माळा कंठी ॥ हातीं काळगदा ॥ ६६ ॥ येकांसी इभूतीचे उधळणें ॥ येकांसी वाघ्यांवरे[2] पेहेरणें ॥ येकीच जालीं रातांजनें ॥ येकासी कंगाल राधावळी ॥ ६७ ॥ गुंजावर्नं डोळे बाबर झाटी ॥ येकी बांधलीया वीरगुंठी ॥ येकी भाते बांधोनियां पाठिसी ॥ शीते टनत्कारिती ॥ ६८ ॥ फरशीया तोमर भाले ॥ येक मुदगल घेतले ॥ चरणीं तोडर बांधले ॥ हातीं रत्नकांकणें ॥ ६९ ॥ ते बैसले कंसासमोर ॥ त्यावेगळे वीर आपार ॥ ते बोलती बडिवार ॥ म्हणती मेरू उलथुं आतां ॥ ७० ॥ यैसे येकाहुनि येक आगळे ॥ सात लक्ष सेजीं बैसले ॥ येक उभे राहिलें ॥ त्यासी गणित नाहीं ॥ ७१ ॥ येकांवरी छेत्रें येकवटें ॥ येकावरी ढळती कनक दंडें ॥ माथा मुगुट भया-सुर तोंडें ॥ दाढा विक्राळा ॥ ७२ ॥ येक मृडींवां मीसीयांचे ॥ येक गुंजावर्नी डोळयांचें ॥ येक आटीवां भुजांचें ॥ आजानबाहो ॥ ७३ ॥ जैसे लोहाचे पुतळे ॥ तैसे येकाहुनि येक आगळे ॥ ते संमुख उभे राहिले ॥ दोहीं विभागीं ॥ ७४ ॥ राये येताती बोळगे ॥ भार दावीताती वेगें ॥ कुंजर भार दोही आंगें ॥ वाजंत्रा लेख नाही ॥ ७५ ॥ यैसी सभा घन दाटली ॥ वरी छत्रांची पडे साइली[3] ॥ बैसका ठाई वाटिली ॥ तया सांगणें नलगे ॥ ७६ ॥ ऐसें नव कोडी महावीरा ॥ चौरांसी लक्ष कुंजरा ॥ साटी कोडी रहिवारा ॥ वारू पंचवीस अर्बुजे ॥ ७७ ॥ पांच शतें माळजेठी ॥ ते मुष्टीकां चानोराचे पाठीं ॥ धनुवाडें नव कोडी ॥ लक्ष साटी वोडन या ॥ ७८ ॥ ते बैसले आपुलालीये

---

१ ओवी पूर्ण नाहीं.

२ व्याघ्रांवर असा शब्द असावा.

३ साउली.

स्थानीं ॥ तवं कळावंतें उठिली झडकरुनी ॥ मंजुळराग आळउनी ॥ गाती वाणी नाचत्याती ॥ ८९ ॥ तयासी देउनि पेठवनी ॥ तवं आणीके उठिली ततक्षणीं ॥ तयासी देउनी वह्नु डावनी ॥ तंव आणीक वाट पाहतातीं ॥ ८० ॥ ऐसा समयो वर्तला ॥ तंव कंस केसीया असे बैसला ॥ ते समई देखता झाला ॥ आपुलीया परिवारातें ॥ ८१ ॥ मग मनी विचारी ॥ म्हणें मीच येकु ये सृष्टीमाझारी ॥ मजसीं घे झुंझारी ॥ ऐसा वीरूची नाहीं ॥ ८२ ॥ मज कोपलियां कंसासुरा ॥ आणीक बंधु केसीया दुसरा ॥ आणि प्रधाना अक्रुरा ॥ जोडाचि नाहीं ॥ ८२ ॥ मजसी मेळवी हातफळी ॥ यैसा क्षेत्रीया नाहीं भूमंडळी ॥ येक वेगळा चंद्रमौळी ॥ येर सामान्ये भुपाळ ॥ ८४ ॥ य मर्त्यलोकीचे भूपाळ ॥ ते मीं जाणत असे सकळ ॥ आणीक पाहतां पाताळ ॥ तेथें नागकुळावांचौनी नाहीं ॥ ८५ ॥ तयासी कर ना चरण ॥ तयांचे जाणे मीं वर्म मरण ॥ आणि स्वर्ग भुवन ॥ तेथें इंद्रची वळियाडा ॥ ८६ ॥ तरी तयांहुनी काई मीं उना ॥ माझे मरण मज आध्याना ॥ ते सख्र केले म्यां जतना ॥ आतां कवणा काय करवैल ॥ ८७ ॥ जऱ्ही जाला हरी हरू ॥ तरि त्यासी केवी आतुडे शस्त्रु ॥ जऱ्हीं जाले वज्रु ॥ तरि मज काये करूं सकें ॥ ८८ ॥ आणि बंधु माझा केसीया ॥ त्रिलोकु ठेंगना तया ॥ आणीका वीरां प्रतापियां ॥ लेख नाहीं ॥ ८९ ॥ माझा चानोर मुष्टीकु ॥ तो आंगउं सके मृत्यूलोकु ॥ आतां कवण असे नायकु ॥ जो मज पडखळील ॥ ९० ॥ यैसे विचारूं लागला ॥ माहा गर्वा चढीनला ॥ पुढां वीर भारू देखिला ॥ जैसे का माहाकाळ ॥ ९१ ॥ प्रसंग दुसरा ॥

## प्रसंग ॥ ३ ॥

यैसे विचारी मानसी ॥ तंव आश्रीनी[1] बोलिली आकाशीं आरे कंसा परियेसी ॥ सांडी गर्व पद ॥९२॥ आरे तुझी देवकी वहिन ॥ तीली पुत्र होईल जाण ॥ त्याचेयां हातें मरण ॥ पावसील तुं ॥ ९३ ॥ तो तुझा करिल संहारू ॥ बंधुसहित सकळ वीरु ॥ हे आश्रीणी बोलोनी उत्तरु ॥ सर्वेची आदृश्य जाहली ॥ ९४ ॥ तो शब्दु आईकिला सकळा जनीं ॥ मग रावो खोचला आंतऱ्नी ॥ ते व्हेळे कांपीनली धरणी ॥ दीसा कानवडलीयां ॥ ९५ ॥ तटस्त राहिले सकळ वीर ॥ गर्वा जाला परिहार ॥ न पुसती उत्तर ॥ येकमेकासी ॥ ९६ ॥ मग रावो म्हणें केसीया वीरा ॥ आणि प्रधाना

१ अशरीरिणी.

आक्रुरा ॥ यासी कांहीं प्रतिकार करा ॥ चुकवा मरणा तें ॥ ९७ ॥ तवं बोल मंत्रीया सिरोमणी ॥ देवकी वसुदेव आणावी धरुनी ॥ त्यांसी बंधन करुनि ॥ रक्षणें ठेविजे ॥ ९८ ॥ येक म्हणती रायास आनो हित ॥ ते वहिणीचे कायसें कवतीक ॥ मग पाठउनि दूत ॥ उभी वरें आनविली ॥ ९९ ॥ मग दोघां जोडुनी सांखळा ॥ थोरी केली आवकळा ॥ वंधी घातली ते वेळा ॥ निवंध रक्षणाईते ठेविले ॥ १०० ॥ येमळार्जुनु पीपळु जाला ॥ तो ते आंगणी उगवला ॥ त्यांवरी कागासुरु बैसला ॥ द्वारी राहिला गंधर्व ॥ १०१ ॥ पींपळें झडझडावें ॥ कागासुरें गर्जावें ॥ गंधर्वे भुंकावें ॥ ते आइकावे माहाद्वारी ॥ १०२ ॥ तेथें ठेविली जेंगटें ॥ ते पीटूनि कीजे बोभाटे ॥ कोण होतां येकवटे ॥ इतुकाजनीं गर्जावें ॥ १०३ ॥ हे परिसोनु कंसासुरु ॥ त्यां बाळकांचा करी संव्हारु ॥ यैसा संप्रधारु ॥ केला तिये वेळे ॥ १०४ ॥ तंव रावो म्हणे वरें जाले ॥ आतां विघ्न टळले ॥ भाट वंधीजन सुखीया केलें ॥ धन वांटिलें ब्राह्मणासी ॥ १०५ ॥ सकळांसी आनंदु जाला ॥ म्हणती हा विचारु बरवा केला ॥ १०५ ॥ रावो मरणा चुकविला ॥ आतां भये नाहीं ॥ १०६ ॥ मग (स)भा वीसर्जली ॥ सकळां पेठवणी जाली ॥ पुढां कथा कैसी वर्तली ॥ ते सांगैल कृष्णदासु ॥ १०७ ॥ प्रसंग तिसरा ॥

॥ समाप्त ॥

## ॥ प्रसंग ॥ ४ ॥

यैसे वहुतेक दिवसु कर्मलें[1] ॥ म्हणती रायाचें विघ्न चुकलें ॥ तव देवकिये गर्भ राहिले ॥ जाली गरोदरी ॥ १०८ ॥ मग जाणविले दैत्यानाथा ॥ सावचित केले रक्षणाईता ॥ नव मास कर्मले आतां ॥ प्रसुतकाळ प्रवर्तला ॥ १०९ ॥ तवं देवकीये पुत्रु जाला ॥ मग पींपळ झडाडीला ॥ कागासुर गार्जिनला ॥ भुकों लागला गंधर्उ ॥ ११० ॥ यैसा करुनियां बोभाट ॥ तवं पीटी माहाद्वारी जेंगट ॥ तो आईकोनी दनदनाट ॥ कंसरावो धांवीनला ॥ १११ ॥ हाकु देतसे गगनीं ॥ तेणें थरारीली मेदनीं ॥ तंव नगरलोक ततक्षणीं ॥ महावीर धांवीनले ॥ ११२ ॥ तंव कंसासुरें काय केलें ॥ ते बाळक दृष्टी देखिलें ॥ मग धांवोनी चरणी धरिलें ॥ ते उर्चालिले आकाशी ॥ ११३ ॥ महा प्रचंड द्वारी सीळा ॥ तियेवर आपटिले तया बाळा ॥ जैसा का खडकी भोंपळा ॥ ठीकरीया होये ॥ ११४ ॥ मारुनी तया बाळकासी ॥ मग संतोष जाला सकळा नगरासी ॥ हाकु फुटली आकाशीं ॥ आनंदे गर्जतु

१ क्रमिले

असे ॥ ११५ ॥ म्हणती राजो विजया जाला ॥ नगरी उछावो प्रवर्तला ॥ मज सर्वसा मानीला ॥ आतां भय नाहीं ॥ ११६ ॥ आतां जें उपजैल लेंकरू ॥ त्याचा करूं संहारू ॥ यैसा जाला निर्धारू ॥ राया आणि सकळिकासी ॥ ११७ ॥ यैसें जें उपजें तें मागीत जाये ॥ कांहीं कनव रायासी ना ये ॥ थोर दुःखीये वापुसाये ॥ तया बाळकावीसीं ११८ ॥ यैसे तेणें सात गर्भ मारिलें ॥ तेणें बहुत दिवस कडे लागले ॥ कंसें संतोषु मानिलें ॥ आनंदें मनामाजी ॥ ११९ ॥ तंव कवणे येके दिवसीं ॥ दुःख वाटले वसुदेवा देवकीयेसी ॥ तेणें दुःखें जाली पीसीं ॥ दोघे जणें ॥१२० ॥ रोजना करिती टळमळां ॥ म्हणती मारितो माझीया बाळा ॥ आणी दुसरी भोगितों आवकळा ॥ पांई सारवळा बंदीखानी ॥ ॥ १२१ ॥ मग वसुदेव बोलिला ॥ आतां मीं प्राण तजीन आपुला ॥ बहुत दुःखें आरंबळला ॥ नेघें आन्न उदक ॥ १२२ ॥ आसवपात न तुटती दोघांचा नेत्रीं ॥ तवं प्रवर्तली रात्री ॥ मग येकांता जाउनी वसुदेवाची आस्त्री ॥ करी धांवा धरत्रीचा ॥ १२३ ॥ मग सुश्नात होउनी ॥ सोवळे नेसली ते जननी ॥ करसंपुष्ट जोडुनी ॥ विनविती जाली ॥ १२४ ॥ वसुदेवें दुःखें निद्रा केली ॥ सकळ नगरी नीजैली ॥ ते समई देवकी काय करिती जाली ॥ दुःखें उचंबळलीं ह्रदे[1] ॥ १२५ ॥ साष्टांगीं घालुनी दंडवतु ॥ अवो धरत्री ये माये मांडला आकांतु ॥ भ्रतार करिल आत्मघातु ॥ ते न देखवे मज ॥ १२६ ॥ अवो माये वीस्याळे ॥ तुजवरी उपटिली माझी बाळे ॥ येणें कंसासुरें चांडाळें ॥ आम्हां आकांत मांडिला ॥ २७ ॥ अवो माये मेदिनीं ॥ तु जगत्रजननीं ॥ मी परदेसीनी ॥ अनाथनाथें ॥ १२८ ॥ आवो माये वीसंभरें ॥ अंबिके जगदाधारें ॥ सकळ हे तुजची आधारें ॥ देव आदी करूनी ॥ १२९ ॥ सकळ सामाविसी उदरीं ॥ म्हणौन जगत्रजननी कुमारी ॥ सकळै भार तुजवरी ॥ म्हणौनी वीस्वंभरा तु ॥ १३० ॥ मळसूत्र सेळउनी ॥ म्हणौनी नांव साजे मेदनीं ॥ तीन्हीं लोक राखिलें धरुनी ॥ म्हणउनी धरत्री नांव तुझें ॥ १३१ ॥ हा भूतासनु करीतसे होळी ॥ म्हणउनी नांव तुझे भूतळी ॥ तुझीं वहनें पाताळीं ॥ शेष कूर्म वऱ्हाह ॥ १३२ ॥ तुजपासुनी जगा जीवन ॥ म्हणौनी नांव साजे संजयेन ॥ सप्त समुद्र तुजपासुन ॥ म्हणौनी सीध-वहनी नांव साजें ॥ १३३ ॥ जगासी उत्पत्ती तुजपासुनी ॥ म्हणौनी नांव जगत्रजननी ॥ चौदा भुवनें धरुनी ॥ वसीजे भूतळीं ॥१३४॥ च्यारी खाणी चारी वाणी ॥ चौऱ्यांसी लक्षें जीवा यौनी ॥ पर्वत मेरू आदी करुनी ॥ समुद्र सरीता तुज माजी ॥ १३५ ॥ गणित नाहीं अरूप आकारा ॥ माहा ढीसाळ

१ ह्रदयीं

तु सुंदरा ॥ तुं गाइत्री म्हणउनी वसुंधरा ॥ त्रिचरण दश कर ॥ १३६ ॥ ऐसी तुं अपरांपरे ॥ आदी शक्ती नीराकारें ॥ अवतार धरिले सर्वेश्वरें ॥ आणंत तुजवरि ॥ १३८ ॥ तु कवणासी नुवरेसी ॥ कवण्याकाळीं न वीक्त-रेसी[1] ॥ तु जरी रुवरेसी ॥ तरी हे जगत्र कैंचें ॥ १३८ ॥ तुवां विश्वासा मांडिलें उदरीं ॥ तरि माझा सांभाळ कवण करी ॥ आतां मज पावे झड-करी ॥ अनाथनाथे तुं ॥ १३९ ॥ आतां तु दोनी भाग होई ॥ आणि मज उदरी ठावो देई ॥ कीं म्या पूर्वी पाप केलें कांहीं ॥ म्हणौनि मज आव्हेरीलें ॥ १४० ॥ काय म्या गुरुनिंदा केली ॥ कीं मायबापें दुःखविली ॥ कीं आस्त्रीरीतु चुकली ॥ परद्वार करितां ॥१४१॥ काय म्या विश्वासघात केला ॥ कीं मज गोत्रवधु घडला ॥ कीं ब्रह्म दोप घडला ॥ म्हणौनी मज ऐसे जालें ॥ १४२ ॥ कीं साधु संताची निंदा केली ॥ सुपात्री दान नाहीं दिधली ॥ कीं जे निरोपीली वडीली ॥ ते मी न करीची ॥ १४३ ॥ येक तस्कर वाट पाडिती ॥ येक पारधी करूनी पोटें भरिती ॥ ते हरणी पाडसा वीघडनी करीती ॥ ते काइ मज घडलें असैल ॥१४४ ॥ कीं जाळें टाकुनी जळी ॥ कीं आवेश लाउनि गळी ॥ कीं गौग्रास जाळी ॥ तेणें पाप ऐसें जालें मज ॥ ४५ ॥ कीं द्वारासी अतीतु आला ॥ तो म्या असैल वोभावीला ॥ कीं म्या वेव्हार खोटा केला ॥ धर्मसभे वैसोनियां ॥ ४६ ॥ कीं फासे मांडुनी पक्षकुळा ॥ तडातोडी केली त्याचीया बाळा ॥ म्हणउनी मज ऐसी अवकळा ॥ करूनी दुःख भोगीले ॥ ४७ ॥ कीं हरिकथा सांडुन ॥ केले म्या वेस्यागमन ॥ कीं महातीर्थे सांडुनी ॥ गेलीये भूतां पुजुं ॥ ४८ ॥ कीं सांडुनी हरि जागरू धूपारती ॥ पाहों गेलियें गळवोशदी ॥ कीं चाहाडी करुनी वंधी ॥ घातले आसैल कवनासी ॥ १४९ ॥ कीं मी वाचेन मनेंची परमेश्वरू ॥ करी मीं भूतांचा उचारू ॥ कीं घेतला असैल मंत्रु ॥ लाव-काचा ॥ १५० ॥ कीं मीं चुकलियें परमेश्वरभक्ती ॥ म्हणौनी हें मीं पाव-लीयें दुःखप्राप्ती ॥ तो अपराध न धरावा चित्तीं ॥ कृपावसें पाव माये ॥ १५१ ॥ यैसा दुःखे धांवा करितां ॥ पावली ते जगत्रमाता ॥ मग शब्द बोलिली अवचिता ॥ नाभी वो नाभी म्हणतसे ॥ १५२ ॥ मग म्हणें मीं पावलीये मेदिनीं ॥ येरी लागली तीचा चरणीं ॥ म्हणें मीं प्रसन्ने जाहालीये झडकरुनी ॥ मागें वरू ॥ १५३ ॥ तव देवकी म्हणें तु पावलीसी ॥ तरी माझे दुःख तुं काय नेणेंसी ॥ आतां माये तु जाणसी ॥ तेंची करीं ॥ १५४ ॥ तंव ते म्हणें मीं जालीये प्रसन्न ॥ तरी का न मागसी वरदान ॥ येरी म्हणें मीं मागैन ॥ ते मज देई माये ॥ १५५ ॥ जे यैस

१ व्यक्त होसी ?

मज पुत्र देई ।। या कंसासुराचे न चले कांहीं ।। आणि उधरावया कुळे दोहीं ।। यदुरूं आणि क्षेत्रिया ।।५८[1]।। तंव धरत्री म्हणे हा कंसासुरू ।। यासी जिणें यैसा नाहीं वीरू ।। आणि उपजलें लेंकरू ।। मारीत असे ।।१५७।। यैसा कवणु असैल ।। जे उपजतांची जुंझेल ।। आणि पवाडे करील ।। उद्धरील दोहीं कुळा । १५८ ।। तरी स्वर्ग मृत्य पाताळीं ।। येसा कवणी नाहीं बळी ।। जो उपजतां ग्वंदळी ।। जीनेल कंसा ते ।। १५९ ।। हा कंसासुरू दारुण ।। त्यासी महादेवो प्रसन्न ।। हा जितोराकें त्रिभुवन ।। यासीं कवण जुंझैल ।। १६० ।। आवो तुवां जें मागीतले ।। तों आम्हासी आजोग जालें ।। पर येक आठवलें ।। तें तुझें तुटैल बंधन ।।१६१।। तरी तुं वचन परियेसीं माझें ।। तूंची तीसी होईल जाण तुझें ।। फेडावया पृथ्वीचे वोझें ।। परमेश्वरू पावैल तुज ।।१६२।। जो या त्रिभवनाचा दातारू ।। तो या सकळ देवांसी आगोचरु ।। तोचि करील संव्हारू ।। यां सकळ दैत्यांचा ।। १६३ ।। आतां तुझीये उदरीं ।। येईल परमानंदु श्रीहरी ।। म्हणौनि अभयें करू सीरी ।। देउनि गेली ।। १६४ ।। जेधवां हात मस्तकीं ठेविला ।। तेव्हेंळीचो गर्भु राहिला ।। परमानंद उदरासी आला ।। देवकीचिया ।। १६५।। येथौनि पुढां पवित्र कथा ।। सांघैल कृष्णदासु आतां ।। देवकीये नव मास करीता ।। तेची वेळे उपजेल ।। १६६ ।। प्रसंगु ।। ४ ।। चौथा ।।

## ।। प्रसंग ।। ५ ।।

मग उठउनि वसुदेवातें ।। जाणविलें मागीला वृत्तांतातें ।। आतां डोहाळे देवकीतें ।। होती ते परीयेसा पां ।। १६७ ।। देवकी म्हणें प्राणेश्वरा ।। मज डोहाळें होताती अवधारा ।। येरु म्हणें वसुंधरा ।। तुज प्रसन्न जाली ।। १६८ ।। तरी जाणवैल आतां ।। तुज डोहाळे सांगतां ।। तवं येरी म्हणे मज भोवता ।। भारू असे देवांचा ।। १६९ ।। मीं जिकडे दृष्टी करीं ।। तो देव मजची जोहाकरी ।। आणि विमानें अंबरी ।।दाटली असती ।। १७० ।। जव मीं सूर्याकडे पाहें ।। तंव तो मज हात जोडुनी उभा राहे ।। मज क्रुध आला आहे ।। जे कंसासुर वधावा ।। १७१ ।। येकवीसा स्वर्गाच्या उतरडी ।। तीतुकी देखत असे परवडी ।। पर येकु हीं न बो(ले) प्रौढी ।। मज देखोनियां ।। १७२ ।। तेतीसां कोडी देवांसी ।। इंद्र तो ऊभा मजपासीं ।। विमानें दाटली आकाशीं ।। माळा हाती घेऊनियां ।। १७३ ।। आणीक येक सांगों काई ।। कुराण येतसे माझा वाहीं ।। अवलोकितां दिशा दाहीं ।। मीच येकी समर्थ ।। १७४ ।। आणीक विर्प्रात वाटतसे मज ।। आणीकां द्यावें कंसाचे

[1] हा आकडा १५६ हवा होता.

राज्य ॥ दैत्यां निर्दाळुनी काज ॥ करावें देवांचें ॥ १७५ ॥ साधुसंत वैसवावें ॥ दुष्ट दैत्य नासावें ॥ रुसीमान भावो सुखी यां करावें ॥ करावे आनंद पवाडे ॥ १७६ ॥ यैसे मज होताती डोहाळे ॥ तव वसुदेवें जोडुनी कर कमळें ॥ आतां आमुचें भाग्ये फळासी आले ॥ होते सुंदरी ॥ १७७ ॥ यैसें तेहीं वेवस्तीले तव देवे वंदीसाळे वीजे केलें ॥ कंस कोठें मारी (न) म्हणितिले ॥ तवं दोघे जाली ( भय ) सिर्ते ॥ १७८ ॥ आगा मी ब्रह्म का भीतां ॥ कंस वधुनी दैत्या संहारीता॥ तुमचे साह्य करीन आतां ॥ पुत्र होऊनि तुमचा ॥ १७९ ॥ हीं तुवां वीजे केलें आमचीया काजा ॥ यैसे आम्हा जाणो आलें देवराजा ॥ तु आम्हा पुत्र होसी ब्रह्म तेजा ॥ कोणा सुकृतास्तव सांघें ॥ १८० ॥ देव म्हणे तुम्हीं पूर्वी तप केलें ॥ क्षेत्रीं तुम्हीं अन्न पुरविलें ॥ म्हणौनि चौघां येकची पुण्य जाले ॥ तुम्हीं ब्राह्मण ते वेळीं ॥ १८१ ॥ म्यां तुमचे उदरी जन्म घ्यावें ॥ तयांवर वसुराळा खेळावें ॥ म्हणौनि मज गोकुळा न्यावें ॥ वसुदेवा ॥ १८२ ॥ तेहीं म्हणितिलें आम्हापाई सांखळा ॥ दुसरी द्वारीं कवाडें आगळा ॥ कैसें म्या न्यावें तुम्हां गोकुळा ॥ सांघें सामर्थें ॥ १८३ ॥ आगा मीं बाळक होईन निरुतें ॥ माझा चरणु लावीसील जेथें ॥ चरणें वंध तुटती तेथें ॥ जेथे चरणु लागे माझा ॥ १८४ ॥ तो कथा नीर्नेव[१] सांघीतला ॥ तो अैकोनीं माता पिता संतोषला ॥ म्हणती आम्हां कैवारा देव आला ॥ घाला दंडवत ॥ १८५ ॥ तेथें देवें आणीक विचारु केला ॥ देवकीचें पोटीचा बळीभद्रु नेला ॥ तो रोहिणीचा उदरीं घातला ॥ नेउनी गोकुळीं ॥१८६ ॥ तेथें तो नवलावो जाला ॥ तेणें नंदु राजा संकला ॥ तो म्हणें आम्हा बोलु लागला ॥ वसुदेवा जाणविलें ॥ १८७ ॥ हे वसुदेवें आईकोनी मात ॥ म्हणें नंदराया तुम्हीं न व्हावें दुचीत ॥ हे जालों असे जाण देवकृत ॥ आमचेची आहे ते ॥ १८८ ॥ तंव येरीकडें देव बाळ आवच्चिता जाला ॥ देवकीयां वसुराळो होउनि राहिला ॥ तंव देवकी म्हणें आंम्हां पुत्रु जाला ॥ वसुदेवा ॥ १८९ ॥ येरु संतोपला अैकतां ॥ तवं बाळकें टाहो केला अवचितां ॥ हा शब्दु रक्षेनाईता ॥ ठाउका जाला ॥१९०॥ ते म्हणती देवकीये पुत्र जाला ॥ यैसा शब्दु प्रकटला ॥ तेवेळे परिवारु पावला ॥ देवरायाचा ॥ १९१ ॥ दैत्यीं करावा वोभाटु ॥ तंव वारीयांचा सुटला धुंदाटु ॥ पींपळु जाला सात कुटु ॥ मुळासहित न्येला गगन मार्गें ॥ १९२ ॥ तेथें कागासुर गर्जना करी ॥ तंव मेघ वर्षले सीळाधारी ॥ गार वैसत्याती सीरीं[२] ॥ तेथें कैची उरी कागासुरा ॥ १९३ ॥ गंधर्वें जव

१ 'निर्वाण' असावें. किंवा कथार्णव शब्द असू शकेल. कथान्वय असा पाठ आहे.
२ वोसंगा—पाठ.

करावी गर्जना ॥ तवं श्रुत जालें नारायणा ॥ तेणें चरणीं धरुनी गगनां ॥ उचलुनि नेला ॥ १९४ ॥ जेंगट पीटी तांतडी ॥ तंव आकाशीं गर्जु तडाडी ॥ तेणें जाहाले[1] देशधडी ॥ सकळ लोक ॥ १९५ ॥ तंव तया कंसाचीये मंदीरीं ॥ वारेयानें केली आपरापरी ॥ येकवीसां खणांची उपरी ॥ ते कोसळली असे ॥ १९६ ॥ घरें उडती आकाशा ॥ त्यांतु पाउसाचा भोंत्र-तुसे वळसा ॥ लोक म्हणती म्हयेसा ॥ पाव पाव ॥ १९७ ॥ आशंकेचे दुर्ग कडाडिले ॥ तें सांडुनी लोक गेले ॥ घरुनी घर पडीलें ॥ यैसें केले जन्म-काळीं ॥ १९८ ॥ श्रावनी वद्यी पवित्रु ॥ अष्टमी रोहिणी नक्षत्रु ॥ दिवसु मंगळवारु ॥ चंद्रूउदे जन्म देवरायांचा ॥ १९९ ॥ जैसा कां बाळ सुर्यो उगवला ॥ तैसा वळवयांचा प्रकाशु पडिला ॥ जैसा कां हिरा झळकला ॥ तैसा सिरवला श्यामतनु ॥ २०० ॥ जो चौदा भुवनांचा दातारू ॥ तोन्ही अवतरला परमेश्वरू ॥ तो होउनिया लेंकरु ॥ देवकीयेचा ॥ २०१ ॥ चतु-र्भुज सांवळा ॥ आणी भुजा वाटोळीया सरळा ॥ श्री मुगटीं पिंगट जावळा ॥ शोभती लंब कर्ण ॥ २०२ ॥ अजानबाहो जगजेठी ॥ सरळ नासापुट हन-वटी ॥ आणि त्रीरेशा त्रीकंठी ॥ शोभताती ॥ २०३ ॥ यैसा बत्तीस लक्षणु ॥ सामुद्रीकें संपूर्णु ॥ जगत्र जीवनु ॥ अवतरलासे ॥ २०४ ॥ ध्वज उर्ध रेशां अंकुशु ॥ आणि सर्व तीर्थांचें वळनेवसु[2] ॥ तळवां दिसती प्रकाशु ॥ सुरंग पद्मांचें ॥ २०५ ॥ यैसें बाळकु देखीले ॥ तंव देवकीया पतीते विनविलें ॥ जी जी जें धरत्री या सांगीतलें ॥ ते जालें सत्ये स्वामीया ॥ २०६ ॥ आणीक प्राणेश्वरा ॥ आईक मागीला विचारा ॥ कोण्हीं न देखे या पुत्रा ॥ तवं न्यांवा गोकुळा ॥ २०७ ॥ हा येस्वदेपासी दीजे ॥ तीसी बहुतां रीती निरि-विजे ॥ तीची कन्या घेउनि येईजे ॥ येन्हीं कंसु अनर्थु करील ॥ २०८ ॥ म्हणौनी वसुदेवा वसुरंळा[3] घातला ॥ तेणें देवाचा चरणु कुलपा लाविला ॥ तंव उघडी खळखळां ॥ पांईचेहीं सांखळ तुटले ॥ २०९ ॥ मग तो धांवें लवडासवडी ॥ तंव यमुना जात असे दोहीं थडीं ॥ ते देखोनि भेणें आली हुडहुडी ॥ आतां कैसें होईल ॥ २१० ॥ मग आठवले देवाचे वचना ॥ मीं लावीन याचा चरण ॥ मग देईल वाट यमुना ॥ यैसें विचारिले ॥ २११ ॥ मग म्हणें आवो यमुने माये ॥ जरी हा परमेश्वरू अवतरला होये ॥ तरि याचा चर्नु तुज लागत आहे ॥ मज वाट देई ॥ २१२ ॥ मग तें यमुना दोनी भाग जाली ॥ तया परमानंदा वाट दीधली ॥ तंव समस्तें असती नीजैली ॥

१ मुळात, 'नांदे' असा पाठ आहे.

२ वळणवेसु – पाठ.

३ वोसंगा पाठ

तंव गेला मंदिर नंदाचिया ॥ २१३ ॥ दुर्ग दारवंटें आगळा ॥ सुबंधा लोहाचिया सांखळा ॥ त्या उघडलियां खळखळां ॥ चरणु लागतांचि ॥२१४॥ नंदाचिया राउळा गेला ॥ तयासी सर्व व्रतांतु सांगींतिला ॥ मग यशोदेप्रती गेला ॥ तीणें देखिला तो बाळकु ॥ २१५ ॥ म्हणें उपजतांचि येसे लेंकरु ॥ अजानबाहो श्याम सुंदरु ॥ सर्व लक्षणी मनोहरू ॥ हा अवतार होईल ॥ २१६ ॥ मग नंद येशोदा बोलती ॥ हा आणीला येव्हडेयां रात्रीं ॥ यमुना दोहीं थडीया असे जाती ॥ आणी साते दरवंटे लोहा[1] आगळा ॥२१७॥ तुम्हीं आलेतीं कवण्यापरी ॥ येरु म्हणें नवल अवधारी ॥ यमुना वाहे सभरा भरी ॥ तींणें वाट दीधली ॥ २१८ ॥ याचा चरणी ते दोनी भागजी जाली ॥ कवाडें तैसीची उघडिली ॥ आम्हासी वाट दीधली ॥ दैवें येसे जाणा ॥ २१९ ॥ वसुदेव म्हणें तो वृत्तांतु अैक ॥ हा पुत्रु तुम्हां आम्हां येकु ॥ हे खूण सांगीतली येनेंची दुःख ॥ सर्वज्ञु रावो हा ॥ २२० ॥ आवो हा पुत्रु यौगीयाचे ध्यान ॥ येसे वो येशोदे निरुतें जाण ॥ यासी करावें जतन ॥ हा लेंकरु जाला ॥ २२१ ॥ आम्हीं तरि दोघें जने ॥ कंसा हाती नाहीं वांचलें ॥ वरी येव्हढे वांचवनें ॥ वंशी येकु तुमचेनें ॥ २२२ ॥ वहुत करुणां भाकिली ॥ मग नंद येशोदा गहिंवरली ॥ म्हणती आम्हा कन्या जाहाली ॥ ते न्यावी वसुदेवा ॥ २२३ ॥ येऱ्हवीं कंस न राखे जीवें ॥ तो धांवेल माहा रवें ॥ हे त्याचें हातीं द्यावें ॥ येऱ्हवी अनर्थु करिल ॥ २२४ ॥ मग कन्या घेउनि निघाला ॥ येमुना तीरास आला ॥ पुनरपी यैसेचि वोलिला ॥ तंव दोनी भाग जाली ॥ २२५ ॥ ते दीधली देवकीये करीं ॥ यैसे जाले वंदीखाणा भीतरीं ॥ तेव्हेळीं वायो मेघ भोवंडीत होते बाहेरी ॥ ते शांत जाले ॥ २२६ ॥ तंव पूर्व दिशा उजळली ॥ रक्षणाईतें सानंदे जाली ॥ कागासुरें हांक दीधली ॥ झडाडिले येमळा अर्जुन ॥ २२७ ॥ गंधर्उ करी गर्जना ॥ जेंगट पीटी सत्राना ॥ हा कीं गर्जत असें गगन ॥ विन्न दारुण मांडलें ॥ २२८ ॥ तंव कंसासुर महादैत्यु ॥ तो धांवीनला सींहीं नादे गर्जतु ॥ घे धे मारी करीतु ॥ आला वंदीखाणा भीतरी ॥ २२९ ॥ मग तयास कोमळ वाळकां ॥ चरणी धरिले आईका ॥ मग सुमंरली[2] देवकी आंबीका ॥ देवा आकांता पाव वेगी ॥ २३० ॥ तुं सर्व जीवाचा कोंवसां ॥ माझ्या उदरा आलासी हा भवसा ॥ तुज कारणें रुपीकेशा ॥ हे वाळक जीवें जात असे ॥ २३१ ॥ हें आपेस चुकवावें ॥ आणि या वाळकाते राखावे ॥ तरी जाणवैल स्वभावें ॥ तुं परमेश्वरू अवतरला होसी ॥ २३२ ॥ यैसें देवकी

१. लोहो सांकळा–पाठ

२. स्मरली.

चिंतीत असे मनीं ॥ तंव कंसु बाळकातें भोवंडीतु असे गगणी ॥ जवं आपटुं गेला धरणी ॥ तंव ते जाले तेजमयें ॥ २३३ ॥ तडकु जैसा अवचिता वाजिनिला ॥ तंव कंसाचा हात उपटला ॥ प्रकाश प्रगटला तवं कंस पडिला ॥ धरणीवरी ॥ २३४ ॥ जैसी बारा सूर्यांची प्रौढी ॥ तैसें बाळक आकाशीं तडाडी ॥ गर्जुनियां घडघडी ॥ धांवें कंसावरी ॥ २३५ ॥ तंव कंस चांचरतु पडतु ॥ पाहा पळतुसे दैत्यनाथु ॥ मग जगा जाला आकांतु ॥ म्हणती आकाश पडिलें ॥ २३६ ॥ महाकलोळ वन्ही ॥ गर्जतु भोवे गगनीं ॥ तडकु फुटती मेदनीं ॥ तेणें धरनीं कांपतीसे ॥ २३७ ॥ मग म्हणें मीं अनिवार वीज ॥ ग्रासुं आली येरे कंसा तुज ॥ पर आज्ञा नाहीं मज ॥ त्या देवरायांची ॥ २३८ ॥ अरे ये श्रृष्टीचा दातारू ॥ तेणें गोकुळीं केला अवतारू ॥ तो तुझा करील संहारू ॥ सकळ दैत्यांसीं ॥ २३९ ॥ अरे त्या देवांचीयां गळा ॥ आहेती वैजै(यं)ती माळा ॥ त्या मधील मीं येकी कळा ॥ जालीये प्रकट ॥ २४० ॥ कंसा सोडीलासि रे जायें ॥ येरी गगनीं अदृस्ट होये ॥ कंसासुर कांपतु जायें ॥ आपुलीया परिवारातुं ॥ २४१ ॥ वीज जेधवां कडाडिली ॥ ते वेळी मथुरा नीपाणीं जालीं ॥ सकळें उदकें आटलीं ॥ कोरडीया वावी पोखरणी ॥ २४२ ॥ उपरीया धवळारें ॥ पडली रायांची दात्रोदरें ॥ मग म्हणतीलें कंसासुरें ॥ आतां काय कीजे ॥ २४३ ॥ सभे बैसले सकळैक ॥ बुद्धीवंत प्रधान अन्येक ॥ जे जे प्रतापीये वीरनायक ॥ भाट ब्राह्मण साधुसंत ॥ २४४ ॥ हे सकळ पडिले चिंतावनी ॥ रावो म्हणें बुद्धी सांगा कवणी ॥ जे गोकुळां जाउनि ततक्षणीं ॥ झडकरुनीं ठाई घाला ॥ २४५ ॥ म्हणती नंदाचिये घरीं ॥ सुधी कवणु करी ॥ बुधी आंतुडा रे वैरी ॥ येऱ्हवीं अनर्थु होईल ॥ २४६ ॥ तंव कंसासुरें विडा उचलिला ॥ तेथें मांभळभट उठिला ॥ वीडा घेउनी बोलिला ॥ राया परियेसी प्रतिज्ञा माझी ॥ २४७ ॥ आतां देव खेळे बाळलीळा ॥ मांभळभट जाईल गोकुळा ॥ ते कथा पवित्र रसाळा ॥ सांगरे कृष्ण दासा ॥ २४८ ॥ प्रसंगु पांचवा ॥ ५ ॥

## ॥ प्रसंग ॥ ६ ॥

भट म्हणें विनंती परियेसी ॥ रीठासुरु सांगातें दे मजसी ॥ मग कार्य करीन बोजेंसी ॥ ते परियेसी राजेंद्रा ॥२४९ ॥ तंव रीठासुर उभा राहिला॥ तेणेंहीं विडा घेतला ॥ तो रीठेगाठीमाजी रीगाला ॥ मग भटु निघाला गोकुळासी ॥ २५० ॥ मग मांभळभट गेला आपुलिया घरासी ॥ उपरवाया बोभाइला आपुलिये स्त्रीयेसी ॥ नवी प्रीती[1] देई मज पासी ॥ मीं जातो

१ प्रति – पाठ

गोकुळा ।। २५१ ।। तंव ते म्हणें तुम्हीं जातां गोकुळा ।। गौळी घृत देती सवें न्या नळा ।। तंव भट म्हणें सकुनु असंगळा ।। आणि पापनिीं कारुटे[1] आपुलां ।। २५२ ।। मग तैसाचि निघाला ।। आणि गोकुळासी आला ।। नंदा मंदिरीं प्रवेशला ।। मग आशीर्वाद दीधला ।। नंदासी तेणें ।। २५३ ।। तव येशोदेसी म्हणें नंदु गणा ।। ये दंडवत करीं या ब्राह्मणा ।। दंडवत करुनी पाट होता चौकोणां ।। तो वैसावयासी दीधला ।।२५४।। तव भटु म्हणें मागो आलों वरुसां सण ।। नंदा कीर्ती बहुसाल होईल ज्ञान[2] ।। आम्हासी द्यावी गौ येकी तान्हीं ।। नळा छुतालागी पाठविला ब्राम्हणीनें ।। २५५ ।। मग चरणक्षाळण जाले ।। गंध विडे समर्पीलें ।। मग आश्चर्य वाटले ।। मावळ भटासी ।। २५६ ।। तव गोकुळामाझारी ।। आनंदुची घरोघरीं ।। पाहों जाती नगरीच्या नारी ।। पुत्रु जाला येशोदेसी ।। २५७ ।। मग पुसे नंदा तुम्हा म्हणे पुत्र जाला ।। सांगपा कवणे तिथी नक्षत्रीं जन्मला।। तंव नंदु म्हणें रोहिणी नक्षत्री जन्मला ।। श्रावण वद्यी अष्टमीसी ।। २५८ ।। याचे जन्मनाम सांगा आम्हासी ।। तंव भट म्हणें घेंल पाट दे मजपासीं ।। येशोद याचे जातक वर्तुन देईण तुम्हासी ।। मग[3] दान बहुत होईल आम्हासी देखा ।। २५९ ।। पुढें पातडे मांडिले उकलुनी ।। तंव येशोदेणें पाट दीधला आणुनी ।। आतां नंदा सावधान होउनी ।। ब्राह्मवाणी आईक माझी ।। २६० ।। आंगोळीया लेखीत नवी [4]प्रति पाहे ।। डोई हालउनी पाट लिहितु जाये ।। हसे नयनी उदक वाहे ।। ह्मणें आहा कटा कटा ऐसे काय जालें ।। २६१ ।। तंव नंद ह्मणें भटो कैसें वर्तीलें ।। याचें जातक कैसें निघाले ।। तंव भट ह्मणें नव्हे भले ।। यासी जन्म जालें मुळावरी ।। २६२ ।। तुवां उपजली वेळ सांगीतली ।। ते म्या तिथी नक्षत्रें गुणुन पाहिली ।। मग भटें टाळी पिटीली ।। हा मुळी लागला म्हणौनिया ।। २६३ ।। शनी मंगळ राहो केतु ।। दुष्ट ग्रह असें सांगतु ।। भीन[5] रात्री अष्टमी अंतु ।। रोहिनी नक्षत्री जन्मला ।। २६४ ।। अरे हा कुळाक्षो[6] करील ।। जयावरी दृष्टी पडेल ते भस्म होईल ।। हा ठावो वोस पडेल।। ऐसें सत्य जाणा ।। २६५ ।। हा टाकीजे येमुनाडोहीं ।। यासी विचारू आणीकु नाहीं ।। परी मजपासीं आणीकु कांहीं ।।

---

१ करंटे -- पाठ

२ जाण -- पाठ

३ मग द्रव्य आम्हासी बहु देणें -- पाठ.

४ प्रत.

५ 'भिण्ण अथ' असा एक पाठ आहे.

६ कुळक्षयो -- पाठ.

उपावो असे ॥ २६६ ॥ गोठेगांठीची माळा ॥ ते मीं घालीन याचीया गळां ॥ मग हा सीतळ सकळां ॥ जाईल नंदा ॥ २६७ ॥ हा पुत्र तुम्हासी नव्हें लाहणा ॥ हा पोसना घावा कवणा ॥ नाही तरि यासी करावी यमुना ॥ नातरी संसारा मुकाल तुम्हीं ॥ २६८ ॥ मुळीं लागला डोंगरी सांडा यासी ॥ नातरी पुत्रदान द्या आम्हासी ॥ काय करिती गौळी माभळभटासी ॥ तो रायाचा जोसी म्हणौनिया ॥ २६९ ॥ तंव नंदुराजा विनंती करी ॥ स्वामी हे आवरी येखादीयेपरी ॥ तंव भटु म्हणें आणा बाहिरी ॥ तंव झडकरी आणीला ॥ २७० ॥ तंव भटें देखिला दृष्टी ॥ तो चर्तुभुज जगजेठी ॥ माळ घातली कंठी ॥ तेणें कपटीयें भेटें ॥ २७१ ॥ त्यां मनियांतु लपविला रिठासुरु ॥ तेणें त्या बाळकाचा करावा संहारु ॥ कंठ चेंपुनिया लेंकरू ॥ मारावे जंव ॥ २७२ ॥ तंव तेणें बाळकें तो मणीं ॥ धरुनि घातला वदनी ॥ तो फोडिला कडाडुनी ॥ येशोदा मनी दचकली ॥ २७३ ॥ तोंडी आंगुळिया घालुनी पाहिलें ॥ तंव अशुद्ध मांस देखिलें ॥ मग भटें भयें घेतलें ॥ म्हणें नव्हें भले हें लेकरू ॥ २७४ ॥ मग नंदे पाहिले जंवं मुखीं ॥ तंव ते बाळक रक्त धरणीये थुंकी ॥ तेवेळ देखिला येकायेकी ॥ रीठासुरु वधिला ॥ २७५॥ भटु गजबजीला ॥ तो उठोनीं पळो लागला ॥ पुढां काय वृत्तांतु वर्तला ॥ ते सांगेल कृष्णदासु ॥ २७६ ॥ प्रसंग साहावा ॥

## ॥ प्रसंग ॥ ७ ॥

जव वर्तीलें खोटे पातडें ॥ तंव तोंडावरी वैसले तेंची पीढें ॥ तेणें सुजलें थोबाडें ॥ मग जाला भयाभीतु ॥ २७७ ॥ तंव साळीग्राम गडबडिलें ॥ देव्हार पाटसा उगे आले ॥ अगळांचें सर सुटलें ॥ खळखळीले खीळ खांबे ॥ २७८ ॥ तेला तुपाची मापें ॥ डौले चाटु लाटनी उमपें ॥ आणीकें काष्टें सकोपें ॥ मार करिती भटासी ॥ २७९ ॥ वैसावया पाट घातला थोरु ॥ तोची पाठीवरी वैसला निस्टुरू ॥ घृतालागी आणिला नळा थोरू ॥ तोचि मस्तकी वाजतु असे ॥ २८० ॥ तंव थोरी अरळपें गाहा शब्दु करी ॥ म्हणे पाहाहो आम्हीं म्हणो भला नंदु ये नगरी ॥ आम्हाशी मार होतो भारी ॥ आपण विनोदु पाहातसें ॥ २८१ ॥ उभा गहोनी पळों पाहें बाहेरी ॥ तंव पागोटें गुंतलें मोहटीवरी ॥ आंगनीतुनी उडी घाली कुसा बाहेरी ॥ आतां मज जीवें उरी नाहीं ॥ २८२ ॥ खळखळीली काष्टें धांवीनले चाटु ॥ म्हणती घालु डेरा अवघाची लाटु ॥ मुसळें हाणोनि पाडिला तळी भटु ॥ उखळे म्हणती हा सगळाची गिळु ॥२८३॥ सीळा लाटनी पोळपाट ॥ म्हणती ठसुं[1] पाठी

१ ठेचुं

मग लाटुं पोट ॥ कासावीस जाला भट ॥ म्हणोनी पीटी लल्हाट आपुलें ॥ २८४ ॥ ऐसा कष्टी सांडिला दारवठा ॥ केंस सरिसे करी उभा राहोनि चोहाटां ॥ तंव कांठीया टोणपे वैसती घोटा ॥ म्हणती भटा घेउनी जीवें ॥ २८५ ॥ चालिलीं मापें नगरीची येकदटे ॥ म्हणती भारूनी घोटें भटा जासी कोठें ॥ तंव काठ वटीं खोडवी खीया नेटें ॥ उठावली भटावरी ॥२८६॥ तंव धांवती धानें तवकें रांजन मोटें ॥ तांबे कळस काहीं हांडे ताटें ॥ ते मेळा करूनी उठावली येकदटें ॥ तंव भटु डोळे झांकी ॥ २८७ ॥ तंव चालिली जाती रोख भरट ॥ म्हणती भटा तुझें करूनी रे पीठ ॥ तंव तो काकुळती त्यांसी बोले भट ॥ जीवदानें द्यावें मज ॥ २८८ ॥ हे म्हणे तंव शस्त्राचें भार अपार ॥ भटा भोंवते उभे राहती थोर थोर ॥ त्या देखोनि भटा ये ही वज्वर ॥ म्हणें आहा कैसे मरण पावलो ॥ २८९ ॥ तंव ब्रह्मपुरी थोर थोर गजवजीली ॥ हे भटो आम्हा भोंवती कळी कैसी आणीली ॥ दगड जोशी म्हणे असा उथली ॥ पातडें सांगे तया ॥ २९० ॥ तंव हाक देती मूर्ति खेताळ वेताळ ॥ वहीरव[१] धांवती भूताळ मैराळ ॥ हनवंतु हाकारी देवतें गांवांळ ॥ भटु जातो गीळ हा ॥ २९१ ॥ मांभळ भटु म्हणे मी भटु तुमचा ॥ मज राखा गा दिवसु आजीचा ॥ येरु म्हणती तुज विंचु जाचा ॥ तरी कंसा कोण सांगे हे मात ॥ २९२ ॥ भटु माहाशाब्दा रें पळों गेला ॥ तंव कासोटा वेसीडांभा अडकला ॥ तंव माभळभट नग्नची पळाला ॥ मथुरे वाटे ॥ १९३ ॥ तंव उठावली रानें काष्टें ॥ भटा मागीत येती आवताचे[२] भार नेटें ॥ म्हणती तुझे विदारू[३] रे आंग मोटें ॥ तंव तो काकुळतीये तया ॥ २९४ ॥ तंव हळधर रागें धांवती ॥ येकु दीस पेरणीचा आलारे म्हणती ॥ त्या भटा असुड मार करिती ॥ तंव भटु म्हणे शिव शिव ॥ २९५ ॥ यैसें म्हणे तंव नांगर कुळव विन्न भटा पाठीं वैसती ॥ जैसे पाषाण वरी भोंवती ॥ आवतांचे झनाण येती॥ (आकाशी फिरती) अैसे घाग गीद ॥ २९६ ॥ तंव तो पळतु मथुरेसी आला ॥ भटाचें धोत्र सांडवले (नग्न जाला) ॥ तवं त्यासी पळतां देखिला ॥ लोकी मथुरेचिया ॥ २९७ ॥ म्हणती कोणें केला कष्टी ॥ असुद्ध वाहे ललाटीं ॥ सुजोनी आली पाठी ॥ गुडघे घोंटी फुटली ॥ २९८ ॥ स्वजन पुसती भटोजी ॥ यैसे काइ तस्करी उपद्रो केला कवणें ठांई ॥ कीं तुमचे आंगीं पीसें आहे काई ॥ कीं कोठें केली चर्म

---

१ भैरव

२ औत

३ उपद्रव

चोरी ॥ २८९ ॥ तुम्हा मारू कोठे जाहला हे सांगा ॥ येरु म्हणे पळा काढुं आली मागां ॥ विसरलो देहभावो काय सांगा ॥ मळसूत्र होत असें देखा ॥ ३०० ॥ तंव लोकीं धरून नेला रायापासी ॥ रावो म्हणे भटो तुज वेवस्ता जाली कैसी ॥ येरु म्हणें पळा येती काढ्टे तुम्हांसी ॥ मारावया आतां ॥ १॥ या बोला कंस कोपला भटावरी ॥ म्हणें बोडुन टाका रे बाहेरी ॥ सांडुनी आमचा दळभारू थोरी ॥ बोले हा भलतैसें ॥ २ ॥ तंव भटाची मुर्छा [illegible] ॥ मग समुळ वेवस्ता सांगीतली ॥ सभा तटस्त राहिली ॥ आतां कैसे होईल ॥ ३ ॥ रीठासुर दैत्ये दारुणु ॥ म्हणती त्यांचा बाळकें घेतला प्राणु ॥ भटु म्हणौनी सोडिला अपमानु ॥ करुनियां हा ॥ ४ ॥ मग राव पडिला चिंतावनी ॥ त्याची उपजताची यैसी करणी ॥ आतां अैसा नाहीं कवणी ॥ जो बुधीचि त्यातें मारी ॥ ५ ॥ तंव ते पूतना आली सभेसी ॥ ते हात बोढवी विडीयासी ॥ म्हणें विषपान करून मारीन त्यासी ॥ तरीची रायाची बहीण मीं ॥ ६ ॥ मग गोकुळासी गेली ॥ ते येशोदेसी भेटली ॥ विडा वस्त्रें दीधली ॥ थोरां आदरेसीं ॥ ८ ॥ तुं येशोदे भाग्यांची वो थोरी ॥ पुत्र झाला तुझिये उदरी ॥ आतां यासी जतन करी ॥ कंसु वैरी दोषो[1] न सके ॥ ८ ॥ तंव ते बाळक पाहावया उचलिले ॥ आणी तोंडी स्थान[2] घातले ॥ येरें वीसे[3] सोकिलें ॥ ततक्षणी ॥ ९ ॥ दोन्हीं सोकुनी स्थाणें ॥ मग सर्वांगीचे अशुद्ध सोषीलें तेणें ॥ त्याची मीठी न सुटे कवणें गुणें ॥ मग मूर्छागत पडिली तें ॥ १० ॥ ते उतानी पडिली भूमीवरी ॥ हात पाये घोडीते धरणीवरी ॥ तंव प्राण गेला ते तोंड पसरीं ॥ भयानक दिसे ॥ ११ ॥ तंव गोकुळ थोर गजबजिले ॥ म्हणती बाळकें पूतनेंते सुकुंनी पाडिले ॥ कंस न सोडी आम्हा कांहीं केलें ॥ पूतनें-करितां आतां ॥ १२ ॥ यैसी पूतनेंसी वैरमुक्ती दीधली ॥ तंव कंसासुरा मातु गेली ॥ मग धोवा[4] धोवीं केली ॥ आरंभिले वारसें ॥ १३ ॥ आतां पाळनियांची औती[5] ॥ बाळका नांव पाहुनी ठेविती ॥ हे पुढीलें कथेची स्तुती ॥ सांगरे कृष्णदासा ॥ १४ ॥ ७ ॥ प्रसंग सातवा ॥ ७ ॥

१ देखो–पाठ.

२ स्तन.

३ विष.

४ धावाधावी–पाठ.

५ आइति, तयारी.

## ॥ प्रसंग ॥ ८ ॥

मुळें पाठविली नृपवरां ॥ तेथें सोईरे आले आपार ॥ वाजांत्रांचें गजर ॥ तेण आंबर गर्जत असे ॥ १५ ॥ पालकांची आईत केली ॥ जैसी सोनयांची मुस वोतीलीं ॥ तैसी वावनेंकसें घडिली ॥ विश्वकर्तेयानें ॥ १६॥ खणोखणीं हिरे झळकती ॥ मानीक पुस्पेराज वोप देती ॥ संदी संदी ढाळ देती ॥ मुक्ताफळें ॥ १८ ॥ त्यासी पाचीची मोहोटी ॥ तेथें रत्नांची प्रभावळी गोमटी ॥ त्यावरी ते झळकती पाटी ॥ सोनियांची ॥ १८ ॥ तेथें झळकती हिरें ॥ मांचवे वोतीले नाना प्रकारें ॥ जैसा उदो केला पूर्णचंद्रें ॥ तैसें तेज फांकले ॥ १९ ॥ पाटसुताची वीण करी ॥ वातीया सुवर्णगोप अवधारीं ॥ चंदनांचा दामोधरीं ॥ लांवीला पालकु ॥ २० ॥ सान सुपती[1] गोमटी ॥ वरी पासोडा पोफळदुटी ॥ त्यांवरी खेळणी गोमटी ॥ जैसा श्रीमंतकु[2] मनी ॥ २१ ॥ नानापुष्पांचीया माळां ॥ कापुर कस्तूरी परिमळा ॥ नगरीचिया नारी सकळा ॥ आनीलीया मुळें करुनियां[3] ॥ २२ ॥ मग ब्राह्मणा जाला वैसकारू ॥ मिळाले वेदविद अपारू ॥ वेदाच घोक आपारू ॥ मंदिरीं उठिलें ॥ २३ ॥ ब्राह्मणीं रासी नक्षत्र वर्तीलें ॥ नांव कृष्ण कान्हो येसें सांगीतलें ॥ मग षोडश उपचारी पुजीले ॥ ब्राह्मणांसी ॥ २४ ॥ वस्त्रीं-सुवर्णी आभरीं केलें ॥ मग नंद येशोदा हवनी वैसविले ॥ तेथें यज्ञ (याज्ञिक) सुखिये केले ॥ कृष्ण घातले पालखीं ॥ २५ ॥ देवकन्या ऋषी ब्राह्मणी ॥ गीतीं गाती चक्रपाणी ॥ पालकु वोटे हालउनी ॥ नांव कृष्ण म्हणताती जो जो हा ॥ २६ ॥ या ऋषी ब्राह्मणी सकळ सोहासिनी ॥ वाणें दीधलीं मुक्ताफळें ताटें भरुनी ॥ गर्जे वाजंत्रांची ध्वनी ॥ ऋषीं मुनी संतोषले ॥ २७ ॥ तंव नंदु वैसला सभामंडपी ॥ पानें पोफळें वांटिती हडीपी ॥ ( वस्त्रे अलंकार समर्पि ॥ ) भाट वंदीजन सुखिये केलें ॥ २८ ॥ गाणें वानें नांचणें ॥ सुगड मृदंगध्वणें ॥ ताळ मंडळ धोक आळवणें ॥ तेथे इच्छादानें पडताती ॥ २९ ॥ येसा नटारंभ प्रवर्तला ॥ इंद्र देवांसहित पाहों ठेला ॥ पुष्प वरुषावो जाला ॥ देवी पुजीला देवोरावो ॥ ३० ॥ आतां निरोपु ब्राह्मणा आरोगणें ॥ स्वयेंपाक सिद्ध अनेकें पक्वान्नें ॥ येमुनेसीं करीती स्नानें ॥ बुडिया देउनी ॥ ३१ ॥ ते उदकी बुडिया देती ॥ तंव तेथेंची ( कृष्णाते ) देखतीं ॥ उठौनी वरुतें पाहातीं ॥ जत्रं देखती

---

१ हा पाठ आहे मुळांत ' सुपवती '.

२ स्यमंतक.

३ पाठउनि–पाट.

आकाशीं ॥ ३२ ॥ जीकडे दृष्टी जाये ॥ तीकडे दिसतुची आहे ॥ मग म्हणती हे नवल काये ॥ कवण आहे हे न कळे ॥ ३३ ॥ मग ताटें विस्तारिलीं ब्राह्मणी ॥ नंदु उभा संकल्पा लागुनी ॥ भोक्ता परमात्मा म्हणौनि ॥ संकल्प घातला ॥ ३४ ॥ प्राणां आहुती घेतां ॥ तंव तेथें देखती कृष्णनाथा ॥ येरू म्हणती मज पांतां ॥ काय भूत असे ॥ ३५ ॥ येक येकांसी दाखविती ॥ तंव सर्वांचा ठांई तैसीची मूर्ती ॥ येक आज्ञान कर्म जड ठावो मांडिती ॥ भक्तु म्हणती परमात्मा हा ॥ ३६ ॥ यैसा समयो प्रवर्तला ॥ तंव नंदु अैकोनी पाहों आला ॥ तंव तो व्यापुनी राहिला ॥ सर्वा ठांई ॥ ३७ ॥ नंदु विचारी आपुलां चित्तीं ॥ घरी पालकातु आहे अैसीचि मूर्ती ॥ कवण जाणें कैसी गती ॥ तंव तो जाला अदृष्टु ॥ ३८ ॥ मग ब्राह्मण तृप्त जाले ॥ कर्पूरांसहित वीडे दीधले ॥ नंद दक्षणा द्यावयासी उभे ठेले ॥ देती सुवर्ण गौ दानें ॥ ३९ ॥ यैसें वारसें जालें ॥ सकळांसी आहेर समर्पिलें ॥ यानंतरें नंदु सकळांसहित बैसलें ॥ आरोगणेसी ॥ ४० ॥ जीरेसाळी देवसाळी ॥ मंधुसाळी पंकसाळी ॥ नगर दाटलें सुपरिमळीं ॥ तैसा भात वाढीतो ॥ ४१ ॥ सकळां अन्नांचें राजे ॥ म्हणौनि आधीं भात वाढीजे ॥ नागी वाढीती वोजें ॥ वरी घालिती घृत पहीत ॥ ४२ ॥ तक्राची रूचीकर कथिका ॥ नानापरीची पक्वान्नें देखा ॥ प्रभावळी पत्र शाखा ॥ जेविताती ॥ ४३ ॥ यैसीं षडुरसें पक्वानें ॥ सकळांची जाली जेवणें ॥ विडे देउनि वस्त्र दानें ॥ गयांसी पूजा केला ॥ ४४ ॥ मग सोईरया वहुडा जाला ॥ तेथें कंसु नाहीं आला ॥ पुढें तो काय करिता जाला ॥ तें सांग रे कृष्णदासा ॥ ४५ ॥ प्रसंग आठवा ॥ ८ ॥

## ॥ प्रसंग ॥ ९ ॥

कवणे येके दिवसीं ॥ कंसु वैसला सभेसी ॥ बंधु केसिया भुजेसीं ॥ अक्रुर आणि सकळिक ॥ ४६ ते सकळै पडिले चिंतावनीं ॥ रावो म्हणे बुद्धी नें सांगा रे कवणी ॥ येवढाले प्रतापीये असोनी ॥ वैरीया उपावो न कराची ॥ ४७ ॥ तो दिसेंदिसु वाडी जाला ॥ मग तो नागवे सकळांला ॥ जेणें उपजतां पवाडा केला ॥ तो सामान्य वीरू नव्हे ॥ ४८ ॥ यैसें बोलिला कंसासुरू ॥ तंव उठिला यमळा अर्जुनु ताडासुरू ॥ म्हणें काये वानीती ते लेंकरूं ॥ गौळीयांचें ॥ ४९ ॥ आतां आम्हासी आज्ञा दीजे ॥ कायैं करून ते पाहिजें ॥ हांसोनी बोलिलें राजे ॥ विजया होइजे वीर हो ॥ ५० ॥

१ वाढिता—पाठ

मग ततक्षणीं ।। प्रवेशले नंदाचे भुवनी ।। पिंपळ ताड होउनी आंगणी ।। वाढीनले ।। ५१ ।। वृक्षे गेले गगना ।। कृष्ण जाला रांगनां ।। आतां खेळावया येईल आंगना ।। आणि वरी पडों ।। ५२ ।। तंव कृष्ण खेळत होता आंगनीं ।। तंव त्या वोळखिलें दैत्यां दोहीं ।। दोही करीं दोघे उपडौनी ।। धरणीयेवरी आफळिले ।। ५३ ।। अवचिता गर्जीनला धावो ।। तंव धांवीनला नंदगावो ।। ते देखोनी पावला भेवों ।। म्हणें हे नवल थोर जालें ।। ५४ ।। तंव कंसासुरा गेली मात ।। म्हणें दोहीं वीरांचा केला घात ।। आतां कवण आहे दूत ।। जो त्याचा करिल संहारू ।। ५५ ।। तंव उठिला सर्प थोरू ।। म्हणें मी सर्परूपें करीन संहारू ।। महां अद्भुत वीपारू ।। डपौनी मारीन मीं ।। ५६ ।। मग तयांसी निरोप दीधला ।। तो पालखी जाउनी राहिला ।। तंव तो बाळ पालखी निजैला ।। येरू आला डंखावया ।। ५७ ।। कृष्णें तो देखिला दृष्टी ।। मग धरिला मुष्टी ।। नखे रोउनी कंठी ।। मारिला तो ।। ५८ ।। मग लटिकाची देतु असे हाका ।। तंव धावीनली मायें बापें देखा ।। तंव देखिला माहा सर्पु आइका ।। तो विखार काळीया जैसा ।। ५९ ।। तो हातीचा सोडविला ।। तंव प्राण त्याचा असे गेला ।। लोकांस विस्मो जाला ।। म्हणती वाचविला देवरायें ।। ६० ।। तंव कंसा जालें श्रुत ।। म्हणें येणें मारील माझें दैत्य ।। जो-जो (असें) जात ।। तो मागता परतेना ।। ६१ ।। ऐसा चिंताग्रस्त जाला ।। सकळासी भये सुटला ।। कंस वीरांकडे पाहों लागला ।। तंव उठिला कागासुरू ।। ६२ ।। राया वरुषाचें लेंकरू ।। त्याचे माथाचा बाळला नाहीं जारू ।। त्याचा काइंसा बडीवारू ।। मज कागासुरापुढें ।। ६३ ।। आतां हाचि माझा प्रतिवादु ।। चांचु हाणोनि काढीन मेंदु ।। मज आलिया क्रोधु ।। कळिकाळ ठेंगना ।। ६४ ।। येसे वोलोनी तो निघाला ।। नंदाचे मंदिरी बैसला ।। जंव कृष्ण खेळतां देखिला ।। हातीं उंडा दहीं भाताचा ।। ६५ ।। म्हणें हानो चेपटघातें ।। आणि काढु पोटींची आतें ।। की कौटे[1] फोडुं डोईचें ।। आजी सांपडला कृष्ण हा ।। ६६ ।। तवं कृष्ण म्हणें हा काउळा ।। मावा बैसला मज जवळा ।। तंव तो वेगवगत्र धांवींनला ।। हाणितला मुष्टीघातें मस्तकीं ।। ६७ ।। तंव तो वज्रशरीरी ।। त्यासी कागासुरू काय करी ।। वेळु न लगतां दोहीं करी ।। धरूनी चीरी चाचुं त्याची ।। ६८ ।। ते दोनी सकलें केली ।। कागासुरासी येसी गती जाली ।। नंद यशोदा धावींनली ।। म्हणती पाठी घेतली कंसासुरें ।। ६९ ।। आमचें वाणीचें लेंकरू ।। आणि येणें दैत्यांचा सोडिला पुरू ।। हा जाने प्रतीकार करूं ।। म्हणउनी वांचतों ।। ७७ ।। मग कडिये घेउनी देती चुंबन ।। येकी उतरीती निंबलोन ।। म्हणती हें लेकरूं आजान ।।

---

१ कवटी

परि वीर मारले येणें (दारुण) ॥ ७१ ॥ आतां यासी जतन करा थोरी ॥ नीघों नेंदावा बाहेरी ॥ याचा कंस वैरी ॥ तो माव करी कपटिया ॥ ७२ ॥ तवं कागासुराचा वोभाट जाला ॥ कंस मनी थोर दचकला ॥ आमचें दळीं तो कागासुर भला ॥ होता वळियाडा ॥ ७३ ॥ येसना कागासुरू ॥ तें गांगते लेंकरूं ॥ वेळ न लागतां संहारूं ॥ केला तयाचा ॥ ७४ ॥ आतां यैसी येकी बुद्धी करूं ॥ त्यासी पडों द्या वीसरु ॥ मग बुद्धीं सीतरूं ॥ येऱ्हवीं नागवे हा ॥ ७५ ॥ यैसे चर्तुमास क्रमले ॥ कृष्ण चालों सिकलें ॥ ईतुकीया- मध्ये गोकुळी पवाडे केले ॥ ते सांग रे कृष्णदासा ॥ ७६ ॥ प्रसंगु ॥९॥

## ॥ प्रसंग ॥ १० ॥

कवणे येके वेळी ॥ यशोदा नाहानींत होती सायंकाळी ॥ रक्षा लाविली कपाळी ॥ म्हणें तुज रावो नरसिंह जीउती ॥ ७७ ॥ तंव देवो म्हणे आवो माये ॥ कैचा नरसिंह जीवुती कोठे आहे ॥ आतां सावध होउनि पाहें ॥ म्हणौनि मुख पसरिलें ॥ ७८ ॥ जांभई देत असे हरी ॥ तंव नरसिंहु जीउती उदरीं ॥ मग देखीला मुरारी ॥ ते विस्मीतें जाली ॥ ७९ ॥ म्हणें हें कवणेपरीचे लेंकरूं ॥ येणें उपजतची मारिले माहासुरू ॥ काइ हा होईल परमेश्वरू ॥ कीं दैत्य दानवीं मानवी ॥ ८० ॥ कवणे येके दिवसीं ॥ नंदु बैसला देव पूजेसी ॥ तेथें नैवेदु देवासी ॥ समर्पिला ॥८१ ॥ तेथें धांवोनी आला (हरी) ॥ गुळ दे म्हणती मुख पसरी ॥ येरू म्हणें बा स्वीकारी[1] ॥ म्हणौनि मुखाभींतरी घातला ॥ ८९ ॥ सवेची सकळ देवांच्या मूर्ती ॥ त्याहीं घातल्या मुखाप्रती ॥ नंद धरावया धांवती ॥ तंव तो पती[2] पळाला ॥ ८३ ॥ धांवोनि धरूं जाये ॥ जवं तो अदृष्ट होये ॥ नंदु भोंवतें पाहे ॥ तंव उभा राहे पाठीसी ॥ ८४ ॥ पुनरपी धांवोनी धरी हातीं ॥ म्हणें बा कृष्णा देव डोळे फोडिती ॥ मुष्टी आंगोळिया घालिती ॥ तवं पसरी मुखातें ॥ ८५ ॥ येशोदा मुखी पाहिलें ॥ तव उदरी त्रिभुवन देखिले ॥ सकळ देव बैसले ॥ तपती चंद्र सूर्यो ॥ ८६ ॥ गण गंधर्व किन्नर ॥ आणिक ब्रम्हादिक सुरवर ॥ राजे भूपाळ नृपवर ॥ आणि अपार गिरी पर्वत ॥ ७७ ॥ तें देखोनि माता दचकली ॥ भोवडी येउनी पडली ॥ नंदु म्हणें देवतें गिळीली ॥ ऐसें अपसर लेंकरु हें ॥ ८८ ॥ तो म्हणें काय जालें ॥ मुखाभीतरी नंदें पाहिलें ॥ तंव तैसेचि देखिलें ॥

---

१ मुळात स्वकरी पाठ घेतला आहे.

२ पळाला बाहेरी — पाठ.

मग लागला चरणासी ॥ ८९ ॥ म्हणे हे लेंकरू ॥ आणि हा अवतरलासें परमेश्वरू ॥ तंव दीधला हास्ये करु ॥ देवें[१] उगळोनियां ॥९०॥ आणिक येके दिवसी ॥ नंदु निघाला आंगोळिसी ॥ दूत होतें येमुनेसी ॥ ते वरुणाचे राखणाईत ॥ ९१ ॥ नंद अरुणोदई गेला ॥ तो दूतासी वरपडला ॥ तो धरुनी नेला ॥ वरुणाजवळी ॥ ९२ ॥ वरुण सकळ उदकाचा राजा ॥ तेणें नंदु राखिला वरविया वोजा ॥ मग वोभाट त्याचा ॥ जाळा गोकुळीं ॥ ९३ ॥ म्हणती नंदु गेला येमुनें ॥ तेथुन नेला कवणें ॥ व्याग्र जालीं मनें ॥ करिती रोजना ॥ ९४ ॥ नंद गोकुळींचा रावो ॥ आतां कवण करील तयाचा ठावो ॥ या कृष्णाचा गुण पाहा हो ॥ भुदल धुरुची बुडाली ॥ ९५ ॥ तेचि मांभळभटु वोलिला ॥ जो हा मुळीं लागला तो वोल साच जाला ॥ तंव हांसत धांवीनला ॥ तो कृष्णनाथु ॥९६॥ म्हणे तुम्हीं बोलतां समस्ते ॥ आतां आज्ञा द्यावी माते ॥ मीं आणिन राया नंदाते ॥ तुम्ही येथेंचि असिजे ॥ ९७ ॥ यैसें बोलोनि उडी घातली ॥ ते डोहीं बूडी दीधली ॥ वरुणाची नगरी टाकिली ॥ तंव धनवटली सभा तयाची ॥ ९८ ॥ च्यारी लक्षे मेघ माळा ॥ आणि सागर सारता सकळा ॥ जळींची जळ देवता विशाळा ॥ बैसले तेथें ॥ ९९ ॥ सकळीकीं कृष्ण देखिला ॥ म्हणती हा परमेश्वरू केवीं आला ॥ मग रायें नमस्कारू केला ॥ बैसविला रत्नसिंहासनी ॥ ४०० ॥ मग चरण प्रक्षाळुनी वंदीती ॥ गंधाक्षता समर्पिती ॥ नाना पुष्प याती आनीती ॥ यैश्या श्रीपती पूजिला ॥ १ ॥ मग वरुण देवो पुढें उभा राहे ॥ कर जोडुनी विनवितु आहे ॥ तु सकळांचा पिता मायें ॥ कवणा कार्यीं बीजें केलें ॥ २ ॥ तंव कृष्ण बोलता ॥ मी परमेश्वरू अवतरलों मृत्यलोकांत ॥ वसुदेव देवकी माता ॥ तीहीं गोकुळीं ठेविलों ॥ ३ ॥ नंद आम्हीं मानिला पिता ॥ यशोदा धर्ममाता ॥ तो आंगोळी करितां ॥ सांपडला दूतां तुमचिया ॥ ४ ॥ त्या कारणें येणें जालें ॥ येरू म्हणे तरि माझें दैव उदैलें ॥ तुं देवा न सांपडेसी कवणें बोलें ॥ तो तुं घर पुसत आलासी ॥ ५ ॥ साहीं शास्त्रां अठरा पुराणा ॥ चतुर्वेदा साही दरुषना ॥ तीर्था व्रता दाना ॥ तु कवणाही न भेटसी ॥ ६ ॥ तुं परमेश्वरू निराकारू ॥ तो तु जालासी मनुष्यवेषधरू ॥ तुवां केला अवतारू ॥ भगत उधरावया ॥ ७ ॥ तुज गोकुळा येणें जाले कंसा कारणें ॥ दैत्यें राक्षेस वधणें ॥ राखणें साधुसंतातें ॥ ८ ॥ देवा तुं व्यापकु सवस्वरू ॥ पाहतां तरि निराकारू ॥ तुवा केला अवतारू ॥ भक्ताकारणें ॥९॥ देवा तुझिये घरीची कामारी ॥ ते अनंते ब्रह्मांडे आकारी ॥

१ ते वेळी अवधारा—पाठ.

आणि ब्रह्मा आनतें[1] त्रिपुरारी ॥ तेणें अपमानिलें ॥ १० ॥ देवा तुवा धुरू अढळपदी बैसविला ॥ आणि अळर्कीचा ताप दूरी केला ॥ द्वारपाळां श्राप दीधला ॥ येणें महादेवें ॥ ११ ॥ त्यासी उद्धरावया कारणें ॥ आणि कंसासुरा मुक्ती देणे ॥ पांडवांचा प्रतिपाळ करणे ॥ स्थापने ऋषी आश्रम ॥ १२ ॥ दैत्यीं गांजिली वसुंधरा ॥ तीवरी दुष्टा दुर्जनाचा भारा ॥ म्हणउनी आवतारा ॥ केल दवराये ॥ १३ ॥ तुं भक्ती मुक्ती दायकु ॥ आणिया येकवीसां स्वर्गांचा नायकु ॥ आम्हा सकळांचा पाळकु ॥ तुंची देवा ॥ १४ ॥ म्हणउनी येणे जाले ॥ आतां करी विंदाणे ॥ राक्षस दैत्ये निर्दाळणे ॥ उद्धरणे यादवकुळ ॥ १५ ॥ मीं देवा तुझाची स्थापिला ॥ आणि तुं देवा सकळ देवांचा वापुला ॥ सकळ जीवासी येकला ॥ तुंची मातापिता ॥ १६ ॥ देवा तुवां मनुष्येरूप धरीले ॥ जन नोळखेची भुळले ॥ माझे अनुचित जाले ॥ ते क्षमा करावें जीं ॥ १७ ॥ त्राहे त्राहे गुणनिदाना ॥ म्हणौनि वरुण लागला चरणां ॥ तैसेची नंदाची संमोरवना ॥ केली वरुणें ॥ १८ ॥ नंदा राया तुवां पूर्वीं कवण दैव केले ॥ जे परब्रह्म पुत्रत्वें स्वीकरिलें ॥ येणें कोटी कुळे उध्दरिलें ॥ जगीं तुंची धन्यें ॥ १९ ॥ हे त्रिभुवन जयांचा उदरीं ॥ तों लेंकरू होउनी खेळे घरी ॥ आतां मजवरी कृपा करीं ॥ कोप न धरावा ॥२०॥ मग उठिले कृष्णनाथु ॥ तंव समस्ती केला प्रणिपातु ॥ तेथ क्षण येक न भरतु ॥ आले गोकुळांसीं ॥ २१ ॥ तेथे नगरीच्या लोकांसीं उछावो जाला ॥ म्हणती नंदु कृष्णे आणीला ॥ जनु विस्मित जाला ॥ नंदासी कळला ई परमेश्वरू ॥ २२ ॥ मग नंदु म्हण येशोदेप्रतिं ॥ मज नेले वरुणाचा दूतीं ॥ यैसा कवणु आहे क्षितीं ॥ जो मज सोडविल ॥ २३ ॥ तेथें कृष्ण आला ॥ वरुणें स्वकरीं पुजीला ॥ चरणा लागोनी संतोषविला ॥ मग वर्णिला बहुवसु ॥ २४ ॥ आमतें हीं बहुतां रीतीं ॥ वरुणें केली विनंती ॥ हा अवतरला कैवल्यपती ॥ कवणाप्रति न सांगावा ॥ २५ ॥ आणिक येके वेळी ॥ दूध उतलें प्रातःकाळीं ॥ ते न सावरेची उकळीं ॥ तेथें वनमाळी धांवीनला ॥ २६ ॥ दूध वोरपे जळत जळतां ॥ वा पोळसी म्हणौनी धांवे माता ॥ तंव तो न म्हाहे[2] वारितां ॥ उचलुनी तोंडी लावीयेलें ॥ २७ ॥ मग चुलीवरी भांडे ठेविलें गोपीनाथें ॥ तंव तें भरलें असे मागतें ॥ यैसें पवाडें अनंतें ॥ गोकुळीं केलें ॥ २८ ॥ गुसलितां धांवें जवळीकें ॥ तंव माता भेडसावी कवतीकें ॥ जातां देखिलें

---

१ विष्णु – पाठ.

२ राहे.

पानीयां मातेतें ॥ मग कृष्ण गीगाला डेरीयांतु ॥ २९ ॥ कृष्ण बाहेरी गेला म्हणोनी तांतडी ॥ येशोदा गुसळी लवडसाडी ॥ तंव नवनीताचिया कोडी ॥ अगनीत सांचीनलीया ॥ ३० ॥ मग सकळां मिळोनि गौळणी ॥ भरील्या असती रांजणी ॥ वीस्मो करितातो मनी ॥ आजी ऐसें केवीं जाले ॥३१॥ तंव तो मुरारी ॥ निघाला डेरिया बाहेरी ॥ माता विस्मो करी ॥ सीनलासी बा म्हणोनीयां ॥ ३२ ॥ आतां खेळों जाइल बाहेरी ॥ चोरी रीघे घरोघरी ॥ राखन वैसती घरोवरी ॥ कोंडीती नारी घरामाजी ॥ ३३॥ म्हणती सांपडला गे हरी ॥ तंव तो बैसला सींकीयावरी ॥ दही दूध कवणेपरी ॥ दोहीं करी खातु असे ॥ ३४ ॥ येकी धांउनीं धरिती चरणी ॥ आफळीती धरणी ॥ तो उठोनि जाय पळोनी ॥ घराबाहेरी ॥३५॥ येकी म्हणती जाउ द्या गे परता ॥ तंव दुसरा देखती खाता ॥ अगे हा कवण्या वाटा मागुता ॥ आला असें ॥ ३६ ॥ तोहीं धरूनियां मागुता आफटीला ॥ तंव तीसरा देखिला ॥ तोही उत्तरिला ॥ तंव देखिला चौथा ॥ ३७ ॥ यैसा कृष्णची विस्तारला ॥ त्याचा बोभाट येशोदेपासी नेला ॥ तंव तो पालखांत निजैला ॥ परिये देत येस्वदा ॥ ३८ ॥ म्हणती दहीं दूध नवनीत ॥ माय खादलें गे बहुत ॥ तंव येशोदा म्हणे पाळनीयांत ॥ निजैला पाहीं ॥ ३९ ॥ त्या मागल्या घरा जाती ॥ तंव दही दूध तैसेंचि देखती ॥ मग म्हणती हा श्रीपती ॥ कौसाल्येमलु ॥ ४० ॥ यैसाची घरोघरीं ॥ बोभाट आणीती नगरनारी ॥ मग येशोदा बांधे हरी ॥ दावयानें ॥ ४१ ॥ त्याचा पावो बांधोनि करें ॥ तंव ते दावें पायासी नुपुरें ॥ मग आणि दुसरें॥ तेहीं नुपुरे वाढे पावो ॥ ४२ ॥ आनीक दावीं मेळउं जाये ॥ तंव तो पावो वाढतुची आहे ॥ मग दामोदर नाव होये ॥ या पासुनियां ॥ ४३ ॥ अैसा गोकुळी खेळीनला लीळा ॥ तंव नंदु म्हणे हा नव्हे भला ॥ म्हणोनियां वासुरवांसांगातें दीधला[1] ॥ गोवळे सांगाती दीधले ॥ ४४ ॥ तंव कंसें म्हणितले वीरांसी ॥ कृष्ण असे तो वासुरवांपासीं ॥ कांहीं चींता रे तयासी ॥ जेणें मरण पावें ॥ ४५ ॥ तंव म्हणे पावक वीरू ॥ मीं करीन त्याचा संव्हारू ॥ बहुत नोवलें वडीवारू ॥ म्हणोनि तेणें विडा घेतला ॥ ४६ ॥ तो येमुनेचे पावळीं ॥ खेळत होता वनमाळीं ॥ वासुरवें आणि गोवळी ॥ सर्वे असती ॥ ४७ ॥ तेथें पावक प्रज्वळला ॥ तो वोनवा आकाशीं लागला ॥ वन जाळित निघाला ॥ कृष्ण रायावरी ॥ ४८ ॥ वत्सें गोवळीं सकळी ॥ त्यांची करावी जव होळीं ॥ तंव कृष्णें पीटुन टाळी ॥ ना भी म्हणतो सकळांसी ॥ ४९ ॥

१ धाडिला – पाट

७५८९०
(२५) २०४८ 2213

मग कृष्णें मुख पसरौनी धांवीनला ।। वोनवा समग्री गिळिला ।। गौळिया वीस्मों जाला ।। म्हणती हा कान्हों भला सांगाती ।। ५० ।। येसा पावकु गिळिला ।। तंव कंसासुरा दचकु पडीला ।। आतां हा नव्हे भला ।। चिंतावला तो रावो ।। ५१ ।। तंव बगासुरें माहावीरें ।। बोलिला प्रतिवादाचीं उत्तरें ।। उडी घातली येकसरें ।। वाहे आफळुनी धांवतु असे ।। ५२ ।। म्हणें मज कोपल्यां बगासुरा ।। गिळीन सप्तांहीं सागरां ।। फुटाने करीन डोंगरा ।। तेथें त्या लेंकुरा कैचा ठावो ।। ५३ ।। मग म्हणें कंस केसिया ।। तु आमचां रा वाहीया ।। (मग म्हणे) हे कार्य सखया ।। करी आतां ।। ५४ ।। हात विडया वोडवीला ।। येरें आदरेंची दीधला ।। मग आज्ञा घेउनी निघाला ।। तो आला यमुनातीरासी ।। ५५ ।। तेथें वत्सें गोपाळांसी ।। खेळतसें रुषी-केसी ।। बगु ध्यान धरुनी जाला तापसी ।। निश्चित निर्मळ ।। ५६ ।। नेत्र उघडुनि पाहे वास ।। म्हणें जवळी येतांची करीन ग्रास ।। तंव वोळखिले त्या कपटियास ।। तेणें कृष्णनाथे ।। ५७ ।। म्हणें हा बगासुरू ।। आला असैल आमचा संहार करूं ।। म्हणें हे वापुडें पाखरूं ।। कां मरणा धरणे वैसले असे ।। तंव श्रीकृष्ण जवळी गेला ।। तंव तो मुख पसरोनि धांवि-नला ।। येरें येतांची लक्षीला ।। तो हाणितला चपेटघातें ।। ५९ ।। तेणे गेला तो चांचरी ।। तंव कृष्णें मागुता धरिला झडकरी ।। चांचु धरुनी उभा चिरी ।। करी दोन सकलें ।। ६० ।। बगासुर मारिला देखोन ।। कंसासुरें झाडीलें दोन्ही कान ।। आतां मांडले निर्वाण ।। यातें कवण आकळील ।। ६१ ।। मग कंस म्हणें वीरांप्रती ।। वीरश्रीया कोठें न माती ।। देसवळी ते खाती ।। आंती कवणी न येति कामासी ।। ६२ ।। अरे या गवळियाच्या लेंकरू ।। याचें माथाचा वाळला नाहीं जारू ।। तेणें मारिले सकळ वीरु ।। कवणा संव्हार याचा नव्हेंची ।। ६३ ।। गाडीये[1] भ्याड जीतुके असती ।। ते लटिकाची मठारा[2] धरिती ।। मज ठकुनी खाती ।। आतां येकुही कामा नये ।। ६४ ।। हा शब्द कंस बोलिला भेदकु ।। तंव जळपला तो धेनुकु ।। म्हणे मज कोपला या मृत्यलोकु ।। आहारा न पुरे ।। ६५ ।। मीं शिंगें रोउनियां क्षिती ।। करीन पृथ्वी पालथी ।। कीं मेरु शिखरें परती ।। दूरी सांडुं ।। ६६ ।। कीं भरू सागराचा घोटु ।। किं काळ महाकाळाते अपटु ।। कीं सकळांतें लाटु ।। निवाड न करितां ।। ६७ ।। तंव कंसासुर म्हणें भला रे भला ।। तुझा प्रतिवाद आतां कळला ।। तो बहुता रीती सन्मानिला ।। मग तो पाठविला गोकुळासी ।। ६९ ।। तंव धेनुकु विचारी मानसीं ।। नवलक्ष गोधनें या नंदासी ।। मीं असैन त्या कळपेंसीं ।।

१ गाठिये भेंड – पाठ.

२ मगरा – पाठ.

बसवा होउनी ॥ ६९ ॥ मग नंदाचे गाउळीं ॥ प्रवेशला साईकाळीं ॥ तवं देखिला वनमाळी ॥ खेळतां अंगनीं ॥ ७० ॥ कुरुळा[1] करावया-लागुनी ॥ वरी मान घाली जाउनी ॥ येरें वोळखिला ततक्षणीं ॥ तो दूरुनीची हाकीला ॥ ७१ ॥ येरु धांवीनला वरी ॥ आणि थडका हानीतला उरावरी ॥ तेणें दणदणाट उठिला अंबरी ॥ नादें धरत्री थरारिली ॥ ७२ ॥ आणि शिंगाचेन चपेटघातें ॥ काढुं पाहे कृष्णाची पोटीचीं आतें ॥ तंव देवरायें हाणितलेंनी घातें ॥ तेणें त्यासी मूर्छेना[2] आली ॥ ७३ ॥ पुनरपी हाणितला वर्मी ॥ पुसीं धरूनी उचलीला गगनीं ॥ घडी येकी भोवोंडोनी ॥ धरणीयेवरी आफटिला ॥ ७४ ॥ वधुनी धेनुकु वीरु ॥ तंव नंदु म्हणें अपघातु चुकला थोरू ॥ हा बळिया नंद कुमरु ॥ धेनुकु वीरू सामान्य नव्हे ॥ ७५ ॥ तंव कंसें अैकिली मातु ॥ विजया जाला नंदसुतु ॥ सकळ जन विस्मों करितु ॥ थोर पुरुषार्थ या बाळकाचा ॥ ७६ ॥ कंस पाहे जवं वास ॥ तंव क्रोध आलासे सकटासुरास ॥ कृष्ण मारितां प्रयास ॥ कायसेया लागती ॥ ७७ ॥ तो खेळतो गाडीयाचा खेळू ॥ मेळउनी गोवळांचा मेळु ॥ तथां मीं होईन चक्रतळु ॥ मग तो भुपाळु सींतरीन ॥ ७८ ॥ ययैसीं पैजा बोलोनीं निघाला ॥ गोकुळी (गाडा) होउनी राहिला ॥ तेथें श्रीकृष्ण खेळतु आला ॥ तंव तो वोळखिला सकटासुरु ॥७९॥ विचारी मनाभीतरी ॥ हा कृष्ण वैसला मजवरी ॥ मीं उलथोनीं त्याची करीन चुरी ॥ काय करील त्याचें बळ ॥ ८० ॥ त्याची कृष्णें मात्र जाणोनि ॥ वरी बैसला धांवोनी ॥ भारें कडाडीली मेदनीं ॥ चक्रे दोन्ही चूर्ण जाली ॥ ८१ ॥ उदरीं पृथ्वीसारिखि अपारें ॥ तेथें कैसेनी तरावें सकटासुरें ॥ तो चरणघातें करूनी पुरें ॥ मात मथुरे गेली देखा ॥ ८२ ॥ भारे फुटला सकटासुरु ॥ मग चिंता करी कंसासुरु ॥ इतुका आमचा परिवारू ॥ परी येकुही घडु नाहीं ॥ ८३ ॥ तंव प्रळंब म्हणें कंसासुरा ॥ मीं आंत्राळीचा[3] प्रळंब दुसरा ॥ माझ्या धुधुदकारा ॥ पुढें न धरती कवणी ॥ ८४ ॥ मज आज्ञा दीजे ॥ आणि माझें कवतीक पाहिजें ॥ तंव मानवलें कंसराजे । येणें काजें बहुतें केली ॥ ८५ ॥ तो प्रवेशला गोकुळामाझारीं ॥ तंव नंदे बळीभद्र केला सा ( हा ) कारी ॥ या कृष्णाचा कंसु वैरी ॥ याजवळी तुवां असावें ॥ ८६ ॥ मग रामकृष्ण दोघेजन ॥ वडजा वांकुडा सुदामा जाणा ॥ वत्सें राखती येमुना- ॥ तटीं खेळत होते ॥८७॥

---

१ कुरवाळा – पाठ.

२ मूर्छना.

३ अंतराळीचा. अंतकाळीचा–पाठ.

प्रळंव विचारी मनीं ॥ यासी पाठीराखा वळीभद्र होउनी ॥ हे दोघे क्षत्रियां सिरोमणीं ॥ आतां येकुची वुडोनी नेउं गगनां ॥ ८८ ॥ अवचिता पडिला वरी ॥ वाहांटुळी भोंवें चक्रांकरी ॥ सीळा सीखरें गगनावरी ॥ उडौनी जाती ॥ ८९ ॥ म्हणती बळीभद्र गेला रे गेला ॥ तो वायोचक्रीं पडिला ॥ तंव कृष्णनाथु उडाला ॥ तेणें धरिला धांवोनीं ॥ ९० ॥ मीठी पडिली प्रळंवाचे कंठी ॥ मग कुंडी नीर्जीउ होउनी पडिली हंटी (?) ॥ वलिभद्र जगजेठी ॥ विजया जाला ॥ ९१ ॥ सांगीतलें कंसाप्रति ॥ आणि दुःख प्रवंतलें त्यांचा चित्तीं ॥ जे जे नांवांचें सूर जाती ॥ तितुकें गती पावलें ॥ ९२ ॥ आतां कवणु आहे जुंझारू ॥ तेणें मारिले नांवनीगे वीरू ॥ आतां उरला नुसधा केरू ॥ मुदले धुरेवांचौनिया ॥ ९३ ॥ हे वचन ऐकिलें ॥ जैसे अग्निवरि तेल पडीलें ॥ तैसे देह धडाडिलें ॥ आघासुराचें ॥ ९४ ॥ म्हणें राया वोलिलासी उणे उतरा ॥ सरी करितोसी सिंहा आणि कुंजरा ॥ नखा आणि हातियेरा ॥ केवि सरी पडु होये ॥ ९५ ॥ डोंगरा आणि वारुळा ॥ शेपा आणि विरुळा ॥ येकु सागरू ना नदी सकळा ॥ काय करावी या राया कंसा ॥ ९६ ॥ मीं येकलाची आघासुरू ॥ सकळ तुझा परिवारु ॥ आतांचि नंदाचा कुमरू ॥ गिळीन पां गौवळयांसहित ॥ ९७ ॥ ऐसें बोलोनि निघाला ॥ वृंदावनीं मार्गीं राहिला ॥ मग महा पर्वतु वाढींनला ॥ देखिले तेणें कृष्णनाथें ॥ ९८ ॥ तेणें मुख पसरिलें विशाळ ॥ पाठीं दिसे पर्वतमाळा ॥ डोंगरू कडा फांपट मौंजाळ ॥ तैसें उदर दिसत असे ॥ ९९ ॥ तंव वांसुरवांची मोहोरी आली ॥ ती आगासुराचा मुखी प्रवेशली ॥ तंव गोवळी देखोनि भुळली ॥ म्हणती हा सर्प की डोंगरू ॥ ५०० ॥ नवलक्ष वासुरवें भीतरी गेली ॥ त्यासवें पांचशतें गोवळेंही रीगाली ॥ तवं कृष्णानाथें माव देखिली ॥ माझी गिळिली वासुरवें ॥ १ ॥ तो कृष्णरायाची वाट पाहे ॥ मुख पसरीलेची आहे ॥ मग देवे पीटोनी याहे ॥ म्हणें राहे रे राहे कपटिया ॥ २ ॥ जरी तुज लात हाणोनी मारूं ॥ तरी माझयांचा होईल संहारू ॥ ऐसे विचारुनी सर्वेश्वरू ॥ उदरीं प्रवेशला ॥ ३ ॥ जैसे संसारामाजी अवत्रोनु[1] ॥ उद्धरील भक्तजनु ॥ तैसे तया सर्पमुखामाजो रीगोनु ॥ आपुली रक्षिता जाला ॥ ४ ॥ तंव आघासुरें मुख बैसाविलें ॥ तेथें गोपाळी कृष्णातें देखिलें ॥ म्हणती देवा हे काइ जाले ॥ काकुळिती झोंबीनली गळीयासी ॥ ५ ॥ तंव कंसु थोर हरिकेला ॥ म्हणें कृष्ण आघासुरें गीळीला ॥ दैत्या भनी हरीकु जाला ॥ म्हणें हा बुद्धीया भला आघासुरू ॥ ६ ॥ देव पाहती अंतराळी ॥ तेहीं पीटली येकी टाळी ॥ आतां दैत्यातें आकळी ॥ येमा कवणु असें ॥ ७ ॥ म्हणती हा पूर्ण अवतारू ॥ करावया दैत्यांचा संहारू ॥ अवतरला सर्वेश्वरु ॥ तो या आधासुरें गीळिला ॥ ८ ॥

१ अवतरोनु.

ऐसी देवासी चिंता करितां ॥ तंव गोवळे म्हणती जी कृष्णनाथा ॥ (आता आम्ही न वाचो समर्था ॥) तुजकरितां गेलों जीवें ॥ ९ ॥ देखत देखतांची आम्हीं आंधळें जालों ॥ तुझिये संगती बुडालो॥ आजी ठकलो ॥ बहुता दिसा ॥ १० ॥ येक म्हणती तुं बळीयाडा ॥ म्हणोनि निघालों या सर्पमुखांपुढां ॥ कृष्णाभोंवता वेढा ॥ पढिला गोपाळांचां ॥ ११ ॥ येक म्हणती बा तुज असतां ॥ कासया लागैल चिंत्ता ॥ तुंची राखता मातापिता ॥ आमचा तुं ॥ १२ ॥ यावरी हांसोनि देवो म्हणें ॥ नाभी नाभी क्षण एकु राहणें ॥ मग काय केलें तेणें ॥ तो आईक पां ॥ १३ ॥ भीतरी वाढीनली कृष्णमूर्ती ॥ तेणें दैत्यांचीया कडाडीलीया अस्थी ॥ खुंटली मनपवनाची गती ॥ श्वास उश्वास कोंडला ॥१४॥ करूं जाये चळण वळण ॥ तंव जड जाला पृथ्वीहुन ॥ उदरीं जाला अती गहण ॥ उदर तडाडुनी उतटिलें ॥ १५ ॥ आघासुरें आत्मा सांडिला ॥ कृष्ण परमात्मा बाहेरी निघाला ॥ वल्हे गोपाळां आनंदु जाला ॥ देखिला आघासुरू ॥ १६ ॥ प्राण त्याचा असे गेला ॥ परी न पहावें गोपाळां ॥ पुसांपासोनी माथा मोवीला ॥ तंव सात योजनें ॥ १७ ॥ उंच योजनें एक ॥ कोस तीन पसरलें मुख ॥ दांत कोस कोस विभ्रंश ॥ डोळे आरक्त विशाळ देखा ॥१८॥ यैसा भयानक रूप देखौनी॥ देव आनंदले गगनीं ॥ विजया जाला चक्रपाणी ॥ पुष्पें वर्गीसौनी नमियेला ॥ १९ ॥ देवांसी उछावो जाला ॥ दैत्यांसी बचकु पडीला ॥ येव्हढा दैत्यें जेणें उतटिला ॥ तो सामन्य नव्हे ॥ २० ॥ तंव कंसें पीटीले लल्हाटु ॥ सकळीक करिती बोभाटु ॥ (म्हणती) कृष्ण आदटु ॥ नागवे आंम्हां ॥ २१ ॥ मग कृष्णाचें सामर्थें पाहावया ॥ पाठविलीया नंद राया ॥ वेंठी वळावया ॥ वाळूवेचिया ॥ २२ ॥ घागरीये कोहळे । न फोडीता काहाडीजे घागरी-वेगळे ॥ नातरी पैज हरविली गोपाळें । ऐसे जाण पां[1] ॥ २३ ॥ ते देखोनी चिंतावला नंदुराज ॥ हे कोडें न सुगवे मज । ऐकोनी बोलिला पैज ॥ तो कृष्णनाथु ॥ २४ ॥ नंद मोवी कोहाळें ॥ तंव ते केलें घागरीवेगळे ॥ वेंठी वळुनियां गोपाळें ॥ वाळुवेचीया पाठीविलीया ॥ २५ ॥ तंव कंसु जाला चिंताग्रस्तु ॥ पवाडे करुनी अनंतु ॥ प्रकटली हे मातु ॥ त्रिभुवनामाझारी ॥ २६ ॥ आतां गाई चारावया ॥ जात असें नंदाचा कान्हया ॥ पांच शतें गोपाळ मिळोनियां ॥ जात असें वासरूवें चारावया ॥ २७ ॥ कृष्णातें विनविलें गोपाळी ॥ या खेळों चेंडू फळी ॥ गाई सोडु यमुने पाबळी ॥ चैंडुफळी खेळों आदरिली ॥ २८ ॥ वडजा वांकुडा पेंधा सुदामा ॥ ते म्हणती तुं नागवेसी आम्हां ॥ आम्हा समस्ताचा समा ॥ तुं येकलाची होयें

१ दुसऱ्या पाठातून घेतली आहे. मुळांत ओवी अर्धवट आहे.

॥ २९ ॥ तरि देवो म्हणें आधीं डावो आमचा ॥ गोपाळ म्हणती चेंडू झेलुं तुमचा ॥ तरि होई रे सावचिता ॥ टोंला झेला-रे गोपाळ हो ॥ ३० ॥ मग हाक देऊनी गर्जिनलें ॥ येक बाहे आफटोनी मांडले ॥ येक डागा झेलीत पावलें ॥ राहिलें ठाई ठाई ॥ ३१ ॥ टाकिती कांवळी झेलिती डागा ॥ म्हणती हाण हाण गा रंगा ॥ फळी धरुन वेंगा ॥ वोथरलें समस्त ॥ ३२ ॥ तंव चेंडु सत्राणें हाणितला ॥ त्या टोल्याचा तडकु गर्जिनला ॥ तो चेंडू गगना उसलला ॥ आकाशमार्गें जातुसें ॥ ३३ ॥ चेंडुवाचा झुंजकारू ॥ तेणें कान जालें बहिरु ॥ तो नाद येक पाहरु ॥ येकताचि होतें ॥ ३४ ॥ चेंडु गेला आकाशमार्गें ॥ तंव गोपाळ धांवती वेगें ॥ चेंडुवाचेनी मार्गें ॥ तंव चेंडु वेगा गेला देखा ॥ ३५ ॥ चेंडु अडकला कळंबाचे डाहळी ॥ यमुनेचा डोहो भोंवे तळी ॥ तो भोंवरा खळाली ॥ (महा) भयासुर ॥ ३६ ॥ तंव ते वृक्ष अपार ॥ दिशा पडिला अंधकार ॥ ते डोही विखार ॥ काळया असें ॥ ३७ ॥ तो सहस्रमुखी महाकाळु ॥ तो डोहीचें केवळु ॥ लोक उपद्रवीले सकळु ॥ त्याचिया परिवारें ॥३८॥ ते डोही श्वापदे न[1] (जाती) जाली॥ त्या काळयातें देखोनी पळाली ॥ मग अभये देउनि अस्वासीली ॥ त्या काळयानें ॥ ३९ ॥ गोवळें म्हणती हरी ॥ चेंडु आडकळा कळंबावरी ॥ आणि हा डोहो वीखारी ॥ भरला असे ॥ ४० ॥ तेथें काळया विखारु ॥ ये डोहीं नांदतो राज्यधरू ॥ हे उदक नये स्वीकारु ॥ धुदकार नाईकवें जी ॥ ४१ ॥ तंव कृष्ण म्हणें सवंगड्यांप्रती ॥ येणें उपद्रविले क्षिती ॥ याचा पराक्रम किती ॥ सांडुनी जावों ॥ ४२ ॥ म्हणोनि देव वेघला त्ररी ॥ चेंडु न पावे त्याचें करीं ॥ मग तो पडिला भोंवरी ॥ येमुनेचा ॥ ४३ ॥ चेंडुबासरीसी उडी घातली ॥ तंव चेंडु जात देखिला पाताळी ॥ तंव तेणेंचि मार्गे वनमाळी ॥ जातो निःसंग परियेसा ॥ ४४ ॥ चेंडु पडिला काळाचे भुवनीं ॥ तेथें वरपडल्या सेखाचिया नागीनी ॥ तंव त्या विस्मो करिती मनी ॥ चेंडु नवरत्नीं शोभतसें ॥ ४५ ॥ तंव मागाची देखिला नंदकुमरू ॥ म्हणती तूं कवणाचें रें लेंकरू ॥ येथें काळया विखारू ॥ त्या वरपडा होसील तुं ॥ ४६ ॥ तंव म्हणती सेखाचिया राणीया ॥ वेगी पळ रें तान्हया ॥ तों तुज न सोडी देखिलिया ॥ पळ वेगीं ॥ ४७ ॥ तंव देव म्हणें सुंदरी ॥ माझा चेंडु देई कां वो झडकरी ॥ नेंदी तरी मुखें चीरी ॥ काळयाची ॥ ४८ ॥ तंव हांसोन बोलती बाळया ॥ म्हणती अरे मूर्खा गोवळया॥ मरावया[2]॥ कां धरणें बैसलासी ॥४९॥ अरे तुं मानवीयाचें लेंकरुं ॥

१ नव जाय–पाठ.

२ मुळांत तुज मरण पावावया–पाठ.

धाकुटेंची आणी सुकुमारू ॥ आणि हा विष्णुचा अवतारू ॥ क्षीरसागरींचा ॥ ५० ॥ हा महाकाळ ॥ याचे मुखीहुनी नियती जाळ ॥ वीखाचे कलोळ ॥ मुखें सहस्रें ॥ ५१ ॥ तंव कृष्ण म्हणती आलों याचि कारणें ॥ मज त्यासी संव दृष्टी होणें ॥ सरन[1] आलीयां राखणें ॥ का सीक लावणें दुष्टासी ॥ ५२ ॥ ऐसा शेषे शब्द आइकीला ॥ तंव काळया तेथुनी बोलिला ॥ आतां जीवदान तुजला ॥ दीधलें पळ वेगी ॥ ६३ ॥ अरे चेंडू देई का संग्राम करी ॥ आसरा धरूनी बोलती थोरी ॥ धड शब्द नाहीं मुखाभीतरी ॥ उदरीं वीसें[2] वसे ॥ ५४ ॥ ऐसे तुं बाहें अभ्यंतरी खोटें ॥ तुझें उदरीं भरले काळकुटे ॥ हात पायें नुसधे थोटें ॥ तोंडें लाठें दुर्जी[3] मेंतुं ॥ ५५ ॥ तुं तोंडीचे रे बासर ॥ आणि दुर्जीभों रे अपसर ॥ स्त्रीयाचेनी आसर उतर ॥ बोलसी चावटा ॥ ५६ ॥ अरे माझा चेंडू राखसी ॥ आणि मजच मारीन म्हणतोसी ॥ आतां कळेल रे आम्हासीं ॥ तुं जीवासीं मुकसील रे मुर्खा ॥ ५७ ॥ अरे तुज सीक लावया वीखारा ॥ मजहुनी नाही रें दुसरा ॥ मग तो खवळला या उत्तरा ॥ म्हणे रे[4] धरा रे धरा गीळीन सगळाची ॥ ५८ ॥ सहस्रमुखें पसरोनी ॥ प्रजळला मुखीचा अग्नी ॥ हाणत असें सहस्रफणी ॥ येरें धरूनी आफटिला ॥५९॥ मग खवळला महाकाळु ॥ पुनरपि गीवसीला गोपाळु ॥ सेष उचलोनी अंत्राळु ॥ पुनरपी आपटिला ॥ ६० ॥ परी तो न दाटें आदटु ॥ सहस्रमुखी वसें काळकुटु ॥ कृष्ण वज्रस्वरिरी चोखटु ॥ न चलें कांहीं तयाचें ॥ ६१ ॥ झोंबनाती वर्मा वर्मी ॥ दोघे कोंदले धुर्मी ॥ तो सेवक तो स्वामी ॥ दोघां सरी केवी होये ॥ ६२ ॥ सेपु धांवोनी हाणें मुगुटीं ॥ येरें नखें रोउनी कंठी ॥ भोवंडौनी आपटी ॥ पुनरपी उठी मागुता ॥ ६३ ॥ न कळेचि तो मुरारी ॥ मग वेठीला समस्त विषारीं ॥ नखीःवोटीः कंठीः उरींः सीरीं ॥ कानीं झोंबीनला ॥६४॥ हातीं पाई पडिली मीठीं ॥ सेप झोंबे कंठीं मुगुटीं ॥ सर्वांगी पडली वेंठीं ॥ नेत्रीं[5] कानीं सीरताती ॥ ६५ ॥ तंव कृष्ण म्हणें काळयातें ॥ तुज मज झुंझ होतें ॥ ते धांवीनली समस्तें ॥ मीं यातें न मारीं जाण ॥ ६६ ॥ पळों दे परिवारें परिवारू ॥ तुं मीं मुदल धुरू ॥ मीं न मारीं हा करू ॥ येईल आतां गरूड माझा ॥ ६७ ॥ म्हणौनी नावेंक उगाची राहिला ॥ मनीं गरूड आठविला ॥

[1] शरण.

[2] वीष.

[3] द्विजिव्ह-दोन जीभेंचा.

[4] 'रे, धरा रे' हे शब्द पाठात नाहीत.

[5] नेत्र शिरी विंदताती-पाठ.

तंव येरू पवनवेगें आला ॥ वारा पडिला गरुडाचा ॥ ६८ ॥ सर्प होते ते पळोनी गेले ॥ येक भूमीमाजि रीगाले ॥ जै सांपडले ते धरिलें ॥ मग धरिलें काळयातें ॥ ६९ ॥ तो चीरौनी टाकावा जवं वरी ॥ तंव वारीता जाला मुरारी ॥ कृष्णरावो पुंसी धरी ॥ मग मुखें करी वेगळाली ॥ ७० ॥ देवराये दपटीले[1] कंठनाळा ॥ तंव तो म्हणें हरी गोपाळा ॥ मग सोडौनी जाला वेगळा ॥ स्मरण करित असें ॥ ७१ ॥ नेत्र उघडुनि पाहिलें ॥ तंव रूप प्रकाशवंत देखिलें ॥ मग म्हणें म्या वोळखिलें ॥ रुप तुझें ॥ ७२ ॥ जी जी देवा जेधवां गरुड आला ॥ ते संगें मीयां वोळखिला ॥ मीं सेषु तुमचा कीं आथीला ॥ देवा मीं भुललो संसारा येउनी ॥ ७३ ॥ गरुडा शेषा आईक्य जालें ॥ मग कृष्णातें विनविलें ॥ मज तुवां खेळविलें ॥ लेकरूंपणें ॥७४॥ तुं सकळांचा दातारू ॥ ब्रह्मा जाणें सृष्टी करूं ॥ तो तुझें लेंकरूं ॥ तेथें पाडु कवणांचा ॥ ७५ ॥ आगा तुं अविनासु अपरांपरू ॥ तुझेंया रुपाचा नकळे निर्धारू ॥ रूसी मुनी दिगांबरू ॥ निर्धार नेणतीची पैं ॥ ७६ ॥ देवा शास्त्रा पुराणा ॥ वेवादु लागला साही दरुषणा ॥ आपलालीया मती प्रमाणा ॥ आनु पाहाती ॥ ६६ ॥ येकवीस स्वर्गें पाताळें ॥ तुझें रुप या वेगळें ॥ कवणें दैवं केलें गोकुळे ॥ रूप सांवळें खेळवीताती ॥ ७८ ॥ धन्य धन्य ते गोकुळु ॥ जेथें पर दैव रांगें तें बाळु ॥ म्हणें मीं पापीया अमंगळु ॥ तुं कनवाळु देवराया ॥ ७९ ॥ माझिया पुण्या नाहीं भिती ॥ तुं घर पुसत आलासी श्रीपती ॥ यैसी करितां आस्तुती[2] ॥ पुरें म्हणें भागलासी ॥ ८० ॥ तंव कृष्ण म्हणें काळया वीषारा ॥ मीं जरीं तोंडे फुंकीन वारा ॥ उडोन जाईल वसुंधरा ॥ तेथें तुझा पाडु कवणु ॥ ८१ ॥ आरे जयांचे जैसे बळ ॥ तैसाची खेळें खेळ ॥ ये सृष्टीसी न पुरे माझे करांगुळ ॥ तुं वृथ्या भुललासी ॥ ८२ ॥ तुं झुंझता भागलासी ॥ तंव येरु म्हणें मीं नेणेचीं ॥ जगन्नाथे मज न्यावें जीं ॥ आपुलया गोकुळा ॥ ८३ ॥ यैसें येथें वर्तलें ॥ तंव येरीकडे काय झाले ॥ गोवळे सांगावया गेलें ॥ नंदा येशोदेसी ॥ ८४ ॥ हे आईकोनी येशोदेनें (आंग) धरणीवरी घातलें ॥ म्हणें माझे तारू बुडालें ॥ जीवाचें जीवीत्व गेलें ॥ आजी माझें ॥८५॥ नंदें पीटीलें लल्हाट ॥ गौळीया जालें वाईट ॥ मग लागलें वाट ॥ येमुने डोहाचिये ॥ ८६ ॥ तया डोहाचीये कांठी ॥ येशोदा लल्हाट पीटी ॥ नंदे घातली मिठी ॥ उडी धालील म्हणोनियां ॥ ८७ ॥ ऐसा मांडला कोल्हाळ ॥ तंव देखिला गोपाळ ॥ नाथुनी माहाकाळ ॥ वरी बैसला ॥ ८८ ॥ तेथें काळयातें देखिलें ॥ तंव समस्ताचें मन कांटळलें ॥ म्हणती थोर

---

१ दडपिले–पाठ.

२ स्तुती.

अर्चियें[1] जालें ॥ मग भेटले नंदा येशोदेसी ॥ ८९ ॥ समस्तासी क्षेमा अळींगन जाली ॥ मग गोकुळाप्रती आली ॥ मथुरेसी मात गेली ॥ जे काळ्या नाथीला गोविंदे ॥ ९० ॥ राव सभामंडपासी आला ॥ तंव वंधु केसीया असे बैसला ॥ अक्रुरासी पुसता जाला ॥ आतां कवण वुद्धी करावी ॥ ९१ ॥ हा कृष्ण बळीवंत ॥ वीरांचा केला निपात ॥ राया तुम्हीं जावें त्वरित ॥ देवा इंद्रासी शरण ॥ ९२ ॥ तुमची न चले करणी ॥ तुम्हीं जावे ततक्षणी ॥ कुढावा करील वज्रपाणी ॥ तयावांचुनी नागवे हा ॥ ९३ ॥ मग कंस विमानी बैसला ॥ इंद्रावती प्रवेशला ॥ तंव येरें सन्मानिला ॥ म्हणें कवण्या कार्या वीजें केलें ॥ ९४ ॥ कंस म्हणें तुं आमचा कोवसा ॥ चींतलिया पावसी हा भरवसा ॥ येव्हडा केला वळसा ॥ ये नंदकुमरें ॥ ९५॥ सकळ वीर मारीले ॥ आणि येक राज्य करूं आदरिलें ॥ आम्हासी नव्हे भले ॥ म्हणोनि सांगावया आलों ॥ ९६ ॥ आतां स्वामी जानसी तें करीं ॥ हा आम्हासी नागवे वैरी ॥ आतां भलतया परी ॥ नीर्दाळी हा ॥ ९७ ॥ तंव इंद्र म्हणे हा अवतारू ॥ त्यासी मीं विरोध कैसा करू ॥ हा अवतरला सर्वेश्वरु ॥ तो केवि आकळैल ॥ ९८ ॥ तंव कंस म्हणे देवराया ॥ हा शब्द वोलिलासी वाया ॥ हा दैत्य अतुर्वळीया ॥ यातें देवों झनीं म्हणाल ॥ ९९ ॥ तंव इंद्र म्हणें यैसें करुं ॥ याचा पाहो निर्धारु ॥ हा असैल परमेश्वरू ॥ तरी अपश्याच जाणवैल ॥ ६०० ॥ गोवर्धनाचा पाठारी ॥ तेथें तो गोधन चारी ॥ मीं वरसैन सीळाधारी ॥ तुझा वैरी मारीन मीं ॥ १ ॥ म्हणोनि मस्तकी हात ठेविला ॥ कंस मागुता मथुरेसी आला ॥ तंव कृष्ण निघाला ॥ गोधनें चारूं ॥ २ ॥ गोधनें सोडिली गोवर्धनावरी ॥ आपण खेळें हमामा हुंबरी ॥ पावे तारफी मोंहरी॥ वाजवीते जाले ॥ ३ ॥ यैसा खेळतु नानापरी ॥ तंव तडकु फुटला अंबरी ॥ मेघ वर्षले सीळांधारी ॥ तेणें धरत्री थरारिली ॥ ४ ॥ जंव वरुते गोपाळ पाहाती ॥ तंव आकाशमार्गे सीळा येती ॥ हात पांयें चुरा होती ॥ फुटती टांगी गोपाळाची ॥ ५ ॥ गाई पळोनी आलीया ॥ आसुद्ध बोंवाळलीया ॥ वरील घाई भुळलीया ॥ तैसेंची जाले गोपाळांसी ॥ ६ ॥ गोपाळ म्हणती धांव धांव कान्हा ॥ वरुन पडती पाशान ॥ आंगीं आदळती दारूण ॥ येकासी मूर्छना येती ॥ ७ ॥ येक येताती काकुळती ॥ असुधें भडभडा वाहाती ॥ येक गळ्या झोंबती ॥ तंव (श्री)पती बोलिला ॥ ८ ॥ ना भी ना भी रे[2] अन करू ॥ धांवा रे हा डोंगर वरी धरू ॥ सीळांचा

१ आश्चर्य.

२ म्हणे दे नाभिकारू–पाट.

वरुषे पुरु ।। मग समस्त डोंगरू उचलिती ।। ९ ।। नुचलेचि गोवर्धनु ।। दणदणा आदळती पापानु ।। मग हांसीनला मदसूदनु ।। मीच गोवर्धन उचलेन ।। १० ।। परतें रे परतें म्हणें गोपाळां हरी ।। गोवर्धनु उचलिला वामा करीं ।। गाई गोवळे तयाभीतरी ।। राखियेली देवें ।। ११ ।। इंद्र वरुषें सीळाधारी ।। घाई दनानीतसे धरत्री ।। तंव वरूषती गोकुळावरी ।। माहा प्रचंड सीळा ।। १२ ।। गौळीया जाली अपरांपरी ।। इंद्र वरूषला सीळाधारी ।। आंतु वरूषे[1] घरोघरी ।। तेथें कैची उरी गौळीयासी ।। १३ ।। उपरिया धवळारें ।। शतकूट होती दामोधरें ।। पीठ[2] जाळीत नवरें ।। तंव नंदकुमरें कायें केलें ।। १४ ।। गोवर्धनु उचलुनी वाम करी ।। गोकुळ राखीलें तयाभीतरी ।। तंव इंद्र मनी विचारी ।। हा हरी रक्षेपाळु ।। १५ ।। देव पाहाती आकाशपोकळी ।। तंव कृष्णरायें लाविली डावी करांगुळी ।। पर्वत उचलिला अंत्राळीं ।। तया तळी सकळ गोकुळ राखिलें ।। १६ ।। तंव इंद्र म्हणें अनुचित जालें ।। आम्हीं विरोधु केला कंसाचेंन बोलें ।। हे परब्रह्म अवतरलें ।। मग वरुषले पुष्पवरूषाउ ।। १७ ।। नाना पुष्पजाती ।। देव कृष्णरायाची पुजा करिती ।। मग संतोषले श्रीपती ।। ठेविला गोवर्धनु ।। १८ ।। गोकुळ राखिले हा प्रतीवादु थोरु ।। नाव पावला गोवर्धनधरु ।। मग चिंतावला कंसासुरू ।। आतां विचारु काये कीजे ।। १९ ।। नंद यशोदा म्हणें हरी ।। भागलासी बा उचलितां गिरी ।। गोकुळ राखिले सीळाशिखरीं ।। विस्मो करी सकळ गोकुळ ।। २० ।। मग देवो वंदिल सकळ जनी ।। ऐसें बोलती सकळ पुराणी ।। देव बैसोनि विमानी ।। करिती पुष्पवरुपावों ।। २१ ।। मग या नंतरें काय केलें ।। नंद मथुरेसी आले ।। तें कंसासुरी पूजीलें ।। षोडश उपचारी ।। २२ ।। तेथें कृष्णरायाचा वृत्तांतु ।। कंस पूर्व कथा असे सांगतु ।। हा पराक्रमी असे समर्थु ।। येणें घात केला सकळाचा ।। २३ ।। यासी कांहीं न चले करणी ।। तुम्हीं नारदा जावें ततक्षणी ।। सांघावे ब्रह्मयालागुनी ।। माझी धांवणी कर वेगीं ।। २४ ।। मग नारद सत्यलोकास गेला ।। सर्व वृत्तांत सांगितला ।। गोकुळीं कृष्ण-रावों जन्मला ।। हा कवणु पाहिजे ।। २५ ।। तंव ब्रह्मा म्हणें नारदमुनी ।। आम्हीं पाहात असों ज्ञानी ।। सकळ सृष्टी जाली मजपासुनी ।। हा कवणी जन्मी घेतला ते न कळे ।। २६ ।। हा आम्हा विरहित ।। आणि माया विवर्जित ।। हे पुसावी मात ।। महादेवासी ।। २७ ।। मग नारद कैळासा गेला ।। तंव

---

१ वर्षे–पाठ.

२ तिसरा चरण दुसऱ्या पाठांत नसून, 'तव नंदकुमरें । काये केलें' असे पुढचे चरण आहेत.

शंकर नारदें देखिला ॥ अर्ध सिंहासनी बैसविला ॥ मग पूजीला समस्ता गनीं ॥ २८ ॥ मग नारदे शंकराते पुसिलें ॥ जी गोकुळी अपूर्व जाले ॥ अनंत पवाडे केलें ॥ येणें कृष्णनाथें ॥ २९ ॥ तुम्हापासी पाठविले चतुराननें ॥ तो अवतारू धरिला त्रिनयनें ॥ हे तुम्हासी पुसणें ॥ म्हणोनि येणें जाले मज ॥ ३० ॥ यावरी म्हणें शंकरू ॥ आम्हीं धरिला नाहीं अवतारू ॥ आम्हा कळला नाहीं निर्धारू ॥ मानवी कीं सुरु तुम्हीं पाहिजे ॥ ३१ ॥ तंव नारदु म्हणें त्रिपुरारी ॥ जैं इंद्र वरुषला सीळाधारी ॥ तेणें गोवर्धनु उचलीला वाम करी ॥ गोकुळ राखीलें पराक्रमें ॥ ३२ ॥ यावरी म्हणें शूळपाणी ॥ हे नव्हे मानवियाचीं करणी ॥ अवतरला असैल सारंगपाणी ॥ तुम्ही झडकरुनी पाहिजें ॥ ३३ ॥ मग नारदु आला सत्यलोका ॥ जाणविलें चतुर मुखा ॥ हा कळला नाहीं महेशादिका ॥ तुम्हींची ठांई घालिजे ॥३४॥ यावरी बोलिला चतुराननु ॥ याचा पाहो अनुमानु ॥ मागे अवतारू जाले महनु ॥ परि ऐसें सामर्थ्यें कवणा नाहीं ॥ ३५ ॥ आतां एक ऐसें करुं ॥ त्याचि वासुरवें गोपाळ चोरू ॥ जरी हा होईल परमेश्वरू ॥ तरि अपयशाच कळैल ॥ ३६ ॥ म्हणोनी ब्रह्मा मृत्यलोकासी आला ॥ कपट रूपें गोकुळीं राहिला ॥ तंव कृष्ण निघाला ॥ गोपाळांसहित ॥ ३८ ॥ नव लक्ष गोधनें नंदाचा घरी ॥ या वेगळी घरोघरी ॥ त्याची मोहर आली बाहेरी ॥ मग गाई पाठारा चढलीयां ॥ ३८ ॥ वासुरवांचा मेळावा ॥ तो केला येकीसवा ॥ गोपाळ आणि बळीभद्र देवा ॥ जाणे जालें गोवर्धनावरी ॥ ३९ ॥ गाई वळें पसरें ॥ तवं पावा वाइला नंदकुमरें ॥ वेदध्वनीच्या उच्चारें ॥ वाते[१] जालें ॥ ४० ॥ सुस्वर नाद मुंजुळ ध्वनी ॥ ऐसा वेणु वाजविती चक्रपाणी ॥ तो ऐकोनि ॥ गाई धांवीनलियां ॥ ४१ ॥ त्या नादाचा ॐकारू ॥ तेणें गाईचा चालिला भारू ॥ जैसें रणी बावन वीरु ॥ न संभाळीत धांवताती ॥ ४२ ॥ देव्हडें चरणी उभा हरी ॥ वेणु वातसें दोही करीं ॥ तेयें देवो पाहो आले अंबरी ॥ खेळु राया मुरारीचा ॥ ४३ ॥ वेधें गाईवरी घातल्या माना ॥ गाईस न धरें पान्हा ॥ धारा सुटलीया गहना ॥ वोळला क्षीर सागरू ॥ ४४ ॥ खीरें उचंबळली मेदनीं ॥ तेणें गाई रुतलीया गुढघयापासुनी ॥ देवे विचारिलें मनीं ॥ जाला वासुरवें ॥ ४५ ॥ जयाचा जैसा वानू[२] ॥ तैसाची जाला मदसूदनु ॥ दुधापान करुनु ॥ पुनरपी येकलाचि राहिला ॥ ४६ ॥ बळीभद्रा विस्मो जाला ॥ म्हणें हा परमानंदु प्रकट जाला ॥ हा मनुषरुपें आला ॥ गोकुळामाजी ॥ ४७ ॥ देवीं केला

१ याजविते–पाठ.

२ वर्णु–पाठ.

पुष्पवरुषावों ॥ तंव ब्रह्मयानें केली मावों ॥ म्हणे आतां घेउनी जावों ॥ वासुरवां गोपाळातें ॥ ४८ ॥ मग तिये नेली सत्यलोका ॥ कांहीं न धरिच संका ॥ वछें गोपाळ नेली देखा ॥ घेउनी गेला ॥ ४९ ॥ तियेकाळी सिदोरिया ॥ मोटा सोडवी कान्हया ॥ सकळांतें वाटुनियां ॥ जेवितें जालें ॥ ५० ॥ अग्नें[1] नाना परीकरे ॥ परिमळें लाजिलें मोगरें ॥ कानवलें घृत साखरें ॥ दधीभात काळउनियां ॥ ५१ ॥ वारीया पुरीया तेलोरीया ॥ इडोरीया मांडे पुरीया ॥ अमुर्त[2] फळें कठीया ॥ सुपरिमळा ॥ ५२ ॥ लोंणची रुचिकरें ॥ आंबे करवंद भोकरें ॥ आली बेलें नींव आणिकें अपारें ॥ नाना परिची ॥ ५३ ॥ आरोगीतसे सर्वेश्वरू ॥ प्रसाद वाटीं मोक्षाकारु ॥ अमृतवरुपावो पडीभरु ॥ तेथें जाला ॥ ५४ ॥ तेथें क्षण येकु जाला ॥ तवं ब्रह्मा वत्सें गोपाळ घेउनी गेला ॥ वत्से गोपाळ सांभाळुं गेला ॥ तवं तीये न देखेची ॥ ५५ ॥ वडजा वाकुडा पेंधा सुधामा ॥ बळभिद्र आणि कान्हा ॥ तव दीस गेला अस्तमाना ॥ गाई गोकुळां मोहरलियां॥५६॥ बळीभद्र चौघांसहित ॥ पुढें गेला वाट दाखवीत ॥ मागे येकला राहिला गोपीनाथ ॥ मग विचारी मानसीं ॥ ५७ ॥ वत्से गोपाळ काय जाली ॥ तंव जाणितलें ब्रम्हे नेली ॥ मग सर्वज्ञरायें नटना केलीं ॥ आपण जाला वत्सें गोपाळ ॥ ५८ ॥ जयाचें जैसें लेंकरूं ॥ तैसेचि जाला सर्वेश्वरू ॥ जे जियेचें वासुरू ॥ वर्णु आकारू तैसाची ॥ ५९ ॥ मोरी तांबडी सावळी ॥ हरजी कोसीं सुद्ध काळी ॥ पुंडी लाखी वाहाळी धवळी पीवळी ॥ जाला कृष्णनाथु येकवेळें ॥ ६० ॥ पांचशतें गोवळें ॥ येक काळें सावळें ॥ येक गोरें भुरळें ॥ येक उंच खुजे वामन ॥ ६१ ॥ जयाचें जैसें बोलणें ॥ (जैसे) चालणें खेळणें ॥ जैसें पाहाणें ( हंसणे ) ॥ तैसाची नटला ॥ ६२ ॥ ऐसा गोकुळामाजि प्रवेशला ॥ आपुलाल्या घरासी गेला ॥ जें जें खुणे होत पहिला ॥ ते तैसेंची जाला येकवेळें ॥ ६३ ॥ जयाचें जैसें काम ॥ जयाचा जैसा आहार[3] व्याम ॥ घेतें जाले मेघश्याम ॥ क्षीनामाजी[4] ॥ ॥ ६४ ॥ ऐसयापरी प्रतिदिनी ॥ देवोंखेळे गोकुळी वृंदावनी ॥ परी नेणती कवणी ॥ ऐसी माव केली ॥ ६५ ॥ ब्रह्मयाचा क्षण येकु भरला ॥ तंव येथेंचा संवत्छरु पालटला ॥ मग आपुले केलें पाहो आला ॥ मृत्य-लोकासी ॥ ६६ ॥ गोकुळा येउनि पाहिले ॥ तंव वत्छें गोपाळ देखिलें ॥

---

१ 'अन्ने' पाहिजे.

२ 'अमृत' पाहिजे.

३ व्यायाम ?

४ क्षण.

म्हणें कऱ्हणी असैल आणीलें ॥ मज मागें जाउनियां ॥ ६८ ॥ जंव ज्ञानदृष्टी पाहें ॥ तंव तेथेंचि देखत आहे ॥ म्हणें हे नवल जालें काये ॥ म्हणोनि भुळला ब्रह्मा ॥ ६८ ॥ मग नारद म्हणें ताना ॥ आतां सरन रीघै अनंता ॥ हा अवतरला संपूर्णता ॥ सर्व सामर्थेसीं ॥ ६९ ॥ म्हणें हा होये परमेश्वरू ॥ याचा पाहावा नलगे निर्धारू ॥ येर म्हणिये येक करू ॥ ऐसें निरुतें जाण ॥ ७० ॥ मग वत्सें गोधनें नीवडीली ॥ तीये वेगळाली चरों गेली ॥ मग कृष्णराये करी मोहरी घेतली ॥ आळविला पंचम वेदु ॥ ७१ ॥ वेद शास्त्र पुराणे ॥ वाजवीता छंद म्हणें ॥ गाईस आले पान्हें ॥ त्या धांवती देवावरी ॥ ७२ ॥ तेथें वासुरवाचा- वेष धरी ॥ देवो आपण स्थानपान[1] करी ॥ मुदल रुप मोहोरीं ॥ वाजवीतें जालें ॥ ७३ ॥ येसा क्षण येकु जाला ॥ तंव नवलाव येक देखिला ॥ सकळ गोपाळ करिता जाला ॥ चतुरमुख ॥ ७४ ॥ आणि सकळ गोपाळ ब्रह्मेची देखता ॥ तेणें भुळला सत्यलोकीचा पिता ॥ येक येक चुतुर्वेद पढता ॥ आणि घडिती अनंत ब्रह्मांडे ॥ ७४ ॥ ब्रह्मा पाहे आपुली मूर्ती ॥ तैसेची सकळ गोपाळ दिसती ॥ तेथेंहीं भुळला ब्रह्ममूर्ती ॥ नेणो हा कवण ठावों ॥ ७६ ॥ अवघे चतुर्मुख पटवर्धन ॥ ते करिंती चतुर्वेद पठण ॥ ब्रह्मा विसरला आपुलेपण ॥ म्हणें आपुलीयाहुन सामर्थ्यें आगळें ॥ ७७ ॥ मग ब्रह्मा विचारी आपुले मनी ॥ कवण बैसाविला असैल माझे भुवनी ॥ तरि मज त्रिभुवनी ॥ ठावो नाहीं ॥ ७८ ॥ हा होये आत्मारामु ॥ अवतरलां मेघश्यामु ॥ आतां सांडु आपुला भ्रमु ॥ रिघों शरण यासीच ॥ ७९ ॥ आतां पाहतां नीर्वाण ॥ येखादें उद्भवैल विघ्न दारुण ॥ जरी घेतलें असैल माझे स्थान ॥ तरी तृनासमान मीं जालों ॥ ८० ॥ मग म्हणें नारदमुनी ॥ आतां विचाराल झणी ॥ म्हणोनी लागले चरणी ॥ श्रीकृष्णरायाचीये ॥ ८१ ॥ तंव धरिला वरिच्यावरी ॥ म्हणें तुम्हीं पवित्र ब्रह्मचारी ॥ तुम्हीं काईसयावरी ॥ केला नमस्करु ॥ ८२ ॥ आम्ही विप्राचे चरण वंदुं ॥ तुम्हीं द्यावा आशिर्वादु ॥ या वचनावरी म्हणें नारदु ॥ आतां क्षमा करी देवराया ॥ ८३ ॥ नारदाचिया बोला हांसीला ॥ म्हणे म्हातारपणें भुलला ॥ मग अपराध उपसाहिला ॥ कृपावंतें ॥ ८४ ॥ तंव पुढें ब्रम्हा देखिला ॥ साष्टांगी नमस्कारु घातला ॥ मग कृष्णरायें आदरेंची आळंगिला ॥ उठोनि ब्रह्मयातें ॥ ८५ ॥ तंव हास्यें करुनि बोले मुरारी ॥ कवण भावेंसि तुझा शरीरी ॥ तुवां सांडुनीं आपुली नगरी ॥ कां येथवरी येणें जालें ॥ ८६ ॥ तुं सत्य लोकीचा दातारू ॥ मीं नंदाचा कुमरु ॥ मानवीया नमस्कारू ॥

१. स्तनपान–पाठ.

कों करितां ॥ ८७ ॥ आमचें ब्राह्मण देवत ॥ वीसेष तुम्ही चतुर्मुख ॥ तुमचा नमस्कारू घेत ॥ दोप लागती आम्हां ॥ ८८ ॥ यावरी ब्रह्मया म्हणें ॥ जी तुम्हासी म्या ओळखिले खुणें ॥ तुं अवतरलासी जया कारणें॥ ते मज कळले दातारा ॥ ८९ ॥ जें म्या अपराध थोर केले ॥ नेणोनि वत्सें गोपाळ नेले ॥ या शब्दा हांसीले ॥ परमानंद परियेसा ॥ ९० ॥ पुनरपी घालुनी दंडवत ॥ देवो ब्रह्मयाकडे पाहोनी हांसत ॥ वृद्धपण येत येत ॥ हीन बुद्धि होतसे ॥ ९१ ॥ तंव ब्रह्मा म्हणें सर्वेश्वरा ॥ हा माझा अपराध क्षमा करा ॥ मग कृपा आली सारंगधरा ॥ आतां बीजें करा म्हणितलें ॥ ९२ ॥ म्हणें जय जये आनंदघना ॥ अपरंपरा मदुसूदना ॥ त्रिलोकेनाथा जनार्दना ॥ कृष्ण कृपाळुवा ॥ ९३ ॥ जयजयें अनंतमूर्ती दातारा ॥ जयजये अनंतअवतारा ॥ अव्यक्ता श्रीचक्रधरा ॥ नमन माझे ॥ ९४ ॥ जय यादवकुळटिळका ॥ जये भक्तीजनादायका[1] ॥ सकळ देवद्विजनायका ॥ नमन माझें ॥ ९५ ॥ जयें जयें तुं बा मुरारी ॥ चौदा भुवने तुझा उदरी ॥ तुझीये घरची कामारी ॥ ते आकारी अनंत ब्रह्मांडें ॥ ९६ ॥ तीयेची आंगीची दीप्ती ॥ तेणें द्वादश सूर्यो लोपती ॥ त्याहीं शक्ती नेणती ॥ तुझा स्वरूपनिर्धारू ॥ ९७ ॥ पूर्वीं तुवां हंस अवतारु धरिला ॥ तैं मज ज्ञानाचा ठसा उमटला ॥ तेणें करितां मीं पातला ॥ स्वरुपनिर्धारु ॥९८॥ तेणें मीं जालो सरता ॥ आणि तुवाची मज स्थापिले अनंता ॥ तेणेंचि ज्ञानें अद्वैता ॥ गणित केलें ॥ ९९ ॥ तेचि ज्ञान सूर्यासी ठसावलें॥ म्हणोनी दिव्य शरीर जालें ॥ तेची ज्ञान म्या उपदेसिलें॥ मनुष्यादिकांसी ॥ ७०० ॥ तेथौनी हळुहळु मृत्यालोकां ॥ ते ज्ञान गेले जी विश्वव्यापका ॥ तेथींची बोळखी आईका ॥ नामेंची चाड ॥ १ ॥ ते भावसहित जपीजे ॥ तरि तीर्थेंव्रतें कासया कीजे ॥ येके नामेची उद्धरिजे ॥ ते नाम पाहिजें ब्रह्मादिकांपासीं ॥ २ ॥ तेची ब्रह्मविद्या कवण ॥ तीची वेदां न कळे खूण ॥ भुलली शास्त्रे पुराणे ॥ बोलती भलतेउतें ॥ ३ ॥ हे नामरूप तुझें ॥ तेची भूषण माझें ॥ मग आणीली गोपवछे ॥ त्या देवरायाचीं ॥ ४ ॥ म्हणें मीं नेणेची जी दातारा ॥ जो तुं परत्रीचा सोईरा ॥ आतां क्षमा करा ॥ देव देवा ॥ ५ ॥ वत्सें गोपाळ आणोनी ॥ ब्रह्मया जाली पेठवनी ॥ तो बैसोनि विमानी ॥ गेला सत्यलोकासी ॥ ६ ॥ मग गोकुळा जाती जाली वेळ ॥ पुढें गोधनें लाउनी सकळ ॥ मागे नृत्य करिती गोपाळ ॥ वाती मोहरी पावे ॥ ७ ॥ येक घालिती हुंमा हुंमरी ॥ येक नटती नानापरी ॥ म्हणती देखिला मुरारी ॥ वरुषा येका ॥ ८ ॥

१ भक्तजनामोक्षदायका—असा कांहींतरी शब्द पाहिजे.

आतां आपुळालेया मायेंबापासीं ।। भेटो जाती गोकुळासी ।। वरिसा येका आम्हासी ।। राखिले ब्रम्ह्यानें ।। ९ ।। यैसे बोलत नाचत गेले ।। आपुलाले मंदिरीं प्रवेशेलें ।। मग धांवोनी गळीया झोंबीनले ।। आम्हा सुंदग[1] संसारु म्हणौनियां ।। १० ।। तंव मायेवापें म्हणती काय जाले ।। आवो आम्हासी ब्रह्मयानें चोरुनी नेले ।। वरीप येक राखिले ।। सत्यलोकीं ।। ११ ।। वछें आणी आम्हासीं ।। सोडिले आजीचा दिवसीं ।। मागील वेवस्ता कैसी ।। ते आम्हीं नेणो ।। १२ ।। तंव माय बापें म्हणती पुत्रासी ।। आरे तुम्हा-सारीखे प्रतीदिवसीं ।। वांसुरवें गाई सरींसीं ।। आणी कृष्णनाथु ।। ११ ।। तंव गौळीया वीस्मो थोरु जाला ।। म्हणती हा परमेश्वरुची अवतरला ।। यादववंशु उद्धरावयाला ।। पुढें काई होईल तें नेणीजे ।। १४ ।। आतां येथौनी पुढ कथा ।। सांग रे कृष्णदासा आतां ।। अवधान द्यावे स्त्रुतां[2] ।। पुढील कथा परियसा ।। १५ ।। प्रसंग ।। १० ।। दाहावा प्रसंग ।।

## ।। प्रसंग ।। ११ ।।

या नंतरें नंदे विचारिलें ।। हे परब्रह्म अवतीर्ण जाले ।। गोधनें राखतां नव्हें भलें ।। कंसु करील अपघातु ।। १६ ।। म्हणौनी वळीभद्र मांगाती ।। म्हणें हा न विसंबे गा श्रीपती ।। तंव राम करी विनंती ।। यापुढें किती वळ आमचें ।। १७ ।। लाउनियां डावी करांगुळी ।। जेणें गोवर्धनु उचलिला अंत-राळी ।। या पुढें कवण असे बळी ।। यासी आकळी यैसा ।। १८ ।। ब्रम्ह्यी-यानें केली रांडोळी ।। चोरुनिया नेली वछे गोवळी ।। तीतुकीहीं वनमाळी ।। जाला देखा ।। १९ ।। जो रावो सकळ उदकासी ।। तणें धरून नेले तुम्हासी ।। मग तेथें गेले ऋषीकेशी ।। तें तुम्हासी सोडविले तेणें ।। २० ।। मागें जे जे पवाडे केलें ।। तें तुम्हासी श्रुत जाले ।। तुम्हीं कवणे बोले ।। यासी जतन करा म्हणतां ।। २१ ।। यैसे कवणे येके वेळीं ।। गौळीयांचिया बाळा सकळीं ।। त्या खेळती येमुने जळीं ।। वस्त्रें पाळीं ठेउनियां ।। २२ ।। तेथें श्रीकृष्ण आलें ।। वस्त्रों घेउनी कळंबावरी वेघले ।। त्यांचे खेळ सरले ।। तंव वस्त्रें न देखती ।। २३ ।। म्हणती आतां बाहिर कैसें नीगणें ।। वस्त्रें कवणासी मागणें ।। आतां घरासी कैसें जाणें ।। वस्त्रेंविणा ।। २४ ।। तंव तो कळंबा-वरी देखिला ।। वस्त्रें घेउनि बैसला ।। कुमारी म्हणती तयाला ।। वस्त्रें देई जी

---

१ दुसरा – पाठ.

२ 'श्रोता' असें पाहिजे.

नंदकुमरा ॥ २५ ॥ तंव कृष्णनाथु म्हणें येउनि घेईजें ॥ त्या म्हणती आम्हीं नज्ञ केवी येईजे ॥ खेळीया मांडिलिया बोजें ॥ भाक देईजे सुखाची ॥ २६ ॥ येकी नेमीति येकीसीं ॥ हे मात न सांगावी कवणासी ॥ कळो नेंदावी भ्रतारासी ॥ मग भाकेसी गुंतलिया ॥ २७ ॥ मागां खेळिनला बाळलीला ॥ आतां भोगीतसे आवोला ॥ मग धरूनी प्रौढ कळां ॥ तो खेळे गोकुळामाझारी ॥ २८ ॥ मार्ग रुधुनी मथुरेचा ॥ दानी जाला गोरसाचा ॥ देखोनी कान्हा नंदाचा ॥ चतुर विद्या भुललिया ॥ २९ ॥ कवणें येके वेळीं ॥ गौळणी गीयालीया सकळै ॥ वडील राही चंद्रावळी ॥ पुढें चालिलीयां ॥ ३० ॥ तंव पुढें उभा देखिला हरी ॥ मग ते जाली पाठमोरी ॥ तंव मागें हीं मुरारी ॥ उभाची आहे ॥ ३१ ॥ मग ते दक्षिणें करें ॥ तंव रूप देखेती सरें ॥ मग वामांगीं सरें ॥ तंव कृष्णाची देखे ॥ ३२ ॥ जंव पाहे वास आकाशीं ॥ तंव तेथेंहीं देखे ऋषीकेसी ॥ मग विनवी भूमिकेसी ॥ तंव मूर्ती तैसीची देखें ॥ ३३ ॥ मग बैसली लाउनी डोळे ॥ तंव रूप ह्रदई प्रगटलें सावळें ॥ मग हांसे आलें बाळे ॥ बोले सकोमल उत्तरीं ॥ ३४ ॥ आहो जी जगदात्मया हरी रामा ॥ कांहो जी मार्गु नेंदा आम्हा ॥ आजीचा दिवस करी क्षमा ॥ मग इच्छा ते प्रमाण ॥ ३५ ॥ मग तो खेळे पानीयेडीं ॥ गौळणी येती लवडसवडी ॥ मस्तकीं घेउनी डेरी ॥ तंव तो फोडी खडीयानें ॥ ३६ ॥ यैसा खेळीया विनोदें ॥ क्रीडा खेळे आनंदें ॥ यैसे वेधुनी मुकुंदे ॥ नानापरी उद्धरिले ॥ ३७ ॥ सुदामा देवांचा गुरू ॥ तो संदपाणी[1] विप्रु ॥ तेथें विद्यारंभ करू ॥ घातले रामकृष्ण ॥ ३८ ॥ यैसे पढतां श्री मुरारी ॥ कंसकेसिया विचारू करी ॥ श्रीकृष्ण[3] नागवे वळाधीकारी ॥ बुद्धी वैरी सांधु अक्रुर ॥ ३९ ॥ तो भाचा होय आम्हासी ॥ कन्या देवो कृष्णासी ॥ तो विश्वासैल सोईरीकेसी ॥ मग तयासीं घातावें ॥ ४० ॥ यैसें विचारूनी मानसीं ॥ मग पाठविते जाले आक्रुरासी ॥ तुम्हीं जावें वेगेसी ॥ कृष्णासी मूळ ॥ ४१ ॥ तो पुत्र बहीणीचा ॥ जावाई करू सत्येवाचा ॥ मान वाढउं तयाचा ॥ नंदा येशोदेचा विचारू घेईजे ॥ ४२ ॥ आतां साहुं वैराकारू ॥ देउ आपुले लेंकरू ॥ हा सांगोनु विचारू ॥ कृष्णासी घेउनी येईजे ॥ ४३ ॥ मग अक्रुरासी विडा दीधला ॥ तो वस्त्रें देउनी वाटा लाविला ॥ कंस कानी लागला ॥ कृष्ण पातेजैल तुज ॥ ४४ ॥ तुं बुद्धीवंतु शाहाणा ॥ त्यासी भलतया प्रेत्नें आणा ॥ जरी उचित मागाना[1] ॥ (नेदी)

१ सांदिपना.

२ आतां बुद्धिची वैरी । साधु अक्रुरा--पाट.

३ मग जे मागेल तें देईन प्रमाणा--पाट.

तरी आण पीतीयाची ॥ ४५ ॥ जें तुम्हीं मागणें ॥ ते म्या तुम्हांसी देणें ॥ जरी मीं नेंदी तरी उणें ॥ आमच्या पूर्वजासी ॥ ४६ ॥ मग रायासी नमस्कारू केला ॥ अक्रुर रथा आरूढ जाला ॥ सवें लोंक दिधला ॥ चतुरविध शाहाणें ॥ ४७ ॥ तंव अक्रुर येमुना उतरला ॥ गोकुळाभीतरी प्रवेशला ॥ तंव विनोद देखता जाला ॥ श्रीकृष्णरायाचा ॥ ४८ ॥ तिये येमुने तीरीं ॥ गाई राखताती गोवारी ॥ वाती पावे तारफी मोहरी ॥ विमानें अंबरी पाहो ठेली ॥ ४९ ॥ जीकडे पाहे अक्रुरु ॥ तीकडें गोपाळांचीच भारु ॥ गर्जे वाजांतराचा गजरु ॥ आणी उच्चारू कृष्णनामाचा ॥ ५० ॥ देव पुष्पवरुषाव करिती ॥ ते म्हणती आमचें देवपण किती ॥ हा आवतरला आदी मूर्ती॥ जाला सारथी गौळीयाचा ॥ ५१ ॥ धन्य धन्य ते गोकुळ ॥ धन्य ते गोवळे सकळ ॥ कैसा खेळती खेळ ॥ परब्रह्मेंसीं ॥ ५२ ॥ मग म्हणें अक्रूरु ॥ यांत असैल नंदकुमरू ॥ याचो भेटी आधीं सारूं ॥ मग करूं पुढील कार्ये ॥५३॥ मग टाकिला गोपाळाचा भारू ॥ तंव चतुर्भेज सकळ परिवारू ॥ न कळे साणा थोरू ॥ सकळै मुगुटवर्धन ॥ ५४ ॥ तेथें भुलला अक्रुरु ॥ केला समस्ता नमस्कारू ॥ म्हणें येथें असे विचारु ॥ आणीके परीचा ॥ ५५ ॥ हा अवतरलासे सर्वेश्वरू ॥ फेडावया भूमीचा भारू ॥ खेळतसे वेषधरू ॥ नानारूपें ॥ ५६ ॥ हा कसु बुध्या भुळला ॥ अती गर्वे मातला ॥ आम्हासी भला कळला ॥ येऱ्हवीं नर्का जातों ॥ ५७ ॥ हा परतपरू सुंदरु ॥ विश्वाचा दातारू ॥ अवतरलासे सर्वेश्वरू ॥ स्वामी माझा ॥ ५८ ॥ तेथें माव केली चोज ॥ सकळै जाले जतुर्भुज ॥ आतां जावों गोकळामाजी ॥ भेटो नंदा येशोदेसी ॥ ५९ ॥ मग चाले[१] चर्णचाली ॥ मार्गीं पाउलें उमटली ॥ तेथें ध्वजु पद्मे वोळखिलीं ॥ कुंकुमवर्णीं ॥ ६० ॥ ते देखोनिया घाली साष्टांग ॥ देखतसें कृष्णाचे माग[२] ॥ उमटले सुरंग ॥ आमोदकंदाचे ॥ ६१ ॥ तें कुंकुमसृत्तिका लावी कपाळी ॥ तंव ते भेदली असे पाताळीं ॥ म्हणें धन्ये हे महीतळी ॥ घाली लोटांगण ॥ ६२ ॥ येसा नंदभुवन पातला ॥ नंदारायाते भेटला ॥ बहुतां रीती सन्मानिला ॥ मग जाला बैसकारू ॥ ६३ ॥ मग चरणप्रक्षाळण जालें ॥ चंदनें टिळे रेखिलें ॥ वरी सुरंग मीर्वले ॥ गंध अक्षता ॥ ६४ ॥ मग कर्पूरेसी विडे देउनी ॥ नंद विनवी कर जोडुनी ॥ आज्ञा द्यावी झडकरुनी ॥ कवणा कार्या बीजें केलें ॥ ६५ ॥ तंव अक्रूर म्हणें गा राया ॥ कंसें पाठविले तुमचेया ठायां ॥ कन्या देताती भाचया ॥ तुमचीया पुत्रासी ॥ ६६ ॥ सांडिला वैराकारू ॥ आतां आनंदे

१ चरण.
२ मार्ग—पाठ.

सोईरीक करूं ॥ आम्हीं देउनी आपुलें लेंकरूं ॥ घर जोडित असों आम्हीं ॥ ६७ ॥ कंसें केली विनंति ॥ आणि मज मूळ पाठविलें तुम्हाप्रती ॥ पृथ्वीचे रायें हांसती ॥ यैसें न कीजे तुम्हीं ॥६८॥ तुम्हांसीं दीधली वहीणी ॥ आणि सोईरीक दुणाउ कन्या देउनी ॥ म्हणोनी विनंति कर जोडुनि ॥ मज पाठविलें ॥ ६९ ॥ आतां वरु द्रुस्टीसी घालिजे ॥ मग मज आज्ञां दींजे ॥ वाट पाहती राजे ॥ नोवरा आणिजे आतांची ॥ ७० ॥ मग नोवरा देखिला डोळां ॥ तो केवळ मदनाचा पुतळा ॥ तोची सींनगारू सकळां ॥ सुंदरा श्रीमंतासी ॥ ७१ ॥ प्रकाशले सूर्येभान[1] ॥ तारांगणें सांडीती अभिमान ॥ देखती अगस्ती ब्राह्मण ॥ सागरू कांपें ॥ ७२ ॥ कृष्णातें देखोनि कंसाचा परिवारू ॥ गर्वा जाला परिहारू ॥ दृष्टी पाहें आक्रूरु ॥ तंव देखे अनारिसें ॥७३॥ देखोनी कृष्णातें मन निवालें॥ मूर्ती देखोनि आल्हादलें ॥ जैसे आंबुज विकासलें ॥ तैसें तळवे आलोहित ॥ ७४ ॥ कुंकुमरंगें रातलें ॥ कीं संध्यारागें प्रवर्तले ॥ ध्वज वज्र अंकुस मीर्वले ॥ स्वयंभ ऊर्ध रेखा ॥७५॥ वांकी तोडरू चरणीं ॥ जानु पोटरिया जघनी[2] ॥ वरी पीतांबर वोढौणी ॥ कास शोभे गोमटी ॥ ७७ ॥ नाभीचे महीमान ॥ तेंची ब्रह्मयाचें जन्मस्थान ॥ हृदयें घनश्यामवर्ण ॥ शोभतसे ॥ ७७ ॥ यैसा चतुर्भुज सांवळा ॥ कंठीं तुळसीचिया माळा ॥ मरगज पावा गळां ॥ मुखकमळा चंद्र लाजे ॥७८॥ दंतपक्तीचे विकास ॥ जैसी उघडिली माणीकाची मांदुस ॥ नासाग्री परिमळ सुरस ॥ नीट तिखट पैं ॥ ७९ ॥ कुंडळे शोभती श्रवणी ॥ जैसीं जोतीलिंग दोम्हीं ॥ आंमृत वसे नयनी ॥ कृपादृष्टी ॥ ८० ॥ त्रिपुंड् शोभे लल्हाटी ॥ माथा मोरपीसांची वेठी ॥ पुष्पें तुरंविली मुगटी ॥ यैसा जगजेठी कान्हया ॥ ८२ ॥ मग काय केले तेणें नंदकुमरें ॥ निद्रा केली आक्रुरें ॥ स्वप्न दाविलें सारंगधरें ॥ त्या अक्रुरासी ॥ ८२ ॥ क्षीरसमुद्र भोंवता असे ॥ तेथें शेपसया असे ॥ लक्षुमींसहित रुषिकेशे ॥ राज्य कीजे ॥ ८३ ॥ तें अमृत केवळ ॥ भीतरी कृष्णरावो घणनीळ ॥ निद्रा केली सुसीतळ ॥ लक्षुमी चरण प्रक्षाळीं ॥ ८४ ॥ शेषमंचकावरी॥ पोहुडलासे रावो मुरारी ॥ यैसें स्वप्न देखिलें भीतरी ॥ तंव अक्रुर जागा जाला ॥ ८५ ॥ नेत्र उघडौनि पाहे ॥ तंव तैसेंची देखत आहें ॥ मग उठौनी भोंवतें पाहे ॥ तंव तो क्षीरसमुद्र ॥ ८६ ॥ मग आनंदभरित अक्रुर ॥ तंव दृष्टी पाहे सारंगधर ॥ (स)भोंवता परिवार ॥ माहा सक्तीचा ॥ ८७ ॥ मग विचारी मानसीं ॥ हा अवतरला रुषिकेशी ॥

---

१ किरण–पाठ.

२ मूळ पाठ–'पीटली घणी.'

स्थापावया देवांसी ॥ नासील दैत्येकुळांतें ॥ ८८ ॥ हा अविनास अपरांपरु ॥ येणें केला अवतारू ॥ जाला मायावेषधरू ॥ प्रगटला हाची ॥ ८७ ॥ आतां माझी भ्रांती निरसली ॥ मग साष्टांगें दंडवतें घातली ॥ चरणकमळें वंदीली ॥ मग जाला भक्तराजु ॥ ९० ॥ आतां अक्रुरा प्रेम दीधलें ॥ मग नंदा येशोदेतें पुसिलें ॥ म्हणें अतां पाठवीजे वहीलें ॥ रामकृष्णासी ॥ ९१ ॥ येशोदा म्हणें लेंकरू अजाण ॥ येईल कीं नये नेणो ॥ म्हणोनि मग भीतरी गेला कृष्ण ॥ माये सिकवी बहुतां रीती ॥ ९२ ॥ ॥ हा कंस कपटिया बहुत ॥ तेथें जातां नव्हे हित ॥ तो करिल अपघात ॥ ऐसें मज कल्पतसें ॥ ९३ ॥ तो वैरी प्रतक्ष[१] जाणां ॥ वाईट अती कठिणां ॥ तो पा तोजौन[२] प्राणां ॥ घेवों पाहतसे ॥ ९४ ॥ यावरी बोले पुरुशोउत्तमु ॥ माझा तुं नेणसी वो पराक्रमु ॥ अझुणी न संडी संभ्रमु ॥ आजाणपणाचा ॥ ९५ ॥ आवो पाहे कर्तव्य ईश्वराचे ॥ आणी पाप भयें कैंचें ॥ जैसे कर्तव्य जयाचें ॥ तो तैसेचि पावैल ॥ ९६ ॥ माझी न करावी चिंता ॥ मीं भेटौनी येईन मागुता ॥ जो मारीता (आणि) मारविता ॥ तो वेगळाची असे ॥ ९७ ॥ भावो सुद्ध तरि मीं भेटैन ॥ कपट असैल तरी सीक लावीन ॥ तुझ्या प्रसादें विजया होईन ॥ ऐसे जाण सत्यार्थ ॥ ९८ ॥ या वचना निरोप दीधला ॥ मग नमस्कारु करुनी निघाला ॥ संवंगडियां हाकारा केला ॥ वळीभद्रासहित ॥ ९९ ॥ पांच शतें गोपाळां ॥ सहित रामकृष्ण सांवळा ॥ नंदु गौळियांसहित सकळां ॥ बोळवितु निघाला ॥ ८०० ॥ अक्रुरा घातलें दंडवत ॥ मग परतले समस्त ॥ गोपाळ खरसींगें वात ॥ येक नाचत कृष्णापुढें ॥ १ ॥ येक येक घालिती हा(मा)मां हुंमरी ॥ वात पावे तारपी मोहोरी ॥ गात वात नाचत नानापरीं ॥ यमुनातीरीं उतरले ॥ २ ॥ ते देखौनि आक्रूरु आल्हादला ॥ कृष्णरायाचा वेधु लागला ॥ म्हणें हा परमानंदु अवतरला ॥ आर्त रक्षावया ॥ ३ ॥ धन्य धन्यें ते गोकुळ ॥ धन्ये धन्ये ते यादव सकळ ॥ धन्ये धन्ये ते भूमीमंडळ ॥ जेथें केवळ मूर्ती आली ॥ ४ ॥ जो नातुडे साही दरुपणां ॥ ना सांपडें नाना साधना ॥ तो खेळे लेंकुरपणें (कान्हा) ॥ घरीं गौळीयाचां ॥ ५ ॥ तीर्थक्षेत्र व्रतदानें ॥ करिती नाना आचरणें ॥ परी हा न सांपडे कवण्या वो गुणें ॥ तयासी येणें केवीं जालें ॥ ५ ॥ मज कवणां सुकृतास्तव ॥ देव भेटला सावेव ॥ पुढें कवण कर्तव्य मांव ॥ ते तु जाणसी स्वामीयां ॥ ७ ॥ आतां पैल तीर उतरलें ॥ अक्रुर स्नान करिते

१ प्रत्यक्ष.

२ त्यजुनिया—पाठ.

जाले ॥ श्रीमुरारी म्हणौनि बुडी देते जालें ॥ तंव देखिलें जळीं कृष्णा ॥८॥ तेथें थडीये दचकौनी पाहे ॥ तंव सपरिवारीं वैसला आहे ॥ आंतरिक्ष देखता होये ॥ तंव तैसीचीं मूर्ती देखत असे ॥ ९ ॥ पुनरपी बुडी देतां॥ तंव देखिले त्या कृष्णनाथा ॥ आष्ट दिसा पाहातां ॥ वेगळा नव्हे ॥१०॥ मग मनोभावें नमस्कारू ॥ म्हणें हां विधी आवीधीचां दातारू ॥ ह्रदै प्रगटला सारंगधरू ॥ आतां संसार काय करूं सके ॥ ११ ॥ संध्या वंदनें सारूनीं ॥ निघते जालें त(त)क्षणीं ॥ गोपाळ म्हणती चक्रपाणी वस्त्रें नयनीं ॥ देखों आम्हीं अपुर्वे ॥ १२ ॥ पांटाउं (आणि) पीतांबर ॥ वेपावें (?) मंजीस्ट परीकर ॥ नाना वर्ण भेदाकार ॥ वस्त्रें राया कंसाची ॥ १३ ॥ नाचत गेले गोपाळ तयावरी ॥ वस्त्रें वेढीत फाडीत चरणचारी ॥ हाका हुमरी मोहोरी ॥ गगन गर्जोनलें ॥ १४ ॥ शत वरठ्याचा नायकु ॥ तयासी क्रुध आला बहुतु ॥ तो धांवीनला हाक देतु ॥ गोपाळावरी ॥ १५ ॥ गोपाळी केलीं वोहारी[1] ॥ हाणती मारिती थापेवरी ॥ सांडुनी पावे मोहरी ॥ मग कृष्णावरी धांवीनला ॥ १६ ॥ अरे नंदाचीया कुमरा ॥ कुळहीना ताकपीरा ॥ अरे अकल्पीत आलासी घरा ॥ आतां केवी जासील तुं ॥ १७ ॥ अरे उठी चामचोरा ॥ दहीदूधतस्करा ॥ हाणोन मारीन रे पांपरा ॥ परि या अक्रूरासी भीतसें ॥ १८ ॥ सीळेवरी जैसा आपटीन परीकाळा ॥ तैसा मीं तुज उपटीन रे गोपाळा ॥ आणि पाळीन सगळा ॥ तुज अपसरा गौळीया ॥ १९ ॥ आतां कवण राखैल तुज ॥ कोपलया मज (सहज) ॥ तव कोपला कृष्णराज ॥ तेणें थापा हाणितलें ॥ २० ॥ थापा हाणितले गोपाळें ॥ तवं सीर जाले वेगळें ॥ ते जात असें अंतराळें ॥ मोक्षालागी ॥ २१ ॥ सकळ स्वर्ग धांडोळिता ॥ मोक्ष नाहीं पाहाता ॥ सीर आले त्वरीता ॥ श्रीकृष्णचरणी लागलें ॥ २२ ॥ ते देखे कृष्ण कृपाळु ॥ सीर टाकिले अंतराळु ॥ सीवगण धांवीनले सकळु ॥ तेहीं सीर स्वर्गासी नेलें ॥ २३ ॥ ऐसी वरठ्या वैर मुक्ती देउनी ॥ निघाले श्रीचक्रपाणी ॥ आक्रुर करी विनवनी ॥ जी मज देईजें आज्ञा स्वामी ॥ २४ ॥ अक्रूर मथुरे प्रवेशला ॥ आणि कृष्णरायाचा वृत्तांतु सांघीतला ॥ जी कृष्ण असे आला ॥ बळीभद्र देवासी ॥ २५ ॥ ते पांच शतें गोपाळां ॥ बळीभद्रेसी सांवळा ॥ वरठ्यासी केली अवकळा ॥ सीर थापा हाणीतलें ॥ २६ ॥ तंव कंस म्हणें बुद्धी करा ॥ वैरी आला असें दैवें घरा ॥ वीरासी केला हाकारा ॥ पाचारा चानोर मुष्टीकु ॥ २७ ॥ सकळ वीर आलें ॥ कुंजर भार सावध केलें ॥ बीदी कुंचे बळकाविलें ॥ ठाई

[1] मुळांत 'वाहारी' शब्द. वोहरी पाठ आहे.

ठाई ॥ २८ ॥ तंव ते नगरीचे लोक ॥ पाहाती उपरिया वरूनी कवतीक ॥ नरनारी असंक्षात ॥ पाहों ठेलिया ॥ २९ ॥ पावें खरसीगें मोहोरी ॥ नादें दुमदुमीली धरत्री ॥ येक घालिती हमामा हुंबरी ॥ डागा करी झेलताती ॥ ३० ॥ कास पीतांबराची मालगंठी ॥ सीरी मोरपीसाचीया वेठी ॥ फुलें तुरंबीली मुगुटी ॥ कंठी माळा तुळसीचिया ॥ ३१ ॥ येकाहुनी येकु आगळा ॥ चरणी तोडरू रुळे सकळा ॥ म्हणती नाभी नाभी दैत्यकुळा ॥ शरण गोपाळा रीगा रें ॥ ३२ ॥ ऐसे मथुरा प्रवेशले ॥ तेथें कुब्जचें भाग्य उदैलें ॥ तोण गंधाक्षता कंचोळे घेतलें ॥ परिमळद्रव्यासहित ॥ ३३ ॥ ते जाउनी लागली कृष्णचरणी ॥ हे गंधाक्षता कीजो जी चक्रपाणी ॥ मग समस्ता गंध लाऊनी ॥ रामकृष्ण स्वीकरीती ॥ ३४ ॥ देखोनी तियेचा भावों ॥ संतोषला कृष्णरावों ॥ अभयकर मस्तकी ठेवो ॥ ततक्षणीं दिव्य देहे पातली ॥ ३५ ॥ वृद्धपण लपालें ॥ तारुण्यपण आले ॥ मग मुक्तीपद दीधलें ॥ कुबजा अनारिसी ॥ ३६ ॥ तेथुनी नरनारी ॥ त्या नगरी पाहती घरोघरी ॥ त्या येत देखती मुरारी ॥ भावमिश्रित ॥ ३७ ॥ कुमारी म्हणती हा धाकुटा डोळसु ॥ जाणतीया कुमारीतें दिसें पंचवीसु ॥ मदन भरीतासी प्रौढ पुरुषु ॥ पुतळा मदनाचा ॥ ३८ ॥ यौगियां चतुर्भुज सावळा ॥ शंखचक्र पद्मगदा कंठमाला ॥ जनु देखें डोळा ॥ जैसा ज्याचा भावों ॥ ३९ ॥ नृपवरां राजपती ॥ विप्रासी परब्रह्ममूर्ती ॥ पुरानीकां शास्त्रयुक्ती ॥ माला[1] मालमर्दनु ॥ ४० ॥ धनुवाडेया धनोपती ॥ बळाडेया बळार्थी ॥ कुंजरा[2] सींही मूर्ती ॥ दैत्यासी दैत्यमर्दनु ॥ ४१ ॥ काळाते दिसे माहांकाळु ॥ महाक्षेत्रिया हलकालोळु ॥ धाकुटिया अज्ञान बाळु ॥ भावे समेळ मिळोनिया गेला ॥४२॥ जैसा जयाचा भावों ॥ तैसाची तयासी दिसे देव रावों ॥ मग न लगतां क्षेवो ॥ मालखडियाजवळी आलें ॥ ४३ ॥ देखिला आटोप सैन्याचा ॥ पुढें चोहटा साळेचा ॥ तेथें कुमरू नंदाचा ॥ येता जाला ॥४५॥ तेथे धनुष्य कंसाचे ठेवीलें॥रक्षण सुबंध[3] नेमीलें॥ तया वीरतें नीभ्रासीलें[4]॥ धनुप पाहो म्हणोनिया ॥ ४५ ॥ तंव ते म्हणती नंदकुमारा ॥ तुं नेणसी रे गया कंसासुरा ॥ येरें धनुप घेउनी येकसरा ॥ कृष्ण पाहाता जाला ॥ ४६ ॥ देव म्हणें येव्हडा कंस तुमचा दारुण ॥ तो आम्हीं आईको बळियाडा म्हणउन ॥ हा काय वागवीतो ( हे ) पींजनु ॥ मग धनु वोढीयेलें ॥ ४७ ॥

---

१ मल्ला मल्लमर्दनु—पाठ.

२ विप्रासि परब्रह्ममूर्ति—पाठ.

३ रक्षणी सुबुद्धी—पाठ.

४ निर्भविले—पाठ.

त्याचे दोन्ही गोसें येक जाले ॥ दोनी टुकडे करुनी मांडीलें ॥ तंव राख- णाईत कोपलें ॥ उठावले कृष्णरायावरी ॥ ४८ ॥ अरे अपसरा ताकपीरा ॥ अरे उघटा वहासरा[1] ॥ तुं नेणसी धनुषाचा मारा ॥ तुज डांगाची माजें ॥ ४९ ॥ म्हणौनि उठिले हलाळ ॥ तंव गर्जीनले अंतराळ ॥ देव पाहों ठेले सकळ ॥ विमानें अंतराळी दाटली ॥५०॥ येक वेळे दाहा सहस्र ॥ घाये घालिती अपार ॥ मग कोपला बळीभद्र वीर ॥ तेणें हळधर प्रजी- येलें ॥ ५१ ॥ बहुतीं वेढीयलें रामा ॥ तंव क्रोध आला मेघशामा ॥ मग जाउनी साउमा ॥ त्राहाटिता जाला ॥ ५२ ॥ वीर मारुनी पळविलें ॥ धनुपे रायाचें मोडिलें ॥ तंव कुंजरभार खवळले ॥ घे घे म्हणतिलें सकळिकीं ॥ ५३ ॥ काळ आणी माहाकाळ ॥ तैं दोन्हीं कुंजर हलकालोळ ॥ ते देखोती गोपाळ ॥ तयांवरी धांवीनलें ॥ ५४ ॥ तंव मालमर्दन जगजेटी ॥ धांवोनी बैसे कुंजराललहाटीं ॥ कुंभस्थळीं हाणोनि मुष्टी ॥ सीरें उफराटी पीळीतसे ॥ ५५ ॥ उपडोनियां दोन्ही दांत ॥ पाईं धरूनिया आपटीत ॥ कुंजर पळती किंकळिया देत ॥ दाही दिसा मोकळिया ॥ ५६ ॥ मोडुनी कुंजरांचे भार ॥ क्रोधें धांवीनला सारंगधर ॥ तेवेळें पळाला कंसासुर ॥ वरीले खणाहुनी पाहात असे ॥ ५७ ॥ मुष्टीक चाणोर माहांवीर ॥ ते बोलताती बडीवार ॥ राया राहें राहें थीर[2] ॥ नंदकुमर मारीन मीं ॥ ५८ ॥ मालखडीयाचे माहा द्वारीं ॥ रायें केली साता खणाची उपरी ॥ मग रावो गेला तीयेवरी ॥ मग तो पाचारि तयां मालांसीं ॥ ५९ ॥ तंव चाणौर म्हणें दातारा ॥ आहो जी राया कंसासुरा ॥ आज्ञा द्यावी माहा वीरा ॥ नंद- कुमरासीं भीडैन मीं ॥ ६० ॥ रामकृष्ण दोघे वीर ॥ आणि मीं मुष्टीक हा चाणोर ॥ तयांचे गोपाळ आपसर[3] ॥ आमचेहीं सकळ जेठी ॥ ६१ ॥ पाहे पा प्रतिवादु आमचा ॥ काईसा बडीवारू गौळीयाचा ॥ तंव कंसु म्हणें भरंवसा तुमचा ॥ आम्हासी असें ॥ ६२ ॥ आरे आमचे दळी ॥ उरलेती तुम्ही बळी ॥ म्हणें बा चंद्रमौळी ॥ राखा तुम्हासी ॥ ६३ ॥ म्हणोनि वस्त्रासहित विडा दीधला ॥ तंव मुष्टीक चाणोर गर्जिनला ॥ ब्रह्मकटाहो आदळला ॥ पाहों ठेला स्वर्गलोकु ॥ ६४ ॥ दोघे बोलती बडीवारू ॥ अरे कृष्णा तुं धाकुटे लेंकरू ॥ नाहीं वाळला माथाचा जारू ॥ तुझा सोहदरू कां भुळला ॥ ६५ ॥ अरे तुम्हीं आमचें स्थापीलें ॥ सुखें कां रे न व्हावे उगलें ॥ परी तुमचे भोग पुरलें ॥ कवण जालें तुम्हासी गुरू ॥६६॥

---

१ वासरा—पाठ.

२ स्थिर.

३ अपार—पाठ.

अरे कान्हा वीरा ॥ तु राया कंसाचा सोईरा ॥ येणें आधारें पोट भरा ॥ कारे मराल असतेन अवळक्षणे ॥ ६७ ॥ अरे तुं म्हणतोसी पवाडा केला ॥ वासुरू काउला मारिला ॥ तेणें गर्वे टाकिला ॥ हा ठावो आमचा ॥ ६८ ॥ अरे पाणियांतील विरूळा ॥ तो मारुन जालासी आगळा ॥ वापुडें बग मारुनिया सफळा[1] ॥ ठकीतोसी ॥ ६९ ॥ माउसीये सोखिलें ॥ बापुडें कीरडु उतटिलें ॥ थोर नाव केलें ॥ लाजसी ना ॥ ७० ॥ जैसा ससा आला भानवसा ॥ आतां तुं जासील कैसा ॥ शरण जा रें राया कंसा ॥ मीं तुज न मारी ॥ ७१ ॥ तुजसी झुंझता पाडु नाहीं ॥ शरण रीगें रे लवलाही ॥ तंव कृष्णरावो म्हणें सही ॥ तुं बोलत असती तें ॥ ७२ ॥ अरे गर्वे भुळले कुंजर ॥ नेणती सिंव्हाचे मार ॥ मिळाला भृकुटीयाचा भार ॥ तेणें गिरीवरू केवीचे पैं ॥ ७३ ॥ नखे खुडे काडी[2] ॥ तेथें स्वर्गाची कवण प्रौढी ॥ आली कुरंगिनीची उडी ॥ तरी काइ करी पंचाननातें ॥७४॥ शेषा विरूळया दंद पाहीं[3] ॥ तैसी तुज मज सरी नाही ॥ हे तु बोलिलासी सही ॥ आतां साही द्यावो माझा ॥ ७५ ॥ अरे कळीकाळ धर्मकेतु ॥ मीं यादव वंशी वसुदेवोसुतु ॥ बहु वडिवार बोलतु ॥ तो साच करी आतां ॥७६॥ मग मांडिलें ठाणा ॥ ते कवतीक पाहातसे कंसराणा ॥ घाये वाजती दणा दणा ॥ जग शहाणा न करी कृष्णा ॥ ७७ ॥ ब्रह्मांडगोळकाचीया माळा ॥ साजती शक्ती जेचीये गळा ॥ ते शक्ती करकमळा ॥ तेणें लाविली असें ॥ ७८ ॥ तेथें कंस चाणौर केउता ॥ परी शाहाणा न करी सर्वथा ॥ यैसा तडवातडवी हाणतां ॥ सोडवी ती चिकाटिया ॥ ७९ ॥ चाणौर महाबळी ॥ कृष्णरायावो तंवके मुष्टी वळी ॥ घाव हाणितला वक्षस्थळीं ॥ मग भूमंडळीं पाडियेला ॥ ८० ॥ तंव क्रोधें पाहे भोवतें ॥ तव मुष्टीक हाणे बळिभद्रातें ॥ तोहीं हाणितला मुष्टीघातें ॥ त्या दोहिं वीरातें मारियेलें ॥ ८१ ॥ बाहे आपुटूनी गर्जीनला ॥ ठाण मांडोनी उभा ठाकला ॥ तंव केसिया उठावला ॥ तो गर्जिनला सिंहिनादें ॥ ८२ ॥ थापा लाथा हाणतु ॥ मुखें कडकडा तोडीतु ॥ मागा पुढा आडवांगी हाणतु ॥ जेवी केतु उठावला ॥ ८३ ॥ कृष्णराया आणि भळीभद्रा ॥ मारीत चावीत दोही वीरा ॥ माल मुष्टीक चाणौरा ॥ या दोघां वीरांचा मीं सूड घेइन ॥ ८४ ॥ अरे मज केसीयापुढें ॥ हे पर्वत ररडि दाढें ॥ तु रे लेंकरू बापुडे ॥ तुज मीं काय मारू ॥ ८५ ॥

---

१ सगळा टाकिल त्वां–पाठ.

२ कुडे–पाठ.

३ पाड नाही–पाठ.

तुज मीं जीतेची धरून ॥ संखळा[1] पाई जडीन ॥ प्रतीदिनी मार करीन ॥ जेणें येमु कांटाळे ॥ ८६ ॥ यावरी कृष्ण जगजेठी ॥ वळली वज्र मुठी ॥ हाणे पोटि पाळी लल्हाटी ॥ केली पीठी हाडांचा ॥८७॥ मागुता हा(णित)ला चर्णघात ॥ बाहिर काढिली पोटिची आतें ॥ तंव देखिलें वीरातें ॥ पुढें मीळतां ॥ ८८ ॥ वाजंत्रांचां गजरीं ॥ तेणें नाद उठिती अंबरी ॥ तंव भोंवतां वेष्टिला माहावीरीं ॥ रामकृष्ण ॥ ८९ ॥ सकळांचा येकची घावो ॥ मागा पुढा नेदीती पावो ॥ जे जे बळार्थी माहाबाहो ॥ ते हाणती घावों मुद्गलाचा ॥ ९० ॥ त्रिशूळ लहुडी बाणवरी ॥ चक्र गदा हाणती शिरीं ॥ येक वरूषती शिळाधारी ॥ तेथें मुरारी न दिसेंचीं ॥ ९१ ॥ वज्रस्वरें[2] श्रीकृष्ण रावो ॥ तो अवतरला देवांचा रावो ॥ तेथें मानवीयाचा कवण ठावो॥ तो काय करील ॥ ९२ ॥ जैसी पुष्पाची पुजा होये ॥ तैसेची आंगी लागती घायें ॥ तंव वरीले खणी जाउनी पाहें ॥ कंसरावो ॥ ९३ ॥ रामकृष्ण घायातळीं ॥ ते भस्म जाले म्हणती बळी ॥ तंव गर्जीनले अंत्राळी ॥ उडोनियां ॥ ९४ ॥ हाक फुटली दोघांची ॥ तंव टाळी बैसली वीरांची ॥ शस्त्रें गळाली हाताची ॥ सांडवले[3] वीरस्त्रीया ॥९५॥ जे प्रतापीये उभे देखिलें॥ मारुनी चूर्ण केलें ॥ जे पळतां देखिलें ॥ ते राखिले न मारीताची ॥ ९६ ॥ पुनरपी गर्जीनले सत्राणें ॥ तंव कांठाळली देवाची मनें ॥ म्हणती दैत्या आलें उणें ॥ तेहीं वोचकलें ॥ ९७ ॥ पाताळी शेप होता दुचिता[4] ॥ पृथ्वी उलंडु पाहें आतां ॥ म्हणें ब्रह्मकटाहो पालथा ॥ होउं पाहातु असे ॥ ९८ ॥ हाकाचिया प्रतापें॥ कंस पडिला दुचीते ॥ उडोनी कृष्णरावो गेला अवचिते ॥ जेथें कंस होता तेथेंचि ॥ ९९ ॥ तो धांवोनी धरिला केंसी ॥ आणी आपटीला भूमीसी ॥ तंव चेतना नाहीं तयासी ॥ प्राण गेला देखतांची ॥ ९०० ॥ मग तो मेलाची मारी ॥ तंव येरा वीरासी जाली अपरांपरी ॥ तयासी आडवा रीगोनी मारी ॥ तो बळीभद्र वीरू ॥ १ ॥ तेथें अवघेची आले काकुळती ॥ जी शरण आलों म्हणती ॥ येक लोटांगणी येती ॥ येक धरिती दाती तृनें ॥ २ ॥ मलखडिया भीतरा ॥ वीरु नाहीं दुसरा ॥ कृपा आली सारंगधरा ॥ नाभी रे नाभी म्हणतसें ॥ ३ ॥ मग म्हणें कृष्ण सावळा ॥ चला रें फोडुं बंदसाळा ॥ मग तोडुनियां सांखळा ॥ कवाड फोडियली ॥ ४॥

---

१ शृंखला.

२ वज्रशरीरी—पाठ.

३ सोडविले—पाठ.

४ दुश्चित.

वसुदेवे देवकीयेसी ॥ नमस्कारु करी रुसीकेसी ॥ अह्लाद जाला भुमीसी ॥ गोकुळा गुढी पाठविली ॥ ५ ॥ कंसाचीया राणीया अपत्यें ॥ नाभीकारिली समस्तें ॥ तेणें विरोधुनी आमतें ॥ हटें प्राण दीधला ॥ ६ ॥ मग नगरीचें लोक सकळै ॥ त्यासी आस्वासीतसे वनमाळी ॥ ते मिळोनीया नगरकुळी ॥ सभामंडपीं वैसलें ॥ ७ ॥ तेथें जाला जयेजयेकारू ॥ पुष्पवरुषावो करिती सुरवरू ॥ वाजंत्राचा गजरू ॥ गर्जतसें ॥ ८ ॥ भाट वंदीजन वेगाडे ॥ पढती कृष्णरायाचें पवाडें ॥ उचीत देतसें रोकडें ॥ पात्र पाहोनियां ॥ ९ ॥ मग उग्रशेनातें ॥ पाचारिलें कृष्णनाथें ॥ राज्यें पाटीं तयातें ॥ वैसविलें ॥ १० ॥ कृष्णरावो म्हणें उग्रसेनासी ॥ हा बोलो नाही आम्हासी ॥ बोलाउनी सोडिरेंकेसी ॥ खोटें केलें ॥ ११ ॥ आम्हीं भावाचें भोक्ते ॥ म्हणोनी पाताईलो[1] तुमतें ॥ खोटें राखिलं कवणातें ॥ हे विचारून पाहे पां ॥ १२ ॥ प्रथम योगी संखासुरू ॥ वेद आलासे चोरूं ॥ तया कारणें मछअवतारू ॥ जाला पाहीं ॥ १३ ॥ तयासी राज्य करितां सागरी ॥ ब्रह्मयाचा घरी केली चोरी ॥ हे कुविद्या शरीरी ॥ कां उपजावी ॥ १४ ॥ दैत्या जाला प्रसन्न ॥ हा भोला चक्रवर्ती आपण ॥ तोहीं कां अपमान ॥ देवाचा करावा ॥ १५ ॥ दैत्य म्हणती देवासी ॥ अमृत दीजे आम्हासी ॥ म्हणोनी तयासी ॥ उडविले तेहीं ॥ १६ ॥ रुसी मुनी महंता ॥ आणि समस्ता देवतां ॥ आणि विप्रकुळां वहुता ॥ नोळखेंची ॥ १७ ॥ तयाचा धांवया ॥ कूर्म अवतार अमृत द्यावया ॥ चौदा रत्नें काढावया ॥ हेची कारण ॥ १८ ॥ देवासी अमृतपान ॥ सुरापान दैत्या देउन ॥ ऐसी माव करून ॥ निभ्रांसीलें राक्षसा ॥ १९ ॥ शंभूचे द्वारपाळी ॥ ते सेवा चुकले येकें काळीं ॥ श्राप दीधला चंद्रमौळी ॥ जन्म मृत्यलोकीं ॥ २० ॥ मग तीहीं विनाविला महेश्वरू ॥ त्यासी उश्राप दे कर्पूरगौरू ॥ मग केला नमस्कारू ॥ जये विजये द्वारपाळी ॥ २१ ॥ अरे जये विजयें द्वारपाळा ॥ तीन जन्में दैत्यकुळा ॥ विरोधोनी गोपाळा ॥ मोक्षें पावाल ॥ २२ ॥ अरे जो अविनाश अपरांपरू ॥ आणि जो सर्व जीवांचा दातारू ॥ सर्व सामर्थेसी ईश्वरू ॥ अवतरला मृत्युलोकी ॥ २३ ॥ तयासी विरोधितां ॥ मोक्ष होईल नीभ्रांतां ॥ मागुतें त्वरिता ॥ जालें हिरण्याक्ष हिरण्यकसीपु ॥ २४ ॥ तयासी प्रसन्न महेश्वरू ॥ तुझीया वळा ठेंगणा मेरू ॥ ऐसा हिरण्याक्ष वीरू ॥ महाबळिया ॥ २५ ॥ हिरण्यकशपु धाकुटा ॥ तयासी मरण नाहीं अपघाता ॥ रात्री ना दिवसा ॥ सर्वथा मरण नाहीं ॥ २६ ॥ सजीवें ना नीर्जीवे ॥ मरण नाहीं अज्ञीभावें ॥ ऐसें माहादेवें ॥ जन्मी घातलें ॥ २७ ॥

[1] पावलो–पाठ.

ऐसा महादेवो प्रसन्न जाला ॥ तयासी अभीळासु कां संचरला ॥ श्रृष्टी घेउनी पळाला ॥ हिरण्याक्ष ॥ २८ ॥ मातै पाताळे घेउनी निघाला ॥ तंव पृथ्वीनें धावां केला ॥ तीचया धांवया पावला ॥ वेषु धरुनी वराहाचा ॥ २९ ॥ हिरणाक्ष वधुनी ॥ श्रृष्टी राखिली मदनी ॥ कपट करितां कवणी ॥ राहिला नाहीं ॥ ३० ॥ दुसरा हिरण्यकशिपु वीरू ॥ तेणें माझा केला अव्हेरू ॥ वांचुनी कर्पूरगौरू ॥ अणु[१] न म्हणें वाचेसी ॥ ३१ ॥ हे कपट अविद्या काईसया ॥ करावी सुखें असें तया ॥ प्रल्हादा उद्धरावया ॥ काय कारण ॥ ३२ ॥ तो माझेची स्मरण करी ॥ येरु तयाते वारी ॥ मग पुत्रत्वें वैरी ॥ जाला तयासी ॥ ३३ ॥ पुत्राकरितां अपमान ॥ नरसिंहु पावला हाक देउन ॥ शिव शब्द सत्यें करून ॥ हिरण्यकशपु विदारिला ॥ ३४ ॥ ऐसें विरोधोनी प्राण दीधलें ॥ परि मोक्षमुक्ती नाहीं पावलें ॥ कवीळासी रावो बोलिलें ॥ ते नव्हती पूर्ण अवतारू ॥ ३५ ॥ बळी राज्ये करीं सकळ ॥ त्यासी कां बुधी आठवली अमंगळ ॥ रवें वसविलें पाताळ ॥ अद्यापीवरी ॥ ३६ ॥ फरशरामु रेणुकानंदनु ॥ तेणें थापिलें[२] ब्राह्मणु ॥ त्याचें व्रत मोडुनु ॥ राज्यें करिती राक्षेस ॥ ३७ ॥ तेथें ते द्वारपाळ जाले आपण ॥ रावण आणि कुंभकर्ण ॥ त्यासी शंभु प्रसन्न ॥ दीधलें सुवर्णाचें नगर ॥ ३८ ॥ त्यासी कुविद्या संचरली ॥ रामाची सीता कां नेली ॥ तेणें लंका विध्वंसिली ॥ स्थापिला वीभीषणु ॥ ३९ ॥ वधुनी रावण कुंभकर्ण ॥ परी मोक्ष नव्हेंची त्यालागुन ॥ तो अवतारू नव्हे परिपूर्ण ॥ सामर्थ्यासहित ॥ ४० ॥ तिसरे जन्म द्वारपाळा ॥ ते जन्मलें वक्रदंत सुसपाळा[३] ॥ त्याच्या मोक्षाची वेळा ॥ त्या मीची जाण ॥ ४१ ॥ कैसें विरोधोनी फळ जोडिलें ॥ तें तुम्हासी अवघड कां वाटलें ॥ ऐसें उपदेशिलें ॥ उग्रशेनाप्रती ॥ ४२ ॥ मग उग्रशेनें केला नमस्कारु ॥ बोलविला अक्रूरु ॥ राजपाट वेगवगरु ॥ दीधला पाहिजे ॥ ४३ ॥ मग पुजीला उग्रशेनु ॥ आपलेनी स्वहस्तें स्थापुनु ॥ समस्ता अभये देउन ॥ मग गोकुळा निघतें जालें ॥ ४४ ॥ रथीं आरूढलें राम रुपीकेशी ॥ अक्रूर उग्रशेनु पाठीसी ॥ तेजें वाटीले गोपाळांसी ॥ ते दृष्टीसी चमकताती ॥ ४५ ॥ सकळु दळभारू चालिला ॥ नगर लोक बोळवित आलें ॥ भाटी बंदीजनी केला ॥ पुढा गजरू ॥ ४६ ॥ अहो जी कान्हा जगजेठी ॥ पवाडे वर्णिले भाटी ॥ चरणी श्रीदाचिया वेठी ॥ अंगिरायांवरी ॥ ४७ ॥ ठांइ ठांइ

---

१ आनु.

२ स्थापिले.

३ शिशुपाळ.

राहती ॥ कळापात्रें नृत्य करिती ॥ तेथें वोवाळणीया पडती ॥ पसायें दानें ॥ ४८ ॥ टाळ मांदळ सु(स्वर)छेंदें ॥ आळाप दावीताती श्रुतीवेदें ॥ पदें बोलतीं आनंदे ॥ कृष्णचरित्रांची ॥ ४९ ॥ ऐसा समयो कृष्णापुढें ॥ भोवतें राजकुमराचें आखाडें ॥ जैसें (काशियाचें दंडे) ॥ उग्ररूप ॥ ५० ॥ भोवता सैन्याचा भारू ॥ वाजंत्री गर्जे अंबरू ॥ पाहाती ब्रह्मादि सुरवरू ॥ कुमर नंदाचा ॥ ५१ ॥ तेतीस कोडी देवाचा धामीं इंद्र ॥ पाहो ठाकला भानुचंद्र ॥ पवाडमल राजींद्र ॥ पुजीते जालें ॥ ५२ ॥ तंव नंदु समग्र नगरासहित ॥ तो साउमा कृष्णरायासी येत ॥ गोकुळ आनंदभरित ॥ श्रीं्गारिलें असें ॥ ५३ ॥ हाट हाटवटीया चौवारें ॥ गुढीया तोरणें मखरें ॥ घरोघरी वाजंत्रे ॥ गर्जताती ॥ ५४ ॥ नगर श्रींगारिलें कुसरी ॥ जेवी लोपली अमरावती नगरी ॥ पाहों ठाकलीया मरनारी ॥ सप्त खणावरी वेघोनिया ॥ ५५ ॥ तंव नंदरावो साउमा आला ॥ सकळ गौळियांसी भेटला ॥ तो समारंभु पाहो ठेला ॥ देवासहित इंद्र ॥ ५६ ॥ वाजंत्राचा गजरी ॥ गगसिंगे काहाळा भेरीं ॥ दमामे ढोल निशाणें अंबरीं ॥ गर्जीनली येकवेळें ॥ ५७ ॥ उपांगें गौमुखें टमकिया ॥ टाळमृदांग श्रुती लागलिया ॥ गुंबगुबीया पटीश्रा ॥ मोहोरी पावें ॥ ५८× ॥ दोनी दळें येकजाली ॥ वाजंत्री ब्रह्मांडे बहीरावली ॥ येकवेळें गार्जिनली ॥ भेटीसवें ॥ ५९× ॥ बापापुत्रा आलींगण ॥ ते सुखस्नेहे नेणती ॥ कठिण ॥ प्रेमें सद्गदीत मन ॥ ते खूण ज्ञानीये जाणती ॥ ६० ॥ वसुदेवो नंद नमस्कारूनी ॥ मग वंदिली जननी ॥ सकळा आलींगण देउनी ॥ गोकुळ प्रवेशलें ॥ ६१ ॥ प्रवेशता गोकुळ ॥ लोक आनंदे पाहाती सकळ ॥ दुरुनी वंदिती करकमळ ॥ नगरनारी ॥ ६२ ॥ घरोघरी देउनी कपाटें ॥ दाटती वीदिया चोहाटें ॥ नाद उमटती गोमटें ॥ अंतराळीं ॥ ६३ ॥ नंदाचिये घरीं ॥ मुडपघसनी चरणचारि ॥ आरतीया नगरनारी ॥ कुरवंडिया टाकित्याती ॥ ६४ ॥ वोवाळुनी निंबलोनें ॥ भुळी पडली मदनें ॥ येकी पाहाती वदनें ॥ आपणयातें न सांभाळिती ॥ ६५ ॥ ऐसा समयो प्रवर्तला ॥ देवो जाणोनी मंडपी बैसला ॥ तेथें नटारंभ मांडला ॥ नानाविध ॥ ६६ ॥ क्षण येक पाहिला विनोदु ॥ पसायेदान देतुसें गोविंदु ॥ तंव अवचिता पडीला नादु ॥ श्रवणी देवाचिये ॥ ६७ ॥ स्वर्गाचिये आकाश-पोकळी ॥ देव उतरती सकळीं ॥ शंखाचिया नादें भूतळी ॥ दुमदु-मीली ॥ ६८ ॥ इंद्र देवरावो आपण ॥ तेतीस कोडी देवतागण ॥ अंतराळींचे गंधर्व दारूण ॥ येत जाले ॥ ६९ ॥ तेहीं केला पुष्पवरुषावो ॥ पुजिला तो कृष्णदेवो ॥ कवण जाणे तेथीचा भावो ॥ गौळी तटस्त राहिले ॥ ७० ॥ समस्तां क्षेमा आलिंगण जालें ॥ परी कवणी नाहीं देखिलें ॥ रामकृष्ण

× ही ओवी दुसऱ्या प्रतीत नाहीं.

९५५८० ७५८९० २०८८ ८७१८२ २२१३८

पूजीलें ॥ सकळ देवी ॥७१॥ आनंदें उचंबळला ब्रह्मकटावो ॥ पूजीला देवाचा रावो ॥ तेथील खूणेचा अनुभवो ॥ ते ज्ञानिये जाणती ॥ ७२ ॥ खुणेखुण बाणली ॥ देवासी आज्ञा जाली ॥ मग नृपकुळी मीळाली ॥ देशोदेशीची ॥ ८३ ॥ ऐसा श्रीकृष्णरावो विजया जाला ॥ नगर लोकां आनंदु प्रवर्तला ॥ देवांसी सुखानंदु थोर जाला ॥ म्हणती हा पूर्ण अवतारू ॥ ७४॥ सकळ सृष्टी आनंदली ॥ ब्रह्मवृंदें संतोषली ॥ योगियासी वोळली ॥ अमृतगंगा ॥ ७५ ॥ आतां राज्य करिल मेदनीं ॥ सकळ दुष्टांतें नासुनी ॥ साधु संतांतें स्थापुनी ॥ उद्धरिता जाला ॥७६॥ जप तप योग दानीं ॥ तीर्थव्रतें यागयजनी ॥ न जोडे नाना आचरणी ॥ तो ये मेदनी अवतरला ॥ ७७॥ गिरी भारती संन्यासी दंडाधारी परमहंसी ॥ न सांपडे सिद्धसाधकासी ॥ तो देखा गौळियासी ॥ आसनी भोजनी ॥ ७८ ॥ आरोगिये क्षप्नीक[1] ॥ जंगम शिवभक्त ॥ साहीं दरुषणें नानावेश ॥ पाहतां नातुडेची ॥ ७९ ॥ जो साहीं शास्त्रां अगोचरू ॥ अठरा पुराणा व्रेव्हारू ॥ चंद्रवेद्रा परमेश्वरू ॥ नेणवेची ॥ ८० ॥ तो गोकुळासी अकल्पित आला ॥ लेंकुरपणें खेळता जाला ॥ ऐसा वीरुळा[2] बुझला ॥ ये संवसारी ॥ ८१ ॥ आतां हा बाळक्रीडा आईकतां ॥ क्षाळण होये मागीला दुरीतां ॥ मनोभावें आईकतां ॥ इछिले फळ होये ॥ ८२ ॥ अज्ञाना होये मतीज्ञान ॥ ज्ञानीयां भक्ती मोक्षसाधन ॥ निपुत्रीका पुत्रदान ॥ देईल श्रीकृष्णनाथु ॥ ८३ ॥ दुर्बळा संपती होये ॥ दारिद्र्याचें दारिद्र जाये ॥ कुबुद्धीयातें होय ॥ सुबुद्धी देता ॥ ८४ ॥ आधर्मीयातें होये धर्मवासना ॥ कठीणाये कारुना ॥ विषयलंपटासी लक्षणा ॥ येक पत्नीयाचें[3] ॥ ८५ ॥ म्हणोनि हा बाळक्रीडा आईकीजे ॥ आणि प्रतिदिनी अनुष्ठिजे ॥ तरी कांइसया कष्टी होईजे ॥ तीर्थें उपवासें ॥८६॥ भावें बाळक्रीडा परिसनें ॥ येक वेळा श्रवणी आईकणें ॥ तरी सकळ तीर्थे स्नानें ॥ घडती त्या नरासी ॥ ८७ ॥ या शब्दाचा विश्वासु ॥ न धरितो केवळ पसु ॥ अव्हेरू करीतया नासु ॥ कुळगोत्रासीं ॥ ८८ ॥ परीसे तया इतुकें होय ॥ वाची तयां मोक्ष विजये ॥ संग्रहो केल्या जाये ॥ केले महापातक ॥ ८९ ॥ बापा यादवाचीया सुता ॥ उर्धरण होये नागनाथा ॥ चिंतीता कृष्णनाथा ॥ ऐसें फळ होये ॥ ९० ॥

इति श्रीमद्भागवतें माहापुराणें दशम स्कंदे ॥ बाळक्रिडा संपूर्ण समाप्त ॥ ९९० ॥

खर नाम संवत्सरे सके ॥ १५७३ ॥ मार्गेस्वर सुद्ध सप्तमी वार रवीवार संपूर्ण समाप्त ॥ हस्ताक्षर राणोजीचें कांसार ॥ ॥ ४ ॥ ॥

१ क्षपणिक.

२ वरिलें जनी रिझला-पाठ.

३ पत्नीव्रत-पाठ.

परिशिष्ट

# माबळभट चारित्र

## ( भा. इ. सं. मंडळ क्रमांक २२।६३ )

श्रीकृष्णाय नमः ।। शुक उवाच ।।

आइकै राया परिक्षिति । श्रीकृष्णाची ख्यांती । पुतना मारुनी निभ्रांती । सकळ वीचारी पडीले ।। १ ।। ते सकळ पडले चिंतावनी । तंव रावो म्हने बुधि न सांधा रे कवनी । तया गोकुळा जाउनी । झडकरी ठाइ घाला ।। २ ।। तवं भट म्हने राया विनंती परियेसी । रीठासुर देइ मजपासी ।। मग मी काये करीन तयासी । तें परीयेसी राया ।। ३ ।। तवं रीठासुर उभा राहिला । तेनें वीडा घेतला । रीठागांठीमध्यें रीगला । मग भट नीगाला गोकुळांसी ।। ४ ।। मग तो गेला आपुलीया घरासी । उपरवाइले वोभातो वाइलेसी । नवि प्रति देइ मजपांसी । मी जातो गोकुळासी म्हणौनिया ।।५।। ते म्हने तुम्ही जाता गोकुळा । ते घृत देति सवे न्यावा नळा । तंव तो म्हण पापिणी अमंगळा । अपमव्ये काये वोलिली ।। ६ ।। मग तये अवेश्वरी । भट नीघाला झडकरी । सुर्याउदये नंदाच्या घरी । आला गोकुळामाजी ।। ७ ।। मग भट वोलीला आसीरवचन । नंद दोघी कर जोडुन । भटासी केलें नमन । नंदराये ।। ८ ।। म्हणे रा नंदराया । देवो आले तुझीया ठाया । मग नमस्कर करुनि येश्वदामाया । पुसे बाळकाचे नांव ।। ९ ।। तवं गर्गाचार्य बोलती । याचे बहुत रुपें असती । आणि नामें दीसती । सहस्त्रकोटी ।।१०।। हा परब्रह्मअवतारु । करील दैत्यांचा संहारु । साधुसंता देउनि अभयेकरु । स्थापील हा ।। ११ ।। ऐसे सांगोनि गेला जाण । आणि गर्गाचार्य आपण । तव महाबळभट आले लवकरुन । गोकुळासी ।। १२ ।। तंव म्हणे नंदरावो परियेसी । करजोडुनी साष्टांग तुम्हासी । मग चंदनाचा पाट तयासी । वैसावया दीधला ।। १३ ।। तवं भट म्हणे मागो आलो वर्शासन । नंदा कीर्ति बहुत जाली तुझी जाण । आणि आम्हासी देतासी दान । म्हणौनि आलो मागावया ।। १४ ।। घृतासाठी आणिला नळा । काड पापिणी अमंगला । तुम्ही तवं अंतःकरनी निर्मळा । ज्ञानिये चतुर ।। १५ ।। मग चरणक्षाळण जालें । गंधवीडें समर्पिलें । मग आश्चर्य वाटलें । महाबळभटासी ।। १६ ।। तंव गोकुळामाझारी । मंगळ आनंद घरोघरी । पाहुं

आल्या अवघ्या नारी । म्हणती पुत्र झाला येश्वदेसी ।। १७ ।। भट पुसे नंदा तुम्हा पुत्र जाला । सांघो श्रावण मास अष्टमीला । रोहिणी नक्षत्री जन्मला । भाग्य तुझें ।। १८ ।। याचें जन्मनांव काय सांघा आम्हासी । तंव भट म्हणे येश्वदेसी । याचें जातक वर्तुन देइन तुम्हासी । मग आम्हा बहुत दान होइल ।। १९ ।। पुढें पातडें मांडलें उकलुनी । तंव येश्वदेनें पाट दीधला आणौनी । म्हणे नंदा आतां ब्रह्मवाणी । आइक माझी ।। २० ।। आंगोळीया लेखिनु वीचारुनी पाहे । डोइ हालवे नेत्रीं अस्त्रपात ये । म्हणें आहा कटकटा ऐसें काये । जालें गा देवा ।। २१ ।। तंव नंद म्हणे भटो कैसें वर्तले । याचे जातक कैसें नीघालें । तंव भट म्हणे नव्हेची भले । यासी जन्म झाले मुळावरी ।। २२ ।। शनि राहो मंगळ केतु । दृष्टी ग्रह असे सांघतु । अर्धरात्री अष्टमी आतु । दोहीं नक्षत्रीं जन्मला ।। २३ ।। अरे हा कुळक्षेवो करील । याची जयावरी दृष्टी पडेल । तो मुक्तीतें पावेल । ऐसे सत्य जाण ।। २४ ।। यातें टाकीजें यमुनें डोहीं । यासी आणिकु वीचारू नाही । परी मजसी बाळ दावी कांहीं । वीचारु असे ।। २५ ।। गीठगांठीचि माळा । ते मी घालीन याचीया गळां । मग सर्वासी होईल भला । नंदराया ।। २६ ।। मग नंदु रावो वीनंती करी । स्वामी येकादा प्रेत्नु करी । तंव भट म्हणे कांही चिंता न करी । बाळ दाखवी आम्हासी ।। २७ ।। तंव बाळ आले भटें देखिलें दृष्टी । तो चतुर्भुज जगजेठी । मग गीठागांठी घातली कंठी । भटें कपटरूपें ।। २८ ।। तंव तो गीठासुरु । तेणे बाळकाचा करावा संव्हारू । कंठी चेपुनी जंव मारावें लेकरूं । तंव काइ वर्तले ।। २९ ।। तंव तेणें बाळकें तो मणी । धरुनीं घातला वदनीं । तो फोडीला कडाडुनी । तंव येश्वदा मनी दचकली ।। ३० ।। ते मुखीं आंगोळी घालुनी पाहे । तंव असुध मांस देखताये । मग भटें भयें मानीलें पाहे । कैसे हे लेकरूं ।। ३१ ।। तंव मातेनें पाहीलें मुख । मग बाळकें केला धोख । त्या वेगळे देखिलें येक । मर्दिला गीठासुरू ।। ३२ ।। मग भट गजबजीला । तो उठुनी पळु लागला । पुढां काये वर्तातु वर्तला । तो आइकावें श्रोतेजन ।। ३३ ।। हा पुत्र तुम्हा नव्हें हा कवणा । ऐसे भट बोलीला वचना । तंव हासीला यदुराणा । मग वींदाने मोकलीलें भटावरी ।। ३४ ।। जंव वर्तत होता खोटेंपणें । तंव तोंडावरी पीढे बैसलें जाऊन तेणें । तोंड सुजवीलें गहने । मग पळों लागला भयभीतु ।। ३५ ।। बैसु घालता होता पाटु । तेनें घेतला उचाटु । पीढीयांचा जाला धडबडाटु । घरोघरीचीया ।। ३६ ।। तेलातुपांची मापें । तें चालिलीं पैं सानुपें । मोगरीया द्रांवती कोपें । मारू करिताती भटासी ।। ३७ ।। तव साळीग्राम गडबडीलें । देव्हारपाट साउमे आले । आगळाचें सूर सुटलें । खेळ खेळो बाळलीला ।। ३८ ।। नंदरायाचा बैसावयाचा पाट थोर । तो

पाठीवरी बैसला निष्ठुर । घृतालागी आणिला होता नळा थोर । तोचि मस्तकीं वाजतु असे ॥ ३९ ॥ वोट्यावरील माथली । तेचीं भटाचें मस्तकीं लागली । तेनें बहीरू जाला तयेवेळीं । कांहीं आइको नये ॥ ४० ॥ तंव भटें केला महाशब्द । म्हणें पाहों आलों तुमचें कौतुक । आम्हांसी मार बहुत होत । तुम्हीं पहता वीनोद नंदा ॥ ४१ ॥ मोगरीया लाटनी पोळपाट । म्हणे तीये मुयाचे पोट । कासावीस जाला म्हणौनी पीटीलें लल्हाट । भटें आपुलें पैं ॥ ४२ ॥ गरगरा भोंवरी आली भटासी । तंव काष्टयंत्र होता वेसीपासी । ते हस्तपादीं रीगतीं कैसी । तेणें अंतु नाही तयाचेया दुःखा ॥ ४३ ॥ तळमळीतु आला वेसीपासी । धोत्र सुटलें नग्न परीयेसी । मळमूत्र वाहे तयासी । वीटंबना होत असे ॥ ४४ ॥ घरीची काष्टें राहिली । मग रानकाष्ठा आज्ञा दीधली । तवं चहुकडेहुन चालली । तया भटावरी ॥ ४५ ॥ मग चालविलें कुळवे नागर । म्हणे भटा थीर रे थीर । तें नुडौनी वैसती थोर । तया भटालागी ॥ ४६ ॥ पीसाटीया वेसीबाहीरी आला । होनें घालताती घाला । मग तो मथुरेसी आला । संकष्टें परीयेसा ॥ ४७ ॥ तो जीवें न मारावा । ऐसा नीरोपु जाणावा । तेवेळीं येकेची घाइ पुरा करावा । परी आज्ञा नाहीं देवाची॥४८॥ तवं तो दीसा भुली जाला । आणि नग्नची पळों लागला । म्हणे हें काष्टें घेतील प्राणांला । तवं लोक येती पहावया ॥ ४९ ॥ तवं तो पळत मथुरेसी आला । धोत्र सुटलें नग्नचीं देखिला । जन पाहावयासी आला । मथुरापुरीचा ॥ ५० ॥ दुतें धरुनी भटासी । कंसाजवळी आणीले परीयेसी । मुर्छना येउनी भूमीसी । पडला सभेमार्जी ॥ ५१ ॥ तवं कंसु मनी दचकला । बहुत जीव्हारीं खोचला । मग म्हणे काये जाले या ब्राह्मणाला । नेणु कैसें वर्तलें ॥ ५२ ॥ देखौनि भटाचा वेदना । वीस्मो पावले नरनारी जन । म्हणती कवण मावे जगजीवना । जालीया भटासी ॥ ५३ ॥ थोर जाला हाहाकारु । तवं आकासीं देखिलें कुळेवें नागरु । म्हणती सकळ समाचारु । भटा काये वर्तलें हे ॥ ५४ ॥ तवं भटाची मुर्छना हरली । क्षीना एका सावध जाला तये वेळीं । मग बोलीला तये वेळीं । महाबळभटु ॥ ५५ ॥ तवं तो भट बोलीला परीयेसी । राया मी गेलुं गोकुळासी । गीठांगांठी घातली बाळकासी । तयेवेळीं ॥ ५६ ॥ तवं तो नंदाचा बाळु । गीठामणी धरीला केवळु । मुखि घातला तये वेळीं । तो मर्दिला मुखीं ॥ ५७ ॥ ऐसा वधीला गीठासुरु । मग मज जाला काळांचा मारु । ऐसा वर्तमान वीचारु । जाला कंसराया ॥ ५८ ॥ गीठासुर दैत्य दारुण । त्याचा बाळकें घेतला प्राण । पुढां कैसें वर्तलें जाण । तें सांघेल कृष्णदास तानों ॥ ५९ ॥

इति श्री भागवते महापुराणे । परमहंससंहितायां श्री दशमस्कंदे । महाबळभट कथननाम शोडशोऽध्याय : ॥१६॥ श्रीपरब्रह्म । नमो नमामीहं ।

# विष्णुदास नाम्याची चक्रव्यूहकथा (द्रोणपर्व)

## माहिती व विवेचन

१ नामदेवांच्या छापील गाथांमध्यें अनेक कवींच्या काव्यांची भेसळ दिसते व ज्ञानेश्वरकालीन आद्य नामदेवांचें काव्य कुठलें तें बरोबर कळत नाहीं. या काव्यांत विष्णुदास नामा हें कविनाम वारंवार येतें. शुकाख्यानावरुन असें दिसतें कीं त्याचा कर्ता विष्णुदास नामा हा इसवी सन १५९५ मध्यें हयात होता. परंतु विष्णुदास नामा हें अभिधान विष्णुचा दास या अर्थी अनेकांनी वापरलें असण्याची शक्यता वाटते. विष्णुदास नाम्याची बुधबावणी छापली आहे. या बाबतींत अजून संशोधन व्हावयाचें असून त्याबद्दल उपलब्ध माहिती ऑक्टोबर १९६२ च्या महाराष्ट्र साहित्यपत्रिकेंत मिळेल.

२ विष्णुदास नाम्यानें भारत लिहिलें व तें एकांकाळीं फार प्रसिद्ध होतें. त्याच्या प्रती ठिकठिकाणीं आढळतात. हा भारतकार विष्णुदास नामा कोण हा एक मोठा प्रश्न आहे. कृष्णदास नामा हा प्राचीन कवि भारत नामदेवांनी लिहिल्याचें आदरपूर्वक सांगतो, परंतु उपलब्ध भारताची भाषा यादवकालीन नाहीं. भारताच्या निरनिराळ्या प्रतींत विलक्षण फरक आढळतो. आदिपर्वाची ओवी संख्या दोन हजारापासून चार हजारापर्यंत आढळते. कांहीं पर्वांत मूळ गाभा असून ओवी-संख्या निरनिराळ्या काळीं त्यांत भर घालून फुगवली असें दिसतें तर कांहीं पर्वांच्या प्रतींत इतकी भिन्नता आढळतें कीं त्याचे कर्ते निरनिराळे होते कीं काय असा संशय उत्पन्न होतो. भारताची अनेक पर्वें महानुभावीय मठांत आढळतात. नामदेवांचा उल्लेख महानुभावीय ग्रंथात येतो व त्यांनी महानुभावीय उपदेश घेतला असें स्मृतिस्थळाकार सांगतात.

हें भारत प्रकाशित करण्याचा आजपर्यंत प्रयत्न झाला नाहीं. स्वर्गारोहण पर्व इ. स. १८८८ मध्यें छापल्याचा कै. आजगावकरांनी उल्लेख केला आहे. भारताची सुटी प्रकरणे देखिल आढळतात. छापील गाथेंतली म्हाळसेनकथा (द्रोणपर्व) ही उपलब्ध हस्तलिखितांत आढळलेली नाहीं. अनंतव्रतकथा (वनपर्व) अप्रकाशित असून एकादशीमहात्म्याच्या एका प्रतींत ती कथा शांतिपर्वांत असल्याचा उल्लेख आढळला.

चक्रव्यूहकथेचें हस्तलिखित धुळें येथील राजवाडे संशोधनमंदिरांत एका महानुभावीय बाडांत आहे. तें स्वतंत्र आख्यान असल्याचा समज बरोबर नसून तें

द्रोणपर्वच असल्याचें महाराष्ट्र सरकारच्या औंध वाचनालयांतील द्रोणपर्वाशीं तुलना करतां आढळून आले चक्रव्यूहकथेंत नमनापूर्वी आणखी १९ ओव्या होत्या असें दिसतें, त्यांतल्या १५ व सोळावीचा कांहीं भाग उपलब्ध नाहींत. या १९ ओव्या औंध प्रतींत नाहींत. त्याच्या पुढच्या तीन ओव्या महानुभावीय घाटणीच्या आहेत. औंध प्रतींत व अन्यत्र त्या निराळ्या असून त्यांत गणपती व सरस्वती यांना नमन आहे. चक्रव्यूहकथेंत प्रत्यक्ष द्रोणवध नाहीं. ६२२ ओवीपुढें कांहीं तरी भाग गळला असावा. औंध प्रतींत हा भाग सुमारें शंभर ओव्यांचा विस्तृत आहे, परंतु कदाचित् तो अगदीं थोड्या ओव्यांचा मुळांत असूं शकेल. द्रोणपर्वाच्या अन्य प्रती पाहतां चक्रव्यूहकथा जास्तीत जास्त मूळ गाभा दर्शविते असा तर्क होतो. या निरनिराळ्या प्रतींत इतका फरक आहे कीं पाठभेद देणें शक्य नाहीं. मूळ गाभा शोधून नंतर पाठभेद शोधणें जरूर आहे.

तिसऱ्या प्रसंगाशेवटीं 'तें सांगें विष्णुदास पंडीतें', चवथ्या प्रसंगा अखेर 'ते सांगैल कवि कृस्ण पंडीतें' व पांचव्या अध्यायाशेवटीं 'म्हणे पंडित विष्णुदास' असें म्हटलेलें आढळतें. पांचव्या अध्यायांत 'पंडितें' असेंच पाहिजे व मात्रा गळाली असावी. विष्णुदास स्वतःला पंडित म्हणवीत नसून तो पंडितांना गोष्ट सांगत आहे. कवि स्वतःला 'कृष्ण' नांव देतो व कथे शेवटीं स्वतःला 'दास श्रीकृष्णाचा' म्हणवतो. अशा ओळी औंध प्रतींत नाहींत. भारतच्या कर्णपर्वाच्या एका प्रतींत कांहीं ठिकाणीं विष्णुदास नामा याला 'कृष्णदास अथवा कृष्णदास नामा' हें नांव लावलेलें आढळतें ही गोष्ट लक्षांत ठेवण्याजोगी आहे. ओव्यांत साडेतीन चरणी व चार चरणीं ओव्यांचें मिश्रण दिसतें.

चक्रव्यूहकथेचें हस्तलिखित फार अशुद्ध आहे. तृतीय वचनीं 'भीमें' ऐवजी 'भीम' 'राखतील' ऐवजी 'राखतीले' असें त्यांत आढळतें. कित्येक ठिकाणीं विनाकारण रफार आहे तर अनेक ठिकाणीं हवा तेथें तो नाहीं. 'न' ऐवजी 'ण' फारच आहे. छापतांना औंध प्रतीचा उपयोग करून जरूर त्या दुरुस्त्या केल्या. 'ण' ऐवजी 'न' व असे ईतर प्रयोग बदलले नाहींत.

विष्णुदास नाम्याच्या भारतावर डॉ. वसंत पारखे यानी थोडेंसें संशोधन केलें आहे. अजून पुष्कळ संशोधन झाले पाहिजे. त्याच्या महानुभावीय प्रतींची दुसऱ्या प्रतीशी तुलना करावी लागेल. अठरा पर्वांच्या निरनिराळ्या प्रती गोळा करून त्याचें संशोधन करणें हें मोठें काम सध्या तरी तें कोणी हातांत घेईलसे दिसत नाहीं. असें संशोधन पुढें करतांना द्रोणपर्वासंबंधीं चक्रव्यूहकथेचा नक्की उपयोग होईल. याहष्टीनें हें काव्य प्रकाशित करण्याचें ठरविलें.

# चक्रव्यूह कथा

......क वाहे: तया वेगळा प्राण माझा न राहे ।। १६ ।। करा रे करा भक्ती श्रीकृष्णकृपानीधीची : अनंत प्रभा कोटबिंब जयाची : करी कोण संखा तयाच्या रुपाची : अनंत लीळा स्वयं माधवाची ।। १७ ।। कृपासींधु तो पैं कृपाळु जीवाचा : जगीं पुर्ण ठसा जयाच्या रुपाचा : तया सारीखा आणीक सखा कैचा । स्मरा रे स्मरा नाथ तो द्वारकेचा : ।। १८ ।। ऐसे नमन केले देवाचे : आता अख्यान आइका चक्रवीहुचें : युध्द जालें आभीमन्याचे : ते आइका ।। १९ ।। आता नमिन श्रीकृष्णनाथ : जो नवाना (वानावा) अनाथाचा नाथ : तो नमिला सर्थ : श्रीकृष्णदेव : ।। १ ।। आता नमो कृस्ण-शक्ती : जे कृस्णाची आंगकांती : ते नमू माया वेक्ती : प : कृपावंस ।। २ ।। तीसरे नमन श्री गुरुनाथा : चरणावरी ठेवीला माथा : त्याही सांगीतली कथा : भारथी देखा : ।। ३ ।। अठरा ब्रह्महत्याचें दुख : जन्मोजयाचें गेलें देख : ते कथा तु आइक : जन्मोजया : ।।४।। ऐसी पुन्य पावन कथा : चक्रवीहु सांगेन आता : जन्मोजया परिसतां : ते सांगे विस्णुदास पंडीतें : ।। ५ ।। भीस्मपर्वाभितरी : भीस्म पडला सरपंजरी : दुर्योधना दुख भारी : द्रोणाचार्याते म्हणत असे : ।। ६ ।। त्याचा सारथी श्रीहरी : भीस्म पडला सरपंजरी : ऐसें कौसाल करी : तो राखिल पांडवाते । ७ ।। असे बोलोन : मग संबोखिला दुर्योधन : ऐसे बोले द्रोण : तयांसि देखा ।। ८ ।। थाउपरी दुर्योधन : मग बोलिला कर्ण : सुबळ अणी दुस्वासैन : हे हाकारीले ।। ९ ।। म्हणे आम्हासी जयाचा भरवसा : तयासी जाली अर्सी दसा : हा विचार करावा कैसा : [ण :] रणवदु आतां कवणासी बांधीजे : ।। १० ।। मोडला आमचा आधारु : आता कवण असे वीचारु : आम्हासी दे नाभीकारु : तो वीचार सांगीजे : ।। ११ ।। तयावरि बोले कर्ण । असे भारध्वजाचा नंदन : त्यासी प्रसन्न करुन : रनवटु बांधजि : ।। १२ ।। वाचा देतो स्राप भारी : मुखी वेद त्याच्ही : तो जरि अंगीकारकरी : आणील हारी पांडवासी ।। १३ ।। हे मानलें समस्तासी : मग आले द्रोणापासी : गांधारु लागला चरणासी : म्हणे आम्हासी राखावें : ।। १४ ।। मग द्रोण जाला बोलता : आम्हासी राखावें ना सर्वथा : पुडती पुडती ठेवी माथा : चरणावरी ।। १५ ।। ह्मणौनी लोळे

चरणावरी : कृपा भाकी नानापरी : मग ते अवस्वरी : द्रोणासी कर्ण बोलिला ।। १६ ।। कायां मागतां आह्मासी : तयाचा अनुवाद न करीसी : दुर्योधन म्हणे परीऐसी : तुम्ही पांडवाते जींतावें : ।। १७ ।। तेव्हेळी म्हणे द्रोणगुरू : त्यासी सारथी सारंगधरु : भीस्मासारीखा वीरु : तोही रणासी आणीला ।। १८ ।। तरी हा माझा नीर्धारु : जीत धरीन योधीस्टीरु : त्याचा सांगणें वीचारु : पुनरपी वनवास चवदा व(र्षे) पाठवीन : ।।१९।। ऐसे भाकेसी कोंडावें : मग धर्माते सोडावें : पार्थासी वेगळे न्यावें : परीएसी वर्म येक : ।। २० ।। सैन्ये दो ठाई करावें : पार्थासी येकीकडे न्यावें : मग न्या धर्मासी धरावें : सत्ये जाणा : ।। २१ ।। ऐसा केला वीचारू : टाकीला आपुला दळभारु : तव तेथे होता हेरू : पांडवाचा : ।। २२ ।। हेर आले धर्मापासी : तेहि सांगीतले श्रीकृस्णासी : द्रोणे बुद्धी केली ऐसी : जे धर्मासी धरावें ।। २३ ।। ऐसें मत वीचारीलें : ते तुमते सांगितलें : आता धर्मा धरतीलें : जीतची जाणा ।। २४ ।। आर्जुनासी वेगळ नेती : द्रोणासमोर नही रहाती : आजीची कर्मुनी राती : मग भलते बिचारा : ।। २५ ।। मग मेलीकारासी गेलें : थोर चींताग्रस्त जाले : ते वेळी भीम बोलीले : आर्जुनासी : ।। २६ ।। मग म्हणे वरकोदरु : काही चींता नका करूं : रणामाजी द्रोणगुरु : मानवीन मी : ।। २७ ।। ऐसें भीम बोलीला : तवं रात्रीचा अंत पुरीला : तवं उदयो जाला : दीनकरासी : ।। २८ ।। मग द्रोणे काये केलें : विधि कर्माते सारीले : मग दान दीधले द्विजासी : ।। २९ ।। सकळ सैन्ये पालाणौनी : घाव णीस्याना देउणी : दनानीली मेदनी : सींहीनादाने : ।। ३० ।। तेथें पांडवाचे मेलीकारी : नीत्ये कर्म सारले वीरी : मग पुजीला श्रीमुरहारी : पंडुकुमरीं : ।। ३१ ।। तेव्हेली पांडव पालानती : नीस्याणी तुरंद्र वाजती : नेणे भुर्मा आसे कांपती : सींहीनादे देखा : ।। ३२ ।। दोन्ही सैन्ये जाली उनमंते : वेगळे न्यावं पार्थातें : मग मी धर्मातें : धरीन मी सत्ये : ।। ३३ ।। मग दुर्योधन म्हणे विरातें : वेगळे न्यावे पार्थाते : मग धर्माते धरीन जीतें : द्रोणचार्या ।। ३४ ।। वीडा घेतला करी : गांधार विराते पाचारी : तवं टळुटाळक विरी : हात पसरीला : ।। ३५ ।। तो म्हणे दुर्योधनासी : आजी युध्यें करीन अर्जुनासी ।। जेणे जिंतिलें त्रीभुवनासी : आजि आम्हासी संग्राम : ।। ३६ ।। आह्मी जिंको त्या पार्थातें : तयाचा पुरविन अंत : परी जवळि असती श्रीकृस्णनाथ : त्यासि जिणता कवण असे : ।। ३७ ।। त्यासी करीन संग्राम : मानविन मेघस्याम : आजि नीवडिल भ्रम : आह्मा आनि पार्थाचा : ।। ३८ ।। ऐसी बोलोनि नीगुती : भाट अर्जुना पाठविती : मग बंदिजन सांगती : ते आईका

सकळीक : ॥ ३९ ॥ ऐसे म्हणावे अर्जुनासी : तुम्हि जितिलें त्रीभुव-
नासी : आजि संग्राम आम्हासी : करावा तुवां : ॥ ४० ॥ आणिक
म्हणु येईल ते म्हणावे : परि त्यासी संग्रामासी आणावें : तेथें असतील
द्वारकेरावे : त्याचे पवाडे पढावे : ॥ ४१ ॥ मग अर्जुनाचे पवाडे :
पढिनले नीवाडे : तुम्ही जितले वीर गाढें ॥ म्हणौनि टहुटाळकी
बोलीविलें : ॥ ४२ ॥ ऐसें बोलेती स्तुतिकारि : जी बीजे करावे
झडकरी : आतां टहुटाळकासी जुझारी : घ्यावी तुम्ही ॥ ४३ ॥ पार्थ
म्हणे श्रीकृस्णासी : आजि द्रोणें बुधी केली कैसी : आपण जाउ युध्यासी :
तरि धर्मासी धरतिल : ॥ ४४ ॥ आम्हि संग्रामासी न जाणे :
तरि सोमवंसासि ऐईलें उणे : धर्मासी राखावें कवणे : ते विचारा पा
तुम्ही : ॥ ४५ ॥ मग बोले देव : सैन्य अवघे ठेबावे : भीमाने धर्मासी
राखावें : तुम्ही जिताव टहुटाळकासी : ॥ ४६ ॥ मग बोलाविले भीम
सेनासि : आणि सकळा रायासी : श्रीकृष्ण ह्मणति तयांसी : तुम्ही राखावे
धर्मातें : ॥ ४७ ॥ ऐसे बोलोनी श्रीकृष्णनाथ : रथी बैसविला वीर पार्थ :
मग म्हणतील समस्तात : तुम्हीं राखावें धर्मासी ॥ ४७ ॥ ऐसे बोलोनी
श्रीकृस्णनाथ : रथी बैसविला वीर पार्थ : मग म्हणतीलें समस्तात :
तुम्ही राखावे धर्मासी ॥ ४८ ॥ ऐसें सांगोनि नीघाले : मग दुर्योधने
काये केलें : चक्रवीहुतें रचीलें : मग आले रणभुमीसी : ॥ ४९ ॥ द्रोण म्हणे
दुर्योधना : न देखो पांडवाच्या सैन्यां : झडकरी बोलावा भीमसेना : संग्रामासी
॥ ५० ॥ तेथें पाठवीलें बंदिजनातें : तें म्हणती पांडवातें : तुम्हीं वधीलें
गंगानंदनातें : तो सुड मागती आपुला ॥ ५१ ॥ आजी द्रोणासी रणवट : तो
धनुर्धर नीट : संग्रामासी सुभट : आरीट रायासी : ॥ ५२ ॥ऐसें आइकोनी
बोलण : मग चालिला भीमसेन : धर्मासी मध्यें घालुन : आला
रणभुमिसि ॥ ५३ ॥ भीमसेनें अवलोकिलें : तव चक्रवीहुतें रचिलें :
मग गुरुते नमिलें : करी घेतली गदा : ॥ ५४ ॥ मग म्हणें
गुरुसी : वेगळें नेलें पार्थासी : चक्रवीहुतें रचसी : आम्हा बंदिजन
पाठवीला ॥ ५५ ॥ ऐसें केलें कैवाडें : आमचा केला नीवाडें : म्हणता
घेईन सुडें : आजि भीस्माचा : ॥ ५५ ॥ जयाची उणि आंगवण : तो
गै.नि रचि विंदान : मग कोपला द्रोण : संध्यान करी : ॥ ५७ ॥ ते
द्रोपदे देखिले मग वरच्यावन्हि तोडिले : तवं आणिक बाण घातलें :
तेहि तोडिले तें जाणा : ॥ ५८ ॥ द्रोण संधान करी : द्रोपद तोडि
वरच्यावरी : बाणाचिया कोडिसरी : दुखंड केलिया : ॥ ५९ ॥ येकमे-
कातें पाचारीती : येरयेरातें दाटिति : सींहिनाद गर्जताती : दोघेजण : ॥६०॥
दोघांचा फरसराम गुरु : दोघा संग्राम जाला थोरु : सैल्य कौरवविरु : तेही भीम

पाचारिला : ॥ ६१ ॥ तो येकला भीमसेन : त्यावरि उठावले कौरवसैन्य : ते वेळीं तो भीमसेन : संग्रामामाजि न दिसे ॥ ६२ ॥ तेथें जाला हाहाकारू : न दिसे वर कोदरू : वरसती लोहाचा पुरू : तेनें भीम घायेवटला . ॥ ६३ ॥ वैराट आणि कोंतीभोजु : आणि विरराज भोजु : महादेव पंडुआत्मजु : ऐसे विर उठावले ॥ ६४ ॥ करावया भीमाची सोडवण : उठावले चौघेजण : मग द्रोण आपण : काणें करीता जाला ॥ ६५ ॥ तेन्हेली बाण सातें : हाणितले द्रोपदातें : त्यान्ही चहु वाजीयातें : येक सारथिया भेदला : ॥ ६६ ॥ दोन लागले द्रोपदासी : तेनें मुर्छेना आली तयासी : राहणें नव्हे सारथियासी : धर्मापासि कोन्ही नाही : ॥ ६७ ॥ मग धावीनला द्रोणगुरू : तेणे धरिला यौधेष्टिरु : जवळी होता परीवारु : तयासि पळ सुटला : ॥६८॥ द्रोण म्हणे जइद्रथासी : तुम्ही धर्म न्यावा दुर्योधनापासी : भीम वेढिला चौघासी : तयासि धरीन . ॥ ६९ ॥ ते वेळी द्रोणगुरू : तवं धाविनला वेगउत्तरू : तवं तेणें टाकिला रहिवरु : तव तो वीर माहाबळी : ॥ ७० ॥ माहामारी पेटला : सैन्या पळ सुटला : मग द्रोण पावला : तयावरी न वचे . ॥ ७१ ॥ पांडवदळि हाहाकार जाला : म्हणति धर्म धरुनी नेला : हें आईकोनी भीम परतला : धाविनला वेगत्तउत्तर : ॥७२॥ वेगि जईद्रथ टाकीला : राहें राहें म्हणें तयाला : तव तो धर्म टाकुन पळाला : तयावेळीं . ॥ ७३ ॥ तवं तेणें वेगेंसी मग तो आला धर्मापासी : रथि घालौन तयासी : मग निघे भीमसेन ॥ ७४ ॥ भिम धर्मासि घेउन आला : तव द्रोपद सावध जाला : आवघा दळभार मिळाला : वैराट साहादेव : ॥ ७५ ॥ आला कोंतीभोजु : वीरराजा भोज-आत्मजु ॥ तें वेळी पंडुचा आत्मजु : काय बोलें : ॥ ७६ ॥ धर्म धरुनि नेला होता : बोल बैसला होतां माथां : तरि मुख कैसा दाविता : कृस्णा आर्जुनासी : ॥ ७७ ॥ वैराट आणि द्रोपदु : हा चुकला आमचा सदु : भीमा तुज सारीखा बंधु : म्हणौनि धर्म आळंगीला : ॥ ७८ ॥ ऐसे येकमेका बोलेती : तव द्रोण काये केली युक्ती : भाट पाठविला पांडवाप्रती : भीमसेनासी : ॥ ७९ ॥ मग ते आले त्वरित : पवाडे भीमाचे पढत: म्हणती एस आले तुमते : धर्म सोडवीला : ॥ ८० ॥ द्रोणे चक्रवीहुते रचिले : तुमते आसे बोलावीलें ॥ न याल तरि उणे एईले : सोमवंसासी : ॥ ॥ ८१ ॥ ऐसा बोल आईकोनी : नीस्याना घाव देउनी ॥ आले रणभुमि टाकोनी : मग द्रोण पाचारिला : ॥ ८२ ॥ तुम्ही जे बी-चारीले : ते न चले काही केले : आता बोलाविले : काये काय : ॥ ८३ ॥ यावरी बोले द्रोण : पण केला तो साचे करीन : धर्म जीताचि धरीन : हा नीर्धार जाणावा ॥ ८४ ॥ यावरि बोले वरकोदर : तुम्ही पण केला तो

साचार : परि जइद्रथ वीर : सांडुनी पळाला : ॥ ८५ ॥ तरि आता मागुते : कैसे धराल धर्मातें : तो तुम्हा मानी गुरुत्वातें : युध्यची हे नव्हे तुमचें : ॥ ८६ ॥ ऐसे भीम बोलीला : तवं द्रोण कोपला : मग बाणि हाणीतला : भीमसेन तो ॥ ८७ ॥ ते बाण तोडिले वरच्यावरी : आणीक संधान करी : तेहि बाण भुमीवरी : पाडी भीमसेन : ॥ ८८ ॥ आणीक द्रोण संधान करी भीम तोडी वरच्यावरी : मग द्रोण तीये अवसरी : घाली सरुजाळ :॥८९॥ न सावरत सरजाळे बाणी भरले अंतराळ . तेव्हेळी खोचले दळ : पांडवाचें : ॥ ९० ॥ तेव्हेळीं भीमसेन . रथातळी उतरून : धाविनला वेग करुन : गदा घेउनीया : ॥ ९१ ॥ द्रोणे बाण गुणी लावीला : भीम न सावरेची आला गदाघावो उभारीला : तवं द्रोण रथ सांडुन पळाला :॥९२॥ सारथि आनि वारु : त्यांचा केला संव्हारु : त्यात म्हणे वरकोदरु : रथ सांडोनि पळालासी : ॥ ९३ ॥ आता कोठे रे जासी : पुढें धाविनला वेगेंसी : हाणीतले द्रोणासी : थोर कोपें पै : ॥ ९४ ॥ ते वेळी तो द्रोणगुरु : तोहि सांडिला रहीवरु : ऐसा धाक थोरु : भीमसेनाचा : ॥ ९५ ॥ तोही रथ चुर्ण केला : मग हाहाकार वर्तला : सींहीनाद गर्जिनला : भीम-सेन तो : ॥ ९६ ॥ आस्वस्तामा कर्णवीरु . समस्ता वेढिला वरकोदरु : संग्राम जाला थोरु : तीये वेळी ॥ ९७ ॥ तेव्हेळी पंडुसुतें : देखता जाला दळाते : मग सांडोन द्रोणाते : त्यावरी धाविनला : ॥ ९८ ॥ रथाने रथ हाणतु . वारुवावरि वारु टाकीतु : गजाने गज झुगारीतु : माहाबळी तो : ॥ ९९ ॥ कौरववीर समस्ते : शस्त्रेंधारी वरुसतें : सर्वांआंगी भीमाते खोचतें : परि न मानितो ॥ १०० ॥ ऐसे दळ मारीतु : सींहीनाद आसे गर्जतु . तेथें आला द्रोणसुतु : आणी कर्ण दुश्वासैन : ॥ १ ॥ भीम आला पवनगती . शस्त्रें आमित हाणीती : दुस्वासेन गदाघाती . हाणितला . ॥२॥ त्याऱ्ही वारु आणि सारथी . सतचुर्ण जाले क्षीतीं : गदा लल्हाटी वाजली अवचीती : लागलि देखा ॥ ३ ॥ तो जाला मुर्छागत : भुमंडळि असे लोळत : आला वीरनाथ तेथ : तेणें घातला रथि : ॥ ४ ॥ तो तयासी घेउनि गेला वेगें तवं भीम आला पाठींलागें आश्वस्थामा आला वेगें : तेणें भीम पाचारीला : ॥ ५ ॥ तो म्हणे वरको-दरा : कां धांवसी सैरावैरा : गदा भंवडि तो गरगरा . पळत-यावरी : ॥ ६ ॥ अस्वतामया उजु आला । तो द्रोणाने देखिला मग तो वरसता जाला : सरधारी : ॥ ७ ॥ चक्रवीहुचा माहामारी : हाणीतीला बहुता वीरी : भीम प्रवर्तला माहामारी : कौरवसैन्यासी : ॥ ८ ॥ बळिवंतें वीर होते : तेहि वेढिलें भीमाते : द्रोणें हाणितलें शस्त्रेंघातें कैसे तेथें वर्तलें : ॥ ९ ॥ भीम येकला ते बहुतें : तेंथें वर्तला नीघातें : सैन्ये पाडीले

बहुतें : माहापुर असुधाचें : ।। १० ।। ऐसी जाली केसधरणी : आसुध वाहे रणी : दळ मारीले येकक्षेवणी : माहावीरें ते ।। ११ ।। ऐसें रणकंदन जाले कौरवदळ आटले : मग द्रोणे काये केले : ते सांग वीरणुदास नामया ।। १२ ।। चक्रवीहुकथा : ते आईकावी श्रुतां : आभीमन्या वीडा घेता : कैसे वर्तलें : ।। ते सांगेल व्यासमुतें : प्रसंग पहीला ।। १ ।। ।। छ ।।

श्री परेशाये णमा : श्रीकृष्णायेंन्मा :

द्रोणे केलें नीर्वाण : धगधगीत काडिले दोन वाण : घ्यावया प्राण भीमसेनाचा : ।। १३ ।। ते देखिलें पंडुसुतें : मग धावीनला वेग करून बहुतें हाणीतला गदाघाते : द्रोणाचार्या तो : ।। १४ ।। ते देखोनी द्रोण गुरु : भीमें उचलिला करू : तवं सांडोनि रहिवरु : द्रोण गेला ।। १६ ।। घोडे आणी सारथी : चुर्ण केले हो क्षीती : तव कौरवि बहुती : हाणीतला भीमसेन ।। १७ ।। द्रोण हाणी बाण त्याचे : तव सैल्ये हाणीतीला गदाघातें : शस्त्रें वर्सती बहुतें : तीये वेळी : ।।१८।। कर्ण आणि आस्वस्थामा : हे हाणते जाले भीमा ।। भीमाने हाणितीला सुसर्मा : तो धरणीवरी पाडिला : ।। १९ ।। मग भीमे हाणीतीला तीयेवेळी : कौरव मीळोनी सकळी : मुर्छना आलि तियेवेळी : तवं विरराज पात्र पा : ।। २० ।। ते धर्मनकुळें देखिलें : तव साहादेवे म्हणतीलें : कौरवि भीमाते वेढिलें : तुम्ही काये पाहाता ।। २१ ।। द्रोपद म्हणे तयासी । कैसें जावें सोडवयासी : कोन्हीही नाहीं तुम्हापासी : द्रोण धरील तुमतें :।। २२ ।। ऐसा करीती वीचारू : तव उठीला वरकोदरु : पुडिलाचा केला संव्हारु : येता जाला : ।। २३ ।। आपुलीया सैन्यात आला : बहुत सर्वांगी खोचला : नावेक मुर्छागत जाला : मग टेकला ध्वजस्थांबासी : ।। २४ ।। तेवेळी धर्म आला जवळी : बोलता जाला तये वेळी : कौरवी केली येकवळी : हा स्रमला मज राखता : ।। २५ ।। द्रोपद वैराट आला :( तव भींमु सावध जाला ): म्हणती चक्रवीहुते रचिला : मग बोलीला कौंतिभोजु : ।। २६ ।। दुस्टदुन्माचेनि हातें : मृत्य आसे द्रोणातें द्रोपदें केलें यज्ञाते : जन्म तेथें जाला : ।। २७ ।। तयांसी पुढा करू : चाला तयासी मात्र : आसां करीती वीचारू : तव बंदिजन आला : ।। २८ ।। तेही केला ब्रह्मावो : धर्मा तु सोमवंसीचा रावो : आसुराचा फेडिला ठावो : भीमआर्जुनाने । ।। २९ ।। आजि भीमें बरवें केले : कैरवदळ संव्हारीलें : गुरूसी मानवीलें पळविला आस्वस्थामा : ।। ३० ।। गुरू थोर मानवला : आतां तुम्हासी बोलावीले चला : सकळ कौरवभार कोपला : द्रोण भिडेल येकला तुम्हासी ।। ३१ ।। तया

येकलेयावरी तुम्ही बहुती : तुम्ही संग्राम केला अती : सेवटी तेणें केली ख्याती : माग्लि सैन्ये : ।। ३२ ।। ऐसें बंदीजनी सांगीतेलें : भीम म्हणे ठाकुर आलें : द्रोणे बोलाविले : तरि येउ आता : ।। ३३ ।। मग धर्मासी पुसिले : तेणे भीमातें म्हणीतीलें : तेही चक्रवीहुते रचीनले : तुज भेदवैल कैसा : ।। ३४ ।। द्रोपद म्हणे धर्माते : जरि रिगुनीघु जाणेल त्यातें : नाहि तरी लज्जे करुनी प्राणाते : हा कवण पुर्शार्थ : ।। ३५ ।। पाहाता गंगानंदन : साच केला पण : दीधला प्राण : साभीमान : ।। ३६ ।। तयासी कराल उण : परि संव्हार करीन : शाहाकारी नारायेण : दैत्ये कैसेन वधीले : ।।३७।। ते म्हणती भीमसेना : तुम्हा चक्रवीहु भेदवेना : जाउ म्हणता संग्रामा रणा : प्राण द्यावया : ।। ३८ ।। ऐसा वीचार करीती : तवं बंदीजन येती : ते पवाडे पढती : पांडवाचे ।। ३९ ।। ते म्हणती भीमासी : जरी न याल सांग्रामासी : हारी आली तुम्हासी : द्या आम्हा अज्ञा : ।। ४० ।। मग भीमें म्हणीतीलें : कैसे शाकडें मांडिलें : आम्हासी कैवाड मांडले : बहुतापरी : ।। ४१ ।। ऐसे आईकोनि बोलणें : मग म्हणें आभीमन्ये : संग्रामि जिंतिणे : भेदीन चक्रवीहु : ।। ४२ ।। आता काई बोलु बहुतें : मी भेदीन चक्रवीहुतें : उठिला वीकटबाहो त्वरिते : आला धर्मापासी : ।। ४३ ।। चक्रवीहु भेदीन आतां : मग जाला वीनवीता : आईका जी तातां : मज भेदता वेळ न लगे : ।।४४।। ऐसे अभीमन्या बोले : तयासी धर्मे म्हणितीले : तु बाळ धाकुले : चक्रवीहु न भेदवे ।। ४५ ।। चक्रवीहु म्हणसी भेदु : तुज नव्हे धनुरयुध्यु : बाळा सांडी संदु छेदु : लागैल बोल पार्थाचा ।। ४४ ।। तो ह्मणें जि धर्मराजा : तुम्ही नेणा पराक्रम माझा : मी बोलतो पैजा : मार्ग जाणे चक्रवीहुचा ।। ४७ ।। ऐसे आभीमन्या बोलीला । मग धर्म आळंगीला : बहुतापरी सीकवीला : परी ना आईके तो : ।। ४८ ।। यावरि म्हणे वरकोदरु : तु धाकुटे लेकरु : वाळला नाहीं जारु : मस्तकीचा ।।४७।। तरि आईक पार्थसुता : आम्हि जवळ असतां : तुज संग्रामा पाठवीता : हासैल अर्जुन ।। ५० ।। तु धाकुटे बाळ : तुझें पारखिलें नाही बळ : म्हणसी संव्हारीन दळ : कौरवाचें ।। ५१ ।। ऐसें बहुत सीकवीलें : परि ना आईक म्हणतीले : परि तु धाकुट मुले : नव्हेसी स्याहाणा ।। ५२ ।। अभीमन्या ह्मणें मी तुमचा कुमरु : परि सासाअर्जुनाचा अवतारु : आहो मी जाणे मार्गु : चक्रवीहुचा ।। ५३ ।। तुम्ही आईका एक वेवस्ता : मी सुभद्रेचा उदरी होता : तीसी जाली थोर वेथा मग स्मरीला श्रीकृष्णनाथ ।। ५४ ।। तो त्वरीत पावला : सुभद्रेसी पुसता जाला : ते म्हने संग्रामाचा डोहोळा जाला : पुरवी स्वामी ।।५५।। ती चक्रवीहुची कथा : जाला सुभद्रेसी सांगता तीची गाहिली वेथां : मातेसी नीद्रा आलीं ।। ५६ ।। श्रीकृस्ण जाला

सांगतां : आणि मि जालो होकारा देतां : जाणवले द्वारकेनाथा : पुढिले कथा न सांगे तीची तो ॥ ५७ ॥ तो जाणवे पाहे : तव मी होकारा देत आहे : मग वीस्मीत होये : श्रीकृष्णनाथु : ॥ ५८ ॥ मनी वीचारी द्वारकेराजा : तव गर्भी देखिल्या सहस्त्रभुजा : म्हणे हा होय सासाअर्जुन राजा : त्याच्या भुजा छेदीन मी ॥५९॥ ते व्हेळी उपाय करी : सुद्रसेन घाली उदरी भुजा छेदी मुरारी : राखी हारी दोण भुजा ॥ ६० ॥ मग सुभद्रा जागी होउन : हे पाहा पा भुजाची वळखण : मज सासाआर्जुनाची आंगवण : त्रीलोक्ये जिंतेन मी ॥ ६१ ॥ तरी चक्रवीहु भेदीता : मज नलगे घडि आतां ॥ ऐसा जाला बोलेता : समस्तासी ॥ ६२ ॥ मग सकळ म्हणती : हे आली आम्हा प्रचीती : परी येक वीनंती : परि कोपती श्रीकृस्णनाथु ॥ ६३ ॥ अभीमन्या म्हणें तयासी : आम्ही जन्मलो सोमवंसी : हारी पतकरु कैसी : पुर्वजासी येईल उणे ॥ ६४ ॥ जळो जळो हे जीणे : क्षत्र धर्मासि येइल उणे पा पस्येनीक मरणें : तेचि बरवे : ॥ ६५ ॥ पुत्र कुळी जन्म जाला : माता पित्याने उछावो केला : म्हणती हा होईल भला : उधरील वंसातें ॥ ६६ ॥ अहो जन्मावे पुत्रपणें : आपेक्षा त्याचि पुरवणें : जळो जळो ऐसें जीणे : त्या पुत्राचे पै : ॥ ६७ ॥ मातापीत्याकारणें : नीक्षत्रि केली मेदिने : त्याची पढती पुराणे : तिही लोकी ॥ ६८ ॥ देवो तेतीस कोडी : पडिले होते बांदोडी : सर्व राक्षेस मारीले लक्षे क्रोडी : रामचंद्रें ॥ ७० ॥ माते पीतया पतनाकारणें : देव जिंतुनि अमृत आणने : ऐसी पुत्रपणाची पुराणे : पढती लोक ॥ ७१ ॥ धर्म म्हणे अभिमन्यासी: जाये पुसे सुभद्रेसी : आला मातेपासी : पुसावया ॥ ७२ ॥ तीये सीकवील बहुतापरी : तो ना आईके कव्हणेपरी : मातेसी नमस्कार करी : आला सभेसे ॥ ७३ ॥ मग म्हणे धर्मराजा : यासी अज्ञा द्यावी मज आभीमन्या म्हणे प्रताप पाहावा माझा : क्षेत्रें धर्माचा ॥ ७४ ॥ मग भीमसेन नमस्कारीला : नकुळ शाहादेवासी भेटला : मग रणवटु बांधीला आभीमन्यासी : ॥ ७५ ॥ वीप्रासी दान देउन : रथी चढला अभीमन्या : पवाडे पडती बंदीजन आभीमान्याचे ॥ ७६ ॥ सकळ सैन्य पालाणीले : घावो नीस्याणा दिधले : रणतुराचें गर्जर जाले . थोर देखा : ॥ ७७ ॥ पुढें असे अभीमन्य : मधी धर्माते घालुन : मागां आसे भीमसेन : चालीयला : ॥ ७८ ॥ ऐसे रणभुमीसी आले : बंदीजण पुडा गेले : ते द्रोणासी सांगतें जाले : चरीत्र अभीमन्याचें ॥ ७९ ॥ आर्जुनाचा कुमरु : सासाआर्जुनाचा अवतारु : चक्रवीहुचा जाणे मार्गु : म्हणौनि रनवटु बांधिला ॥ ८० ॥ मग म्हणे द्रोणगुरु : ते धाकुटे लेंकरु : चक्रवीहुचा मार्गु : केवी जाणे ॥ ८१ ॥ ऐसा बोले गुरु : तव आला वरकोदरु

पुडा होता कौरवभारु : तेथें संग्राम कैसा जाला ॥ ८२ ॥ मग उतरुनी चरणचारी : गदा घेतली करी : कौरवदळ संव्हारी : सैन्यासी पळ सुटला ॥ ८३ ॥ दारवठा होता गुरु : तेथें राहीला दळभारू : पाठि लागतें आला वरकोदरू : मग द्रोण पाचारीला : ॥ ८४ ॥ राहे राहे रे भीमसेना : म्हणौनि करी संधाना : बाणी व्यापीले गगना : ते देखिले पंडुसुते ॥ ८५ ॥ ॥ छ ॥ मग धनुस घेतलें करी : तोडी बाणाच्या सरी : गुरू वरसे शस्त्रधारी तो सावरी वरकोदरू ॥ ८६ ॥ द्रोणाचार्याचा मारू : तो लोहाचा माहापुरू : तेणें खोचला वरकोदरू : मग रथावरून उतरला ॥ ८७ ॥ मग गदा घेतली करी : धावीनला द्रोणावरी : भवंडुनी हाणावें जरी : तव कृपाचार्या पाचारीला ॥ ८८ ॥ न सावरेचि आला : आमीता बाणी हाणीतीला मुदगल आंगी वाजिनला : वीकर्ण देखः ॥ ८९ ॥ तवं कौरवदळी : वीर होते माहाबळी तेहि हाणीतला सकळी : तो बळि भीमसेन ॥ ९० ॥ मग सोडोनी द्रोणातें : त्यासी हाणि गदाघाते : संव्हारूनी तयातें : कृपाचार्याते हाणें ॥ ९१ ॥ तो रथ चुर्ण केला : कृपाचार्या पळोनि गेला : तव माहाबळी भीम हाणीतिला : मुदगले करूनी ॥ ९२ ॥ सोमदंते माहाबळे : भीम हाणीतीला त्रिसुळे : हुडा आड होत्ति दळे : शस्त्रधारी वरूसती ॥ ९३ ॥ चक्रवीहूचा द्वारी : कर्ण हाणे भारी वीकर्ण धनुशे घेतलें करी : हाणें पाचा बाणी ॥ ९४ ॥ तीयेवेळी जईद्रथे : हाणीतला गदाघाते : तव हाणे वीर चक्रघातें : पंडुसुते हाणीतीला ॥ ९५ ॥ तव आचार्या माहाविरी : हाणीतिला माहाभारी : भीम तयाते मारी तव द्रोण खवळला ॥ ९६ ॥ आचार्या म्हणे चक्रवीहुचा मारू : नेणें हा वरकोदरू उत्तरोनी कोणी मारू : चक्रवीहु भेदवेना : ॥ ९७ ॥ कृपाचार्या कृतवर्मा : हे हाणते जाले भीमसेना : भीम न ढळे स्वधर्मा : तीयेवेळी : ॥ ९८ ॥ तो येकला ते बहुते : शस्त्रें वर्सती आमित्ये : ते आभीमन्या देखते : मग वीनवी धर्मासी ॥ ९९ ॥ मज आज्ञा दीजे धर्मा : मीं सोडवीन भीमा जाईल त्याचा आत्मा मग काइ कराल : ॥ २०० ॥ धर्म म्हणे आभीमन्यासी : तु भीमास सोडविसी : हा नीर्धार असे तुझा मानसी : जरी भेदिसी चक्रवीहुते ॥ २०१ ॥ अभीमन्या म्हणे पाहा क्षातें : चक्रवीहु भेदीन क्षिणातें : भीम सोडवीन दावीन प्रचीतें : कौरवासी : ॥ २०१ ॥ आज्ञा दीधली अभिमन्यासी : तो नीघाला वेगेसी : पुडा कथा वर्तली कैसी : ते सांगे रे विष्णुदासा नामया ॥ २०३ ॥ चक्रविहु आइकती : युध्याची फिटे भ्रांती : सुरनरा फुराण येती : माहावीरासी॥६३॥ ॥ ४ ॥ जन्मेजया प्रस्णे करी : वैसंपायना आवधारी : आभीमन्या वीहुचक्रावरी : कैसा चालीला ॥ ५ ॥ मग बोले वैसंपायन । आता पुडा आईका

चित देउन : कैसे केले नीर्वाण : ते आईक आतां ॥ २०६ ॥ प्रसंग दुसरा २ ॥

श्रीकृस्णारायायन्मा : ॥ अभीमन्या म्हणे द्रोपदासी : तुम्ही राखावे राया धर्मासी : मी सोडवीन भीमासी : भेदीन चक्रवीहु : ॥ १ ॥ मग आला वेगेसी : प्रदक्षणा करी चक्रवीहुंसी : वीर राहीले चहुफासी : हुडाहुडा : ॥ २ ॥ येक आसती आडदुरी : येक आचाट महावीरी : वीहु रचीला आसे माहाकुसरी : मग काये करी अभीमन्या तो : ॥ ३ ॥ दारवठा पुर्वदीसे : तेथें द्रोण गुरु असे : मग गेला दक्षेणे दीसे : तेथे आसे जईद्रथ : ॥ ४ ॥ तेथे असती कुमर : आमीत पायाचे मोगर : भयानक दीसती आसुर : नाही जुझार तयामधी : ॥ ५ ॥ तेथें असे आवघी खेरी : मग आभीमन्या काय करी : उठावला तयावरी : मग संव्हारी दळाते : ॥ ६ ॥ तया विरा पळ सुटला : जईद्रथ चक्राने हाणीतीला : तो मुर्छागत जाला मग आभीमन्या चालीला तयावरी : ॥ ७ ॥ जईद्रथ जवं सावरी तव आभीमन्या रीगे भीतरी : कौरवसैन्ये संव्हारी : मग पाचारी दुःस्वासैनाते : ॥ ८ ॥ मग थोर वरसला बाणी : दुस्वासैन पडीला रणी : वीरा जाली भंगाणी : रणि पडिले असंक्षांत ॥ ९ ॥ वीर हाणती शस्त्रेंघातें : नीवारुनी तयांचे शस्त्रेतें : वरसला सरजाळातें : आभीमन्या तो : ॥ १० ॥ अर्जुनाचा कुमरु : सैन्यासी करी मारु : तेथें जाला हाहाकारु : पळाला वीर सुसर्मा तो ॥ ११ ॥ कृपाचार्या आणि सुसर्मा : आणीक वीर कृतवर्मा : तेही पाचारीले आभीमन्या : सवं सैन्य दोन क्षेवणी ॥ १२ ॥ सकळ हाणीती ऐकोत : तो नीवारी शस्त्रातें : कौरवदळ संव्हारीलें : बाणि आमीत्य वर्सला : ॥ १३ ॥ बाण वरसला खडतर : कोन्ही न राहे समोर : भंगले माहावीर : कौरवांचे : ॥ १४ ॥ आर्जुनाचा बाळ : कौरवसैन्यासी जाला काळ : माहावीरा सुटला पळ : सैन्य उधळलें ॥ १५ ॥ ऐसा जाला हाहाकारु : माहावीराचा केला संहारु : तव पावला द्रोणगुरु : तीये वेळीं ॥ १६ ॥ तेणे अभिमन्या पाचारीला : आमितां बाणी हाणीतीला : ते बाण तोडितां जाला : अभीमन्या तो : ॥ १७ ॥ त्याचे संध्यान तोडुनी : मग द्रोणाते हाणीतीला खडतर बाणी : सारथी घोडे संव्हारीनी : धनुस्य छेदिलें : ॥ १८ ॥ द्रोण वीरथी केला : रथ सांडोनि पळाला : तव वेगेंसी पावला : अस्वस्थामा तो : ॥ १९ ॥ तया अर्जुनाचीया सुता : आश्वस्तामा जाला हाणतां : आभीमन्या जाला तोडिता : संध्यान त्याचें ॥ २० ॥ ते वाण तोडुनी : हाणितला पाचां बाणी : सारथी पाडिला रणी : वारु त्यान्ही : ॥ २१ ॥ मग रथ सोडोनी पळाला : वीरासी पळ सुटला : भीम होता वेढिला : तो मोकला जाला : ॥ २२ ॥ भीमातें सोडविलें : वीर पळोनि गेलें मग दोघें मीळाले : आले आपुलीया सैन्याते ॥ २३ ॥ तो

अभीमन्या वीरूं : म्हणौ नये लेकरू : मग म्हणे गुरू : हा हो रे सासार्जुन : ।। २४ ।। चक्रवींहु भेदुनी केली वीरा भंगणी वीर पाडिलें येक क्षेवणी : तिये वेळीं देखा ।। २५ ।। न नागवे हा सुभद्रु : सैन्यासी भंवंडिला आद्रु : महाबळि होया सुभद्रु पार्थकुमरू हा ।। २६ ।। प्राराक्रमि दारुण : नाही सासाअर्जुना वाचून : दळभार मोडोण : चक्रवीहु भेदीला ।। २७ ।। द्रोण म्हणे दुर्योधनासी : ऐसा पुत्रि नाही तुमचा वोंसी : जो जिंति पांडवासी : आणि रायां समस्ता ।। २८ ।। ऐसें आइकोनी बोलन : मग म्हणे लक्षिमण : आज्ञा दिजे संग्राम करीन अभीमन्यासी ।। २९ ।। यावरी म्हणे गंधारु : तो सासाआर्जुनाचा आवतारू : महाकाळाचा जुंझारू : जींतीला गुरू क्षणा-माजी : ३० ।। येव्हडा त्याचा प्राक्रमे : त्यासी कैसा करीसी संग्राम : वाया धरीतोसी भ्रम : नीवांत राहे ।। ३१ ।। बोलिला लक्षीमण वीरु : तो अर्जुनाचा कुमरू : मी तुझें लेंकरू : तरि जुंझाचे कवतीक पाहे माझें : ।। ३२ ।। तो आर्जुनाचा कुमरू : दळाचा केला संव्हारू : तयांतें काए लेकरूं : म्हणौ नए : ।। ३३ ।। मी तुझा धाकुटा : जींतीन राया आदटा : रणी साना मोटा : म्हणौ नये ।। ३४ ।। मज ठेवितासी धाकुटेपण : परि नेणा माझी आंगवण : मि जींकेन जाण : आभीमन्यासी : ।। ३५ ।। मग द्रोण म्हणे लक्षिमणा : माहावीराचा राणा : तुमचा प्राक्रम केसणा : जे भीडाल आभीमन्यासी : ।। ३६ ।। गाढे जे आसुर : कोन्ही न राहती तयासमोर : त्याचे बाण जे खडतर : मेरू मंदार कडतरती ।। ३७ ।। यावरि लक्षिमण म्हणे : आम्हा काये उणे : आम्हासी अज्ञा देणे : कवतीक पाहावें : ।। ३८ ।। बहुतापरी सीकविलें : परी तो न आईके म्हणतीलें : दुर्योधनासि पुसीले : मग नीगता जाला : ।। ३९ ।। ते व्हेळी कौरवनाथे : सैन्ये वो दिधले सांगाते : दुस्वासैन सैल्यातें : पाठवीलें ।। ४० ।। राणे रायाचें कुमर : गजरथ आसिवार : तयां सवं आपार : नीगते जाले : ।। ४१ ।। च्यार क्षेवणी रहिवरा : दाहा सहस्रे कुंजरा : ऐरा दळभारा : गणित नाही ।। ४२ ।। आणीक नामनीकें विर : ऐसे दीधले अपार : ऐकवटुनी समोर : चालीयेले : ।। ४३ ।। मग द्रोणे काऐ केले : तया चक्रवीहुते रचिले : आभीमन्याते वेढिले : कोटी गुणा : ।। ४४ ।। तो पार्थनंदन : हाणितीला पाचारून : तो न भंगे अभिमन्य : तया वेळी ।। ४५ ।। सैल्या आणि द्रोण : तीसरा दुस्वासैन : हाणितीला पाचारून : अभीमन्या तो ।। ४६ ।। सैन्य(नाय)क वीर बहुते : ते शस्त्रे वरूसतें : सींहिनाद गर्जतें : वाजती रणतुरे : ।। ४७ ।। हाका देती वीक्राळी : न्याहा उठती अंत्राळी : अभीमन्या ते वेळीं : काये करीता जाला : ।। ४८ ।। संध्यान करी तातडी : त्याची तो शस्त्रे तोडी : बाण वर्सला लक्षे कोडी : रणि पाडिले माहावीर ।। ४९ ।। अभीमन्याचे सर : ते

दारूण खडतर : राये भेदिले माहावीर : ते वेळी देखा : ॥ ५० ॥ दळ भंगले देखुन : काये करी दुस्वासैन : मग गदा घेउन : धांविनला ॥ ५१ ॥ ते व्हेळी पार्थसुतें : देखीले दुस्वासैनातें : बाणि हाणीतले तयातें : तो मुर्छेनातें पावला ॥ ५२ ॥ आणीक संधान करी : तव सैल्या पावला झडकरी : बाणी हाणीतला तीखारी : न लोटे माहाबळी तो : ॥ ५३ ॥ सरधारी वरसला : वीरा बहुता हाणीतला : तो वरंच्यावरि तोडिता जाला : आभीमन्या देखा : ॥ ५४ ॥ ते वेळी पार्थसुतें : हाणीतलें अस्वस्थामयांतें : तो जाला मुर्छागतें : तवं पावला सैल्य ॥ ५५ ॥ आस्वस्थामा घातला रथी : सैन्ये सैल्या नीगे पवनगती : कौरवसैन्ये पळती : दाही दीसा : ॥ ५६ ॥ तवं पावला लक्षीमण वीर : सर्व कुंजराचा भार : राहे राहे वीरा स्थीर : ऐसा धीर देत असे : ॥ ५७ ॥ लक्षिमण म्हणे अभीमन्यातें : तुवा सैन्ये मारीलें बहुतें : आता साहे मातें : मग आमित्य बानि वरूसला ॥ ५८ ॥ लक्षीमन्य संधान करी : आभीमन्य तोडी वरिच्यावरी : ऐसा संग्राम जाला भारी : त्या राजकुमरासी ॥ ५९ ॥ मग त्या लक्षीमणासांगाते : रायाचे कुमर होते : तेही हाणते जाले तेथे : अभीमन्यासी ॥ ६० ॥ ते व्हेळी पार्थसुत : सांडोनीया रथ : लक्षीमना पाचारीत : गदा घेतली करी : ॥ ६१ ॥ न सावरेचि आला : लक्षिमण हाणीतीला : घाव सत्राणे लागला : तो पडिला रनभुमीसी : ॥ ६२ ॥ ऐसा जाला कोल्हाळ : राजकुमरा सुटला पळ : आभीमन्या क्षत्रियाचा काळ : संव्हारी कुमराते : ॥ ६३ ॥ मारोनि रायाचे राजकुमरांतें : मारीले आपार तेथें : मग संव्हारी कुंजरातें : वीर पळती कौरवांचे : ॥ ६४ ॥ लक्षीमण रणासी आणिला : थोर हाहाकार जाला : सैल्या आस्वस्थामा पळता देखिला : दुर्योधनाने : ॥ ६५ ॥ मग म्हणे गांधारू : एता न देखु राजकुमरु : पळत होता दळभारु : तेही सांगीतलें : ॥ ६६ ॥ राजकुमर पडिला रणी : ऐसें आईकीलं कानी : मग घातली लोळणी : रथाखाली : ॥ ६६ ॥ ऐसा दुखिस्त जाला : तेथे कर्न द्रोण आला : तेही दुर्योधन संबोखीला : मग काए बोले द्रोण : ॥ ६८ ॥ आम्ही बहुत सीकवीले : (तो नाइके म्हणितिले :) त्याचे नीमित्ये पुरलें : का पाठवीला तुम्ही ॥ ६९ ॥ तो नव्हे धाकुटे लेकरु : सासाअर्जुनाचा अवतारु : जाणे चक्रवीहुचां मार्गु : तो विर आनीवार : ॥ ७० ॥ जळो आमचें जीणें : अवघें जीतिलें तेणें : कुमर गेला प्राणे : सुडें घेईन तयाचा ॥ ७१ ॥ क्षेत्रियांमाजि पंचानन : न वचे रणभुमिवाचुन : आता अवघे मिळोन : सुड घ्यावा लक्षिमणाचा : ॥ ७२ ॥ मग चक्रवीहु रचीला : वीरासि म्हणता जाला : पाव मागुता घाला : सरिरी प्राण आहे तवं ॥ ७३ ॥ वीर सकळ म्हणती : प्राण जातिल तरी जाती : पावो न

चालावा मागुता : करु ख्याती आवघे मिळोनी : ॥ ७४ ॥ ऐस्या बोलती पैजा : भार चालीले बोजा : वेढिले पार्थी आत्मजा : कोटी गुणा : ॥ ७५ ॥ थोर कोपे उठावले : सरधारी वरुसले : मग आभीमन्ये काए केलें ते आईक राया तु : ॥ ७६ ॥ ऐक बाण काहाडी : तेही होती लक्ष क्रोडी : येव्हडी मंत्राची प्रौढी : वीर पडले धरणीवरी ॥ ७७ ॥ ऐसे युध्य थोर जाले : मग द्रोणे काये केले : त्याचें धनुस्य छेदीले : तवं आस्वस्थामा पावला : ॥ ७८ ॥ आणीक मारीले वारु : वीरथी जाला कुमरु : मग तो माहावीरु : काय करीता जाला : ॥ ७९ ॥ मग अभीमन्ये काय करी : मग खर्ग घेतले करी : सैन्याते संव्हारी : तीये वेळी देखा ॥ ८० ॥ येकाते खर्गे हाणतु : येकाते पाई धरोनी टाकीतु : ऐसा मार बहुतु : करी कौरवासी : ॥ ८१ ॥ सैन्य बहुत आटले : मग द्रोणे म्हणतीलें : यासी चहुबाही वेढीले : पाहीजे तुम्ही : ॥ ८२ ॥ कर्ण आणी कृपाचार्या : आस्वस्थामा द्रोणाच्यार्या : चौघें चहुबाहिया : शस्त्रधारी वरुसती : ॥ ८३ ॥ ते चौघे अतीरथी : संधान वेगेंसी करीती : बाण खडतर हाणती : आभीमन्यासी ॥ ८४ ॥ तो उसळला गगना : हाणीता जाला राया कर्णा : तेणे त्यासि आली मुर्छेना : तवं आस्वस्थामा हाणितला ॥ ८५ ॥ त्याचा मारुनी सारथी : उसळीला गगनगती : तव द्रोणे ब्रह्मशक्ती : हाणीतीली ॥ ८६ ॥ ते लागली जीव्हांरी : पडला धरणीयेवरी : तवं हाणीतीला बहुता वीरी : शस्त्रांघाती ॥ ८७ ॥ कौरव मिळोणि सकळी : हाणीतीला सुबळी : मुर्छना आली तीये वेळी : तया वीरासी ॥ ८८ ॥ मागुतां उठु पाहे : तवं आमित पडतीं घाये : येकला करील काये : कोन्ही नाही तयापासी ॥ ८९ ॥ मीळोनी कौरवी समस्ती : आभीमन्या पाडीला क्षेती : वीर भवते भोवती : कोन्ही न राहाती संमुख ॥ ९० ॥ आभीमन्या पाडला रणी : देखोनि कापिंनली धरणी : कौरव म्हणती ह्या याचे पायेवणी : वंदीजे चरण याचे : ॥ ९१ ॥ जरि यासी पाठराखा असता : तरी हा समस्तासी मारीता : त्यासी जाला पाहाता : दुर्योधन तो ॥ ९२ ॥ पाहे तव रूप सावळा : नेटकी भरली वर्ये सोळा : याने संव्हारीलें दळा : आणि कुमरु लक्षिमणा : ॥ ९३ ॥ तेथें जईद्रथ आला : तेणें चरणतळे हाणितीला : तयासी दुर्योधन कोपला : बहुतांपरी ॥ ९४ ॥ गांधारु म्हणे जईद्रथासी : या भेणे तु पळाला होतासी : पडलया पापरा हाणसी : हा कवण क्षत्रधर्म ॥ ९५ ॥ पडलेंया दीधळा पापर : हे आंगवण केली थोर : हासती वीर सकळ : कौरवाचें ॥ ९६ ॥ म्हणति भली आंगवण केली : पडलीयां लात दीधली : हे आइकोनी बोली : मान

घातली खालुती ॥ ९७ ॥ मग दुर्योधन आपन : सोधीता जाला रण : जयाचे गेले प्राण : ते सतगति लावीले : ॥ ९८ ॥ जीत घायाळ उचलीले : ते मेलीकारा पाठीवले : तव पांडवि आईकीले : आभीमन्या पडिला : ॥ ३०० ॥ तेथें कोल्हाळ जाला थोरु : आति दुखीस्त योधीश्रीकु : आईकोनी व्रश्कोदरु : आंग टाकीलें धरणीवऱ्ही : ॥ १ ॥ तव सुभद्रेने आईकीले : तीये थोर दुख जालें : कथा ई वीस्तारा जाले : ग्रंथ आवरेना : ॥ २ ॥ ईतुके तेथ वर्तलें : तवं कृस्ण आर्जुन पैलिकडे गेले. तेथें युध्ये कैसे जालें : ते सांगे वीष्णुदास पंडीतें : ॥ ३ ॥ ॥ ६० ॥ ॥ ६३ ॥ ईति चक्रवीहु आभीमन्ये वध जाला : प्रसंग तीसरा जाणावा ॥ ३ ॥

॥ श्रीकृस्णरायायन्मा : ॥ श्री ॥ ॥ श्री ॥ ॥ श्री ॥

श्रीकृस्ण आर्जुन तेथें गेलें : तवं टहुटाळके पाचारीले : तुम्ही अनंत पवाडे केलें : म्हणौनि युध्यासी बोलावीलें : ॥ ४ ॥ मग बोलीला प्राराक्रम : आतां तुम्हासी संग्रामी करीन संभ्रम : आता नीवडेल तुमचा भ्रम : सांहे मात : ॥ ५ ॥ म्हणौनी आमिते बाण : आर्जुने वरच्यावर तोडुनी : तव आग्नी शस्त्रें घालुन : तवं आग्नि प्रजळला ॥ ६ ॥ त्या आग्नीतें देखिलें : आर्जुनें प्रजन्येशस्त्रें घातले : तेण आग्नितें निवारीलें : मग तेणें प्रहरीला वायो ॥ ७ ॥ पार्थे पन्नकाशस्त्रें घातलें : तेणें पंन्नक चालीलें : तवं टहुटाळके प्रहरीलें : गरुडाशस्त्रें ॥ ८ ॥ तेणे पंन्नक गीळीलें : मग आर्जुन्ये काये केलें : ऐसी बहुत आसतीलें : आता नीर्वाण करु ॥ ९ ॥ आता पाठवा बंदिजन : तुम्ही बोलावीलें आम्हालागुन : ऐसी बहुत वींदान : थोडी आसती : ॥ १० ॥ तेणे पार्थे तयाते : हाणीतले टहुटाळकाते : तेणे तोडिले त्या बाणाते : मग हाणीतले सात बाण ॥ ११ ॥ च्याऱ्ही चहु वारुवासी : येके भेदला सारथीयासी : दोन लागले टहुटाळकासी : तेणे त्यासी मुर्छना आली : ॥ १२ ॥ तेणे सांडिला तो रथ : गेला आपुलिया दळात : तवं पाठि लागला तो पार्थ : वर्सला सरधारी ॥ १३ ॥ बाण येती घनदाट : सैन्य अवघे घायवंट : पाडिले विर सुभट : बारा वाटा सैन्यासी ॥ १४ ॥ बाणापाठि येती बाण : आती तीखट दारुण : बहुत पाडिले रण : तीयेवेळी : ॥ १५ ॥ बहुतदळ आटले : तवं टवटाळके काये केलें : मावेतें स्मरीलें : आवघे जाले तेजमयें : ॥ १६ ॥ उदकाचे कलोळें : वाहती नदीचे खळाळे : ऐसें देखिलें डोळा जळें : पार्थवीरें : ॥ १७ ॥ रथ गज नगर : वाहात असति आपार : ग्रामगृहे (सु)स(र)(म)गर जाताति वाहत : ॥ १८ ॥ ऐसा माहापुर बहुत : देखितां जाला पार्थ : मग म्हणे देवातें : आतां निगीजे वेगी : ॥ १९ ॥ उदकाचा माहापुर : वाहुन जाईल रहीवर : ऐथें न चले वीचार : धनुर्वीद्येचा ॥ २० ॥ ते वेळीं श्रीकृष्णनाथ :

नाभी म्हणती आर्जुनातें : तुज दावीन वैरीयाते : हे माव राक्षेसी ॥ २१ ॥ दैत्याची या मावा : न कळती समस्ता देवा : आर्जुन म्हणे केसवा : दावी प्रचीती : ॥ २२ ॥ बहुत युध्ये मागा जाली : परि हे माव नाही देखली : देवे मंत्रुनी रक्षा टाकीली : तवं उदक न दीसे : ॥ २३ ॥ काही न दीसे पुर : मग देखिला दळभार : मग म्हणे सारंगधर : याचा मृत्यु मी सांगेन : ॥ २४ ॥ टवटाळक नावयासी : तुज सांगेण परीऐसी : तळवातळ हात अन टाळुसी : भेदी एकचि बाणे : ॥ २५ ॥ हे सांगतिले श्रीकृष्णनाथे : मग बीनवीलें पार्थे : भेदीन तीन्ही ठाया यातें : ऐसे म्हणिता जाला : ॥ २६ ॥ देवो म्हणे परी ऐसी : तु कैसा याते भेदीसी : तरि सांगै मजपासी : पंडुसुता : ॥ २७ ॥ पार्थ म्हणे पुर्वामुख : भेदीन उर्ध वीषेख : ऐसें लक्षण देख : छेदिन दैत्याची ॥ ऐसें पार्थ बोले : ते देवाच्या मना आले : मग चालीयलें : तयावऱ्ही ॥ २८ ॥ तवं टहुटाळके दैत्यनाथे : वेढिले आर्जुनातें : हाणता शस्त्रेंघात : लक्षे क्रोडी ॥ २९ ॥ त्याची शस्त्रें तोडुनि : वीद्या जपे मोहनि : शस्त्रेंजाळ घालुनी : मोहीता जाला ॥ ३० ॥ देति जांबया आंगमोडे : सैन्य नीद्रा येउनी पडे । मग रथावरी पहुडे : टवटाळक तो : ॥ ३१ ॥ तो नीट चरण पसरी : मग धनोरजयो संध्यांन करी : भेदी तीये आवस्वरी : तळवातळ हात टाळु : ॥ ३२ ॥ भेदुन तळवातळहाता : बाण जाला नीगता : मग भेदीला माथा : तयांचा पै : ॥ ३३ ॥ या परी दैत्यारी मारिले : मग सीर छेदिले : कबंध पाडीलें : धरणीवरी : ॥ ३४ ॥ मग मोहोनीशस्त्र काढिलें : सैन्य सचेतन जालें : तेहि पडिला देखीलें : टहुटाळकाते ॥ ३५ ॥ मग हाहाकार जाला : वीर पळ सुटला : मग पार्थ बोलीला : देवरायासी : ॥ ३६ ॥ काऐ वर्तलें आसेल तेथें : माझीये उदरी लोळे फीरते : सोध झडकरी पेलीजे रथे : आपण जाउं वेगी ॥ ३७ ॥ देव जवं ज्ञानी पाहे : तवं आभीमन्या पडीला आहे : देवो काये म्हणता होये : तीयेवेळी ॥ ३८ ॥ द्रोण धनोर्धर शोर : त्या समोर न राहे वरकोदर : जरी धरीला युध्येस्टीर : तरि कार्य नासलें : ॥ ३९ ॥ ऐसे पार्थ आसे बोलत : मेलीकारा पावला त्वरीत : तव कोल्हाळ आईकत : दोघेजण : ॥ ४० ॥ आर्जुन म्हणे मुरारी : कोल्हाळ होताये मेलीकारी : काही वीपरीत परी : जाली असे : ॥ ४१ ॥ मेलीकाराजवळि आलें रथातळी उतरले : धनुस्य भाते ठेवीलें : तव आले वैराट द्रोपद : ॥ ४२ ॥ तयातें आर्जुन पुसे : हा कोल्हाळ काईसा आसे : तयातें देव म्हणत आसे : चला सामोर ॥ ४३ ॥ ऐसे देव बोलीला : तवं ते भीम आला : तेणे हांबरडा हाणीतीला : मग सांगता जाला ॥ ४४ ॥ आभीमन्याची वेवस्ता : भीम जाला सांगतां : मूर्छना आलि पार्थो : मग पडला धरणी-

वरी ॥ ४५ ॥ अर्जुन उचलीला : धर्मापासी नेला : तव कोल्हाळ जाला : लकुळशाहादेवाचा ॥ ४६ ॥ मुर्छना आली पार्थासी . भीम धरीला पोटेसी : कृस्ण म्हणती आर्जुनासी : ऐसे यास काइ कीजे ॥ ४७ ॥ मग सावध होउन : लेकरु युध्यासी पाठवण : ऐसा बहुत कोपुन : धर्मावरी ॥ ४८ ॥ असतां ईतुका दळभारु : युध्या पाठविले लेकरु : या वडिलास काऐ करु : मग धर्म बोलीला ॥ ४९ ॥ चक्रवीहु रचीला : भीम संग्रामा पाठवीला : सात क्षेवणिने वेढिला : मग आला आम्हावरी ॥ ५० ॥ द्रोपदाते जिंतिले : सैन्य अवघे भंगले : मग आमते धरीले ते सोडवीलें वरकोदरे क्षणामाजी ॥ ५१ ॥ भीम येकला वेढिला : तो सर्वाआंगी खोचला ॥ थोर मूर्छागत जाला : मग आले दळ टाकोनी : ॥ ५२ ॥ ईतुके जवं जाले : तवं द्रोणे भाट पाठवीले : संग्रामासी बोलावीलें : तव भीम मुर्छनागत : ॥ ५३ ॥ चक्रवीहुचा मारु : भाट बोलेंती वडीवारु : मग तुमचा तो कुमरु : उठीयला : ॥ ५४ ॥ तो नीघाला संग्रामासी : आम्ही वर्जिलें तयासी : अभीमन्ये मात केली कैसी : चक्रवीहु भेदीला : ॥ ५५ ॥ भीम होता वेढिला . तो त्याने सोडवीला : अभीमन्ये संव्हार केला : कौरवात : ॥ ५६ ॥ पुनरपी चक्रवीहु भेदीला . कुमर लक्षीमन मारीला : द्रोणकर्ण पळवीला : मार केला सैन्यासी : ॥ ५७ ॥ आस्वस्थामयासी : जिंतीलें सरजाळे समस्तासी : ख्याती केली ऐसी : तुझेनी पुत्रे : ॥ ५८ ॥ मग समस्ति वेढीला : ते बहुत हा येकला . ऐसा जाला ऐक वेळा काये कीजें पार्था ॥ ५९ ॥ तु म्हणतांसी लेकरू परी तो सासाअर्जुनाचा अवतारु . तो जाणे मागु : चक्रवीहुचा ॥ ६० ॥ ऐसे धर्म बोलीला. तवं आर्जुन कोपला . आम्हा वनवास जाला : तुमचेनि बोलें : ॥ ६१ ॥ गांधार गंधार्वे धरुनि नेला : तो तुम्ही सोडवीला : वैरभाव होतां तुटला : राज्ये आपुले होते ॥ ६२ ॥ आता काऐ आठउ जीवी : तुम्ही रीती केली बरवी : संतोषें तुमचा जीवी : कुमर आधी मारवीला : ॥ ६३ ॥ ऐसा बहुता परी कोपला : हातें खरगासी घातला : तो श्रीकृस्णे धरीला : मग नेला येकांतासी ॥ ६४ ॥ त्यासि जाला सीकवीता : धर्म पंडुपस्ये मान पीता : त्यासी प्रवर्तलासी घाता : काऐ आता तुज म्हणु : ॥ ६५ ॥ क्षेत्रधर्म पुत्रे केला : धर्म वाया दुखविला : तुवा आपराध थोर केला : जाय लाग चरणासी : ॥ ६६ ॥ देवासि म्हणे पार्थ : माझा अपराध जाला बहुत : मी करीन अपघात : मुख केवी दाउ धर्मासी ॥ ६७ ॥ कृष्ण पार्थासी म्हणे : आपघात न लगे करणे : पुत्राचा कुढावा करणे : हे विचारा पा : ॥ ६८ ॥ आता धर्माची स्तुती करावी : झडकरी त्याते बुझावी रणभुमि सोधावी . अभीमन्याची : ॥ ६९ ॥ मग आले

धर्मापासी : आर्जुन लागला चरणासी : नीष्टुर बोलीलो तुम्हासी : घात आपुला करीन : ।। ७० ।। क : मग कढंवाचा खंजीर काढीला : धाउनी भीमाने धरीला : काये म्हणता जाला : आर्जुनासी : ।। ७१ ।। तुम्हा ऐसे जाले मरण : आभीमन्याचा सुड घ्यावा कवण : कौरवा नीपात करण : वायात्रीण का मरतां : ।। ७२ ।। नीर्वाळा कौरवा : सुड आपुला घ्यावा : मग भलता वीचारु करावा : जीवासी तुम्ही ।। ७३ ।। मग म्हणे योधीष्टीरु : मग बरे बोलीला वरकोदरु : हा बरवा केला वीचारु : आम्हास मानला : ।। ७४ ।। ते वेळी तो पार्थ : आस्तुति करीत : आसुराचा केला घात : जगन्नाथ मानवला : ।। ७५ ।। खांडववना आग्नी दीधली : त्रीलोक्यें जींतीली : उत्तरे गोग्रहणी नागवली : कौरव समस्तें ।। ७६ ।। ऐसी आस्तुत करीता : वीस्तारा जाईल कथा : आर्जुन जाला नीगतां : रणभुमीसी ।। ७७ ।। सकळ सैन्यासी : अर्जुन आला रणभुमीसी : पडले देखिलें अभीमन्यासी : मग तयांसि काये बोले ।। ७८ ।। घाईचुर्ण असे जाला : परी आत्मा नाहि गेला : मग काये म्हणता जाला : आर्जुनासी ।। ७९ ।। म्या प्राण धरी कंठी : जे तुम्हासि होईल भेटी : आईक ताता जगजेठी : मी म्हणे ते परीसावें ।। ८० ।। मी रणि पडिला : तवं जईद्रथे पापरे हाणीतीला : तेणे दुखवला : प्राण माझा : ।। ८१ ।। मग आर्जुन म्हणे अभीमन्यासी प्रभातें वधीन जईद्रथासी : हे सर्वथा माझी भाक ऐसी : जाण सत्ये : ।। ८२ ।। प्रभाते जरी न मारी : तरी स्वान पातेल माझे सरीरी : त्याते न मारी : करीन आग्नीप्रवेस ।। ८३ ।। त्याचा न करी वध : तरी प्राणासी करीन खेद : हा वडीलाचा बोध : याचे पतन मज : ।। ८४ ।। आपुलीया उदरपोसनाकारणे : पुडिलाचें बोले उणें : तेण लीपीजे पतने : सत्ये जाणा ।। ८५ ।। जरी मी तयांसी न मारीता : तरि प्रतिज्ञा बहुतां : पार्थ जाला बोलेतां : सांगतां होईल विस्तारु : ।। ८६ ।। ऐसं पार्थ बोलीला : मग अभीमन्ये प्राण सांडिला : मग क्रीया कर्म करीता जाला : पार्थ वीरु : ।। ८७ ।। आर्जुनाची बोली : दुताने आईकीली : तेही सांगीतली : दुर्योधनापुढें ।। ८८ ।। मग दुर्योधन बोले : जईद्रथासि पाहिजे राखिले : मग द्रोणासी सांगीतिलें : तयावेळीं ।। ८९ ।। यावरी द्रोण म्हणे : जैईद्रथासी राखिन : आग्नीप्रवेस करवीन : पार्थाकरवी ।। ९० ।। आतां पांडवात : समर्थ येक पार्थ : तो आपणया करील घात : येराचा अंत पुरविन : ।। ९१ ।। ऐसा जाला वीचारीता : तेथे पांडवाचा दुत होता : तेही जाणवीली धर्मासी वार्ता : भीमा आर्जुनासी ।। ९२ ।। मग पांडव आले श्रीकृस्णापासी : तेही सांगीतले तयांसी : मग म्हणे हृसीकेसी : याचे काऐ भये : ।। ९३ ।। देव ह्मणे पंडुसुतां : मी जवळी असतां : कैसा राखतील जईद्राथा : प्रभा ते जान

वैल : ॥ ९४ ॥ ते कर्मली नीसी : उदयो जाला दीनकरासी : पार्थ म्हणे वीरासी : वेगी पालाणा : ॥ ९५ ॥ सैन्य सावध केलें : मग कृस्णापासि आले : समस्त पायां लागले : सोडोस उपचारी ॥ ९६ ॥ देव रथि बैसले : पुडा दळभार चालीले : रणतुरा गजर जालीले : मग आले रणभुमिसी : ॥ ९७ ॥ तवं ऐरीकडे दुर्योधने : सामधी केली सैन्ये : मग काये केले द्रोणे : ते परीयेसा पां : ॥ ९८ ॥ पालाणोनी बाहीर आला : मग गुरु काये करीता जाला : वीहु चहुकडे रचीला : मधे घातला जईद्रथ : ॥ ९९ ॥ मग जन्मोजया म्हणे : त्या वीहुचि नावं कवणे : मग वेसंपायेन म्हणे : परी-येसी राया : ॥ ४०० ॥ सुचिकावीहु संकटवीहु : त्यामधे कृस्णवीहु : चवथा चक्रवीहु : परीऐसा पा ॥ ४०१ ॥ याचहुआत : घातला जईद्रथ : आता कैसा वींधील पार्थु : सवं देवें कौसालीया : ॥ २ ॥ ऐसे ज्यान्ही वीहुते रचीलें : मग रणभूमीसी आलें : ते आर्जुने देखिलें : (मग) म्हणतीले भीमासी : ॥ ३ ॥ द्रोपद आणी वैराट : दुस्टदुन्म सुभट : मी पुढा करीन वाट : वीर आदट संव्हारीन : ॥ ४ ॥ तुह्मि चौघी मिळुनी : कौरव पाडावे रणी : आसुध बाहे धरणि : ऐसे करावं ॥ ५ ॥ ऐसा करावामारु : ना म्हणावा साना थोरु : सोधे कौरवोदळाचा करा संव्हारु : बहुत करावा : ॥ ६ ॥ कौंतीभोज वीरराज : शीशुपाळ आत्मज : परा-क्रमं सहज : जाणवलें तुमचा : ॥ ७ ॥ आजिचा दिवस : कौरवा घेउ ग्रा उलास : ऐसे बोले ह्रसीकेस : तया वेळी : ॥ ८ ॥ नकुळ शाहादेवें : धर्मा-पासी असावें : वरवियापरी राखावे : ऐसी आज्ञा दिधली : ॥ ९ ॥ संख स्फुरीला देवोदत : ध्वजी भुभुकार करी हनुमंत : मग उठीबोला पार्थ : बाणि वरसला : ॥ १० ॥ तेंथें संग्राम थोर जाला : पार्थाने गुरु हाणीतीला । घोडे सारथी मारीला : पडले देखा : ॥ ११ ॥ तो वीरथी करोनी : संवंचि वीहु भेदुनी : कौरवा मार करूनी : तवं भीम काये करी : ॥ १२ ॥ गजाने गज हाणे गाढा : मारी घोड्याने घोडा : ऐसा करी रगडा : कौरवसैन्याचा : ॥ १३ ॥ रथानें रथ हाणे : घे घे पुढिलाते म्हणे : ऐसे दळ संहारुन : कौरवाचे देखा : ॥ १४ ॥ वैराटे द्रुपद मार केले : दुष्ट-द्युम्ने संव्हारीले : मग पाचारीले : सुर्योनंदना : ॥ १५ ॥ तोही खडतर बानी हानीतला : कर्ना जीव्हारी खोचला : मग भीम काय करीता जाला : ते आवोधारा राया ॥ १६ ॥ गदा घेउनि करी : धाविनला कर्णावरी : वारु मारीले ज्यान्ही : आनि सारथि पाडीला । ॥ १७ ॥ तो वीरथि जाला : आणिके रथासि गेला : तव तेथें पावला : सुभट अस्वास्थामा : ॥ १८ ॥ द्रुपद आणि वैराट : सैन्यासि भेवंडिला आट : तेथ पावोला सुभट : आस्व-स्थामा ॥ १९ ॥ तो बाण वर्शत : त्या विराते पाचांरीत : ते तो देखे पार्थ :

सींह्नादें गर्जत : ॥ २० ॥ पार्थे वाणी वरुशे : त्यामाजी आस्वस्थामा न दीसें : मग कर्ण द्रोण सरीशे : उठावले ॥ २१ ॥ तेथें रणकंदन जालें : मग अस्वस्थामयातें सोडवीलें : तवं भीमसेनें संव्हारीलें कुंजरातें : ॥ २२ ॥ हस्ति धरुनि चरणी : येकात टाकि गगनी : येंक आपटी धरणी : आला लोटुनि पार्थापासी : ॥ २३ ॥ वैराट द्रुपदासि तेथें वेढिलें : त्यासि भीमें सोडवीले : रणी आणिक वीर मारीले : असंक्षात ॥ २४ ॥ द्रुष्टद्युम्नें वेढिला होता : तो जाला येता : मग पार्थ जाला नीगता : भेदि चक्रवीहुते ॥ २५ ॥ दुर्योधन होता तेथें : तेणे देखीले पार्थाते : तो तेथुनी पळत : तयाते देखोनियां ॥ २६ ॥ त्यातें पार्थे म्हणे : राहे राहे जासि झणे : म्हणों हाण हाणें सत्राणें : साता वाणी ॥ २७ ॥ च्यान्ही चहुं वारुवासी : ऐक भेदला सारथीयासी : दोन भेदले गांधारासी : तेणे तयासी मुर्छना आली ॥ २८ ॥ तव कर्ण द्रोण आले : दुर्योधनासी पाठीसी घातले : मग काय करीते जाले : भीम आर्जुन : ॥ २९ ॥ कर्णा आणि द्रोणासी संग्राम जाला अर्जुनासी : ते सांगेन परीऐसी : माहा दारुण : ॥ ३० ॥ ते वेळी वरकोदरु : धाविनला वेगवत्तरु : उचलीला रहवरु : कर्णवीराचा ॥ ३१ ॥ रथ धरीला मकरतोंडी : वेढे च्यान्ही भोवंडी : तवं कर्णे घातली उडी : रथाखालुती : ॥ ३२ ॥ रथ भुमिसी आपटी : तो वीर जगजेठी : तव द्रोणे शरदाटी : केली देखा : ॥ ३३ ॥ ते देखीले पार्थे : घातलें सरजाळाते : भीम हाणे द्रोणातें ॥ गदाघातें : ॥ ३४ ॥ भीम हाणे जाणौनी : द्रोण गेला रथ सांडोनी : सारथी वारु मारुनी : भीम परतला : ॥ ३५ ॥ तव तो पार्थ : सरजाळि वरूषत : सैन्ये संव्हारी बहुत : कौरवांचे : ॥ ३६ ॥ थोर उठावला दळभारु : भोवतें शस्त्रेराचा पुरकलोळ : वानी खीलीले सकळ : तीये वेळी ॥ ३७ ॥ तव हाहाकार जाला : भीम सींहीनाद गर्जेला : भुभुकार केला पवनपुत्रें ॥ ३८ ॥ संख स्फुरला देवदत्त : ब्रह्मादिक कापत : थोर जाला अकांत : कौरवासी ॥ ३९ ॥ ते वेळी क्रुपाचार्याचा वीहु भेदीला : कौरवभार मोडिला : मग पळ सुटला : माहावीरासी : ॥ ४० ॥ कर्ण आणि द्रोण : गेले सकट-विहु टाकुन : दारवटा बळकाउन : वीर राहीले ॥ ४१ ॥ आस्व-स्थामा कृतवर्मा : दुस्वाशान सुसर्मा : वहुत वीराचा सामा : दारवठा राहीला ॥ ४२ ॥ सैल्य सोमदत्त : भुरीस्रवा भगदत्त : ऐसा मेळवा बहुत : राहीला आसे ॥ ४३ ॥ अणीक नामनाके वीर : तेथें राहीले आपार : माहाकाळाचे जुंझार : गज भारी राहीले ॥ ४४ ॥ दळ सात क्षेवणी : जाण राहीले वळकाऊनी : तवं पंडुनंदन : संधान करी ॥ ४५ ॥ आर्जुनाचे वाण : अती तीखटे दारूण : बहुत पाडिले रण : कौरवांचे ॥ ४६ ॥ हाका

देती वीकाळी . येकाहुनी येक बळी : भीमसेन तीये वेळी : रथाखाली उतरला : ॥ ४७ ॥ गदा घेऊनी वेगी आला आत मीसळला सैन्यांत : शर्स्त्री खोचला बहुत : मग प्रार्थ सोडवीला : ॥ ४८ ॥ भीम गदाघाते : संव्हारी त्या दळाते : त्यासि वेढिल वहुते : शस्त्रें वर्शताती : ॥ ४९ ॥ तेथें अर्जुन आला टाकुनी : सोडविलें भीमालागुनी : संकटवीहु भेदुनी : वाट केली भीतरी : ॥ ५० ॥ तो आर्जुन येकला . संकटवीहुमाजि गेला : शस्त्राचा पुर वर्शला : कर्ण द्रोण आश्वस्थामा : ॥ ५१ ॥ अणिक कौरव वहुत : तेही शस्त्रे वरुर्शत : त्या शस्त्राते तोडित पार्थवीर ॥ ५२ ॥ शस्त्र-जाळ वर्शति कैसे : त्यामाजि आर्जुन न दिसे : सुर्यवींब झाकुळे जैसे . आभ्रामाजी ॥ ५३ ॥ शस्त्राशस्त्री घनदाट : वीर वर्सती सुभट : गगनी नाहीं वाट : वारीयासी ॥ ५४ ॥ प्रजन्यधारा कल्पांती : जैसे मेघ वर्सती : तैसे कौरव हाणीती : आर्जुनासी : ॥ ५५ ॥ तयाचि शस्त्रे तोडित : तो पंडुचा सुत : आणी दळ संव्हारीत : कौरवाचे ॥ ५६ ॥ बापु धनुर्धर जग-जेठी : येकला बंहुताते दाटी : वीर नींवत कपाटी : दाही दीशा ॥ ५७ ॥ वहुत पाडिले रणी : आसुध वाहे धरणी : मग कर्ण द्रोणे करणी : काय केली ॥ ५८ ॥ न नागवे हा सुभट : सैन्या भवंडिला आट : आता चहु-कुणी करु दाट : आर्जुनासी ॥ ५९ ॥ येव्हडा वेग नाही मना : आर्जुनाचिया संधाना : तेही पंडुचीया नंदना : वेढिले चहुकुणी ॥ ६० ॥ हे चवघे धनुर्धर ॥ सस्त्रे हाणीती आती आपार : ते कौरववीर : हाणती पार्थासी : ॥ ६१ ॥ द्रोण कर्ण आस्वस्थामा : चौघे वीर कृतवर्मा : हे वीर आर्जुना : हाणते जाले ॥ ६२ ॥ बाणी भरले अंबर : सींहुनाद गर्जती वीर : वाण न माती धरणी-वर : तीणे वेळीं देखा ॥ ६३ ॥ त्याऱ्ही चहुवारुवासि : येक भेदला सारथीयासी : दोन लागले तयासी : वक्षस्थळी : ॥ ६४ ॥ आर्जुनाच्या वाणी : कृतवर्मा पाडिला रणी : मग कर्णाद्रोणालागोनी : सुटला पळ ॥ ६५ ॥ तव हाहाकार जाला : कौरवबोसर मोडला : तवं दीवस उरला : पाहार येक ॥ ६६ ॥ देव म्हणे पार्थासी : उदक द्या वारूसी : त्रुस्या लागली सैन्यासी : उदक दीधले पाहीजे ॥ ६७ ॥ मग वाण लावीला गुणी ॥ आणीली भोगावती मेदनी : उदकाचे कल्लोळ नीगती रणी : मग उदक घेतले ॥ ६८ ॥ उदक सकळी घेतली : मग हो माहानदी प्रवर्तली : रणी धडे होती पडली : ते वाहवली ॥ ६९ ॥ तो देखोनी चमत्कारू : माथा तुकी द्रोणगुरु : ध्वज-तंवि भुभुकारू : करी हनुमंत ॥ ७० ॥ संख स्फुरीला देवो-दत्त : मग वोले पार्थ : द्रोणाते असे म्हणत : साहे मात : ॥ ७१ ॥ तुम्हीं लपविला जइद्रथ : आता× करीन नीर्घात : नाहि तरी नीपात : करीन सम-

× तो ग्राव्रा त्वरीत असा पाठ.

स्तांचा ॥ ७२ ॥ जईद्रथाकारणे : का जाता प्राणे : ऐसे म्हणौनि हाणे शस्त्राने : आर्जुन तो ॥ ७३ ॥ मग आणीक बाण घातले : ते कर्णे तोडीले : पार्थे त्याते म्हणतीले : आपुले बळ ना वीचारसी : ॥ ७४ ॥ मग कोपला पार्थ : हाणीतीले कर्णाते . मारीले सारथीयाते : त्या समई ॥ ७५ ॥ तो वीरथी जाला : आणीका रथासि गेला : तव द्रोण हाणीतला : आमीत्ये बाणी ॥ ७६ ॥ ते बाण तोडीले : तवं अस्वस्थाम्याने हाणीतले : द्रोणे संधान केले : ते वेळी पाहा ॥ ७७ ॥ मग बाण घातले कर्णे : पार्थ तोडी संधाने . आता सुचीकावीहु भेदणे : ते सांगैल कवि कृष्ण पंडीते ॥ ७८ ॥ तीन चक्रवीहु भेदुन : पार्थ गेला तीही तडाकुन : चौथा चक्रवीहुचें भेदन : ते आईक श्रुता ॥ प्रसंग चवथा ॥ ४ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

श्री सारस्वतीयेन्मा : श्रीगुरूभ्येयन्मा :

तीन वीहु भेदीलें : मग चवथ्या वीहुपासी आलें : तीन पाहार लोटले : दीवस उरला घटीका सात ॥ ७९ ॥ मग म्हणे रुसीकेशु : थोडा उरला दीवशु : कौरवा मनी उलासु : मग मनी वीचारी अनंतु ॥ ८० ॥ मग म्हणे आर्जुनाते : वेगी भेदी चक्रवीहुते : तु मारी जईद्रथातें : वधी वेगी : ॥ ८१ ॥ मग सकळ सैन्ये घेउन : नीघाला वीर भीमसेन : येकवट मीळुन : वीहु भेदावया ॥ ८२ ॥ तवं धर्मा बहुत चींता : दीवस थोडा उरला आतां ॥ मग जाला म्हणता : सात्वीकासी ॥ ८३ ॥ तुम्ही झडकरी नीगीजे : कृस्णा आर्जुनाते म्हणीजे : दीवस थोडा उरला ॥ ८४ ॥ ऐसे आईकोनी : सात्वीक नीगे झडकरोनी : तो आला टाकोनी : जेथें असे भीमसेन : ॥ ८५ ॥ तेथें कौरव वीरी : वेढिले वीहुचा द्वारी : युध्य होत आसे भारी : ते देखिले सात्वीके : ॥ ८६ ॥ ते व्हेळी सात्वीक उठावला : कौरवदळाचा संव्हार केला : मग पळ सुटला . कौरवासी ॥ ८७ ॥ कौरवदळें भंगली ॥ मग भीमासी भेटी जाली : ( तव सैन्यें येकवटली : ) म्हणती सुधी करु आर्जुनाची ॥ ८८ ॥ वैराट द्रुपद दुस्टदुन्म : कोतींभोज सुसुपालनंदन : मग सकळ सैन्यें घेउन : कृस्ण अर्जुनापासी आला ॥ ८९ ॥ आवोघें ऐकवट जालें . मग देवे म्हणतीले : वीहु भेदावें वहीलें : दीवस थोडा उरला ॥ ९० ॥ मग संख देंवदंत्र : स्फुरीता होय पार्थ : भीम सींहिनाद गर्जत : सुभुकारीलें हानुमंतें : ॥ ९१ ॥ माहा भयाकारे : वाजिनली रणतुरे : नीस्यानाचे गजर : गर्जताती ॥ ९२ ॥ सकळ सैन्यासी : वीहु भेदीला चहुपासी : पुडा कथा वर्तली कैसी : ते परीयेसा पा : ॥ ९३ ॥ वीहु भेदीला देखुन द्रोणासी म्हणे कर्ण : जरी गेले प्राण : परी जईद्रथ ने द्यावा ॥ ९४ ॥ म्हणे समस्त वीराते : तुम्ही प्राण द्यावा येथें ॥ जरी नीर्वाण करील पार्थ : तरी जईद्रथ

गखावा ॥ ९५ ॥ थोडा उरला दीवसु : आर्जुन करील आग्नीप्रवेसु : येरा करीता नासु : वेळ नलगे ॥ ९६ ॥ आर्जुन मेलयावरी : करावी (न) लगे कुसरी : आजिच्या घटका च्यारी . जइद्रथ राखीजे ॥ ९७ ॥ ऐसे सांगोनी समस्ता : बाण जाला वर्सता : द्रोणे पाचारीले पार्था : जाला वर्सता शस्त्रेधारी ॥ ९८ ॥ कौरव समस्त : बाण वर्सती आसंक्षात : पांडवसैन्ये आद्भुत : ते वर्सती नरधारी : ॥ ९९ ॥ दोही दळी हाहाकारू : शस्त्रांचा माहा पुरू : पडुनी ठेला अंधकारू : दीवस दीसेना ॥ ५०० ॥ मग भीम काये करी उतरला चरणाचारी : गदा घेतली करी : संव्हार करी कौरवांचा ॥ १ ॥ आर्जुन वर्से बाणी : बीद्या चक्षुकी जपुनी : अंबर गर्जे नीस्याणी : वीर रणी पडताती : ॥ २ ॥ आकासाहुनी पडती बाण : सव्य आपसव्य येती बाण . पाताळ फोडुनी येती बाण : बहुत रण पाडिले ॥ ३ ॥ बाणजाळ गगनी : देवो पाहाती विमानि ( ते गेले पळौनी : विस्मो मनी तयांचा ) ॥ ४ ॥ मग गुरू बृहस्पती बोले : मागा संग्राम बहुत जाले : परी ऐसे नाही देखिले : माहा दारूण . ॥ ५ ॥ बाण पार्थाचे आनीवार : कडतरले नावनीके वीर : धरणीवरी वाहे पूर : ऐसे घोरांधोर जाले ॥ ६ ॥ यावरी जन्मोजया बोले : रणी कोण वीर पडीलें : ते पाहिजे सांगीतले . वैसंपाएना ॥ ७ ॥ जन्मोजयाप्रती सांगत : वीर पडीले बहुत : त्यांची नांवे सांगत . कथा जाईल वीस्तारा : ॥ ८ ॥ सुशीरवा माहाकेते : सुरसुभान भद्रकेते : सुरराज वीख्यातें येथ संख्या नाही ॥ १० ॥ ऐसे विर पडिले रणी : थोर जाली केसधरणि : विहु न भेदें देखुनी : मग सारंगपाणी काये करी ॥ ११ ॥ श्रीकृष्णे दीवसाकडे पाहे : तव घटिका च्यार उरला आहे : कौसाल्य करी द्वारकेराये : ते परीऐसा पा ॥ १२ ॥ सुद्रसेन सुर्याआड घातले : तेज भानुचे लोपले : आंधकारात पाडिलें : ते व्हेली : ॥ १३ ॥ तें वेळी लोपला दानकरू : थोर पडला आंधकारू : पांडवादळि हाहाकारू : थोर वरवट जाले ॥ देवो म्हणे आर्जुना : दीवो गेला आस्तमाना : तु बोलीलासी प्रतीज्ञा : जइद्रथ न मारवेची : ॥ १४ ॥ दीवस मावळला देखुनी : पार्थ रथाखाली उतरूनी : सैन्येकात म्हणौनी : काष्ट मेळवा ॥ १५ ॥ वीर मारीले बहुत : त्याचे पडिलें होते रथ : काष्ट आणीली बहुत : मग सरण रचीले ॥ १६ ॥ पडिला देखो अंधकारू : झडकरी आला योधीष्टीरू तेथें आला वरकोदरू . आणी नकुळ शाहादेवो ॥ १७ ॥ द्रुपद वैराट दुस्टदुन्म सकळ राजे आले मिळोन : आग्नीप्रवेस करील आर्जुन : म्हणौनीया ॥ १८ ॥ मावळला देखती दीवस : कौरवो मानती उलास : आर्जुन करील अग्नीप्रवेसन : ते पाहु आलें ॥ १९ ॥ आग्नीप्रवेस करील पार्थ : तेथ आला जइद्रथ त्याते द्रोण म्हणत : तु का येथ आलासी ॥ २० ॥ कौशाल्येया

कसीकैसु : रात्रीचा करील दीवसु : तो अर्जुना देईल येसु : द्रोण म्हणे तया ॥ २१ ॥ तव पार्थे काऐ केले : श्रीकृस्णाचे चरण नमस्कारिले : धर्म भीम वंदीले : आळंगीले नकुळशाहादेवाते ॥ २२ ॥ राया समस्ता पुसुन : अग्नीप्रदक्षणा करुन : मग म्हणे मदसुदन : युध्ये का सांडिली ॥ २३ ॥ मग शस्त्रे घेउन : अग्नीप्रदक्षणा घालुन : पार्थ धणुस्य भाते आंगी करुन : तीये वेळी ॥ २४ ॥ धनुस्य चढउनी : बाण सीतासी लाउनी : कुळदेवता स्मरुनी : आग्नीप्रवेस करी ॥ २५ ॥ पार्थ जाला बोलता : श्रीकृष्ण माझी कुळदेवता : देवो सुद्रसेन होय काहाडीता : सुर्या आडु-णीया ॥ २६ ॥ देवो म्हणे हा घे अदीत : हा घे जईद्रथ : वेगी करी घात : जईद्रथाचा ॥ २७ ॥ जईद्रथासि वधीले : सीर गगनी उडवीले : कबंध पडले : पार्थ म्हणे याते कैसे कीजे ॥ २८ ॥ मग देवो सांगत : याचा पीता ब्रहद्रथ : गंगासागरी तप करीत : तेथे नेउनी घाली : ॥ २९ ॥ हे पडो नेदीजे मेदनी वाणी न्या पीटोनी : आर्घ देता संध्यावदनी : आंजुळी घालावें ॥ ३० ॥ पार्थ पीटीले सीराते : ते नेले गंगासागराते : संध्या करीता तेथें त्याचीये आंजुळी पडिले ॥ ३१ ॥ सीर पडिले आंजुळी : तो दचकला तयावेळी : सीर ठेविले भुतळी : तव त्याचाही मृत्ये जाला ॥ ३२ ॥ यावरी जईद्रथ वधीला : आर्जुन वीजया जाला : देवि वर्सावो केला : सुमनांचा ॥ ३३ ॥ वीस्मयो जाला सकळ देवा : नकळती श्रीकृष्णाचीया मावा : अंगीकारी ऐसा व्हावा : देवो भक्ताचा कैवारी ॥ ३४ ॥ : ढ : द्रढ भक्तीचा आंगीकारी : जन्मोजन्मी वोळगावा हरी : न वीसंबावा क्षेणभरी : म्हणे पंडित विष्णुदास : ॥ ३५ ॥ ५ ॥ कृस्णाने भक्तासी येस दीले पार्थासी : पुढें कथा वर्तली कैसी : ते आईका ॥ छ ॥ प्रसंग पाचेवा : ॥ ५ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

श्रीकृस्णायन्मा : पांडव मनी हासत : स्तुति देवाची करीत : कर जोडोनि वीनवीत : जी आमची कीर्त किली : ॥ ३६ ॥ यावरी धर्म म्हणे : आमुचे राखीले प्राण : सर्वा ठाई नारायेण : देवराया तु ॥ ३७ ॥ ऐसी अस्तुती करीता : वीस्तारा जाइल कथा : देव जाला वारीता : म्हणे चाला मेलीकारासी ॥ ३८ ॥ येरीकडे कौरववीरी : युद्धे करीता त आवस्वरी : आले मेलीकारी : तेथें विचार करीती : ॥ ३९ ॥ म्हणती दीवसाची केली राती : कौशाल्ये कृस्णाची न कळती : आता पांडव जींतीती : हा निर्धार जाला ॥ ४० ॥ गांधार गुरूसी बोले : कृस्णे कौशल्य केलें : जईद्रथासी वधीले . राखील पांडवासी ॥ ४१ ॥ द्रोण म्हणे गांधारासी : तो सारथी पांडवासी : क्षये करील तुम्हासी : राज्य देईल पांडवाला ॥ ४२ फरुस (राम) जिंतुन : काळकाम अंकना घालुन : तो रणी सारीला गंगानंदन :

त्याची कौशाल्ये न कळती ॥ ४३ ॥ त्रीलोकीचे दैत्य वधीले समस्त : त्याचे कौशल्ये न कळत : तेथें ब्रह्मादीकासी अंत : कोठे लागे ॥ ४४ ॥ तुमचा केव्हडा केवा : जे तुम्ही जींता पांडवा : हा भ्रम न धरावा : वायाबीण ॥४५॥ तो तुम्हा वधील समस्ता : राज्ये पांडवासी देईल आतां . गुरु जाला बोलता : गांधारासी : ॥ ४६ ॥ ऐसे आइकुनी बोलन : गुरूसि म्हणे दुर्योधन : ऐसे यासी काय करण : ते सांगीजो जी ॥ ४७ ॥ गुरू म्हणे होय बोलता : जरी होईजे सरनांगता : तरी वाचाल आता : यऱ्हवी मराल नीभ्रांत जाणा ॥ ॥ ४९ ॥ मग दुर्योधन म्हणे : साभिमान न सांडणे : जीन होय अथवा मरणे : परि सरण केसवा न जाउ ॥ ४९ ॥ गुरू म्हणे गांधारा आता चाला मेलीकारा : उदयो होईल दीनकारा : मग भलते वीचारू ॥ ५० ॥ ऐसें विचारुनी गांधारू बोलीला : तव पाहारू पाहाटिचा जाला : तवं दिवस उगवला : पुडा कैसे वर्तले : ॥ ५१ ॥ मग दुर्योधन आला : गुरूच्या चरणासी लागला : मग पुजीता जाला : सोडस उपचारी : ॥ ५२ ॥ कर्ण आस्वस्थामा ते अवस्वरी : कृपाच्यार्या आला झडकरी : मग बैसले वीचारी . ते समई : ॥ ५३ ॥ म्हणती कौशाल्य देवो केलें : जईद्रथातें वधीलें : वीर रणि पाडिले : नावनीके देखा : ॥ ५४ ॥ दुर्योधन जाला बोलता : आता काय विचारीता : शाभिमान सांडिता : जगत्र हासैल : ॥ ५५ ॥ तरी जावों जीवे : परि सरणागत न व्हावे : ऐसे जाउनी सांगावे : द्रोणाच्यार्यासी ॥ ५६ ॥ मग कृपाचार्या म्हणे : सैन्ये दो ठाइ करणे : आस्वस्थामा म्हणे : आम्ही जाउ वेगळेचि ॥ ५७ ॥ कर्ण आणी द्रोणे : आर्जुनासी वेगळे नेणे : भीमा संव्हारणे : आम्ही दोघे जणि : ॥ ५८ ॥ भीम संव्हारीलीयांवरी जाणा : या दोघामध्ये एक होय उणा : येरा- सहज नीदाना : जाले असे ॥ ५९ ॥ लकुळ शाहादेवा : संव्हार तुम्हीं करावा : धर्म जीतचि धरावा मग पण करावा साचार तुम्ही ॥ ६० ॥ ऐसा करुनि नीर्धारु : दो ठाइ केला दळभारू : मग नीगाला गुरू : रणभुमिसी ॥ ६१ ॥ तेथें पांडवाचे हेर होते : तेही सांगीतीले नीरुते : मग जाले नीगते कृस्ण आर्जुन ॥ ६२ ॥ ते रणभुमीसि आले : कौरवभार देखिलें : दो ठाई केलें : तियेवेळी ॥ ६३ ॥ मग देवे काय केलें : भीमाते पाचारीलें : तुमचे वेगळे नेले : ऐसे जाणा ॥ ६४ ॥ श्रीकृस्ण म्हणती सात्वीकासी : तुम्ही जतन करावें यासी : राखावें भीमासी : युद्ध करीतां ॥ ६५ ॥ भीम मोटा उधट : युद्धासी आसे नीट । हा भरील घोट : कौरवाचा ॥ ६६ ॥ यासी वरवी आंगवण : हा न मरे शस्त्रान : हा नेणें मरण : उठावलीया ॥ ६७ ॥ लाहान थोर न वींचारी : हा नेटैल सरधारी : तेथे तुम्ही शाहाकारी : व्हाव यासी ॥ ६८ ॥ मग म्हणे भीमासी : तुम्ही बुधी करावी ऐसी : कुंजरा

आस्वस्थामयासी : वधावे सर्वथा : ॥ ६९ ॥ तुम्ही अस्वस्थामा वधावा : हा बोले प्रतीज्ञा घ्यावा : मग तुम्ही करावा सींहीनाद ॥ ७० ॥ आपुले (दळ) भारी : तुराचा गजर करी : सींहीनादाची थोरी : बहुत करावी ॥ ७१ ॥ सात्वीकासी सवे पाठविले : आणिक वीर आज्ञापीले : वैराटासी म्हणतीले : कोंतीभोज वीरराज ॥ ७२ ॥ भोज आणि विरराजे : शाहादेव शुशुपाळ आत्मजे : तुम्ही सांगाते जाईजें : भीमाचीया ॥ ७३ ॥ ते हाणीती वरकोदरा : त्याचि शस्त्रे तुम्ही नीवारा : भीम मारील कुंजरा : ऐसी आज्ञा दीधली ॥ ७४ ॥ तेथें कर्ण द्रोणे : अच्यार्या आस्वस्थामा आपणे : वेगळे नेईजें म्हणे : भीमसेनासी ॥ ७५ ॥ ते जाले नीगते : पाठविले बंदीजनातें : अस्वस्थामा म्हणे नयाते भीम संग्रामा आनावा : ॥ ७६ ॥ ते पढती भीमाचे पवाडे : कालीवीर मारीले गाढे : आजि संग्राम नीवाडें : आस्वस्थामयासि ॥ ७७ ॥ देवा आणि धर्मासि : नकुळ शाहादेवासी : पुसुनि नीगे संग्रामासि : भीमसेन तो ॥ ७८ ॥ देव म्हणे भीमसेनातें : तुज सांगीतले होते : तुवा वधावें कुंजराते : ते वीसरु नको ॥ ७९ ॥ पुनरपी म्हणे श्रीकृस्णनाथे : मग म्हणे वीराते : तुम्ही राखावे भीमाते : मग पाठविले ॥ ८० ॥ तव ईकडे कर्ण आणि द्रोण : तेही पाचारीला आर्जुन : दोघा मिळुनी संधान : करीताति : ॥ ८१ ॥ ते दोघे धनुर्धर : शस्त्रें वर्सती अपार : बाणी भरिले अंबर : सुर्यें-कीर्ण दीसेना ॥ ८२ ॥ पार्थ तोडि त्या शस्त्रांतें : आणिक बाणजाळ घाली ते : बाणा बाण नीवारीतें : दोघा वीराचे ॥ ८३ ॥ आणिक नीर्वाण : खडतर वर्सती बाण : ते पार्थ आपण : तोडीता जाला ॥ ८४ ॥ बाण येति लक्षें क्रोडी : अर्जुन वरिच्यावरि तोडी : सराने सर पाडी : धरणिवरि : ॥ ८५ ॥ दोघे दोघीकडोनी : वर्सती तीखटा बाणी : अर्जुन दृढ संधानी : तोडी क्षीण न लगतां ॥ ८६ ॥ आणीक वीर बहुत : शस्त्राधारी वरुसत : तेही पार्थ तोडीत : माहा नीर्वाण ॥ ८७ ॥ ऐसे वरसती सरधारी : येंकलीया पार्थावरी : अवधियांचि संधान निवारी : ॥ ८८ ॥ आनीवार बाण आले : ते हणुमंतानें देखीले । ध्वजीहुनी मोडीले : पवनपुत्रे ॥ ८९ ॥ द्रोण म्हणे हणुमंता : तुम्ही बाण कां मोडीता : तो म्हणे येकलया पार्था : तुम्ही बहुत वीर : ॥ ९० ॥ यकाते बहुत हाणती : हे नव्हे संग्रामाची रीती : आम्ही देखील बहुती : परी ऐसी रीती नाहीं ॥ ९१ ॥ बाण एती खडतर : वरसती सरधार : पार्थ वरिच्यावर : तोडित असे ॥ ९२ ॥ बाणा पाठी येती बाण : आती तीखट दारुण : आर्जुने बहुत रण : पाडीयले ॥ ९३ ॥ पार्थ नीवारी त्या बाणाते : आणीक संधान केला निरुते : हाणीतीले कनानें : बाण सात : ॥ ९४ ॥

सारथी अनी वारु : त्याचा केला संव्हारु : मूर्छागत कर्णवीरु : पाडि-
येला ॥ ९५ ॥ मग पंडुसुते : हाणीतीले बाणी त्याते : ते बाण द्रोणाते :
लागते जाले : ॥ ९६ ॥ जैसंचि जाले कर्णा : तैसेची जाले द्रोणा : मग
सैन्य आले रणी : कौरवांचे ॥ ९७ ॥ ऐसे ईकडे वर्तले : तव तीकडे भीमे
काए केले ॥ गदेत प्रंजिले : उतरला चरणाचारी ॥ ९८ ॥ पवनगती
धावीनला : कौरवभार मोडीला : तव सात्वीक पावला : मीसळला सैन्याते
॥ ९९ ॥ आच्यार्या अस्वस्थामा मीळुनी : भीम हाणीतीला तीखटे बानी :
तोडुनी पाडिले धरनी : सात्वीकानें ॥ ६०० ॥ कौरव शरधारी वरुसत :
ते सात्वीक तोडीत : भीमाचे वाजती गदाघात : कृपाचार्यावरी ॥ १ ॥
मग द्रोणनंदने : भीम हाणीतीला पाचा बाने : ते शीशुपाळनंदने :
तोडीयले ॥ २ ॥ सैन्ये बहुत संव्हारीले : कौरवदळ भंगले : मग भीमे
टाकीले : गजदळ : ॥ ३ ॥ ते वेळी तो कुंजराचा भारु : संव्हारीतो वर-
कोद्रु : तेथें मार केला थोरु : गजदळाचा : ॥ ४ ॥ हास्तीने हस्ती
हानते : घे घे पुढीलाते म्हणते : ऐसा मार बहुतें : करी वरकोदरु : ॥ ५ ॥
अकासा पोकळी : गज टाकीतीयें वेळी : तो भीम माहाबळी : संव्हारी कुंजरातें
॥ ६ ॥ गजाने गज घोड्याने घोडा : करी रथाचा रगडा : तव देखीला पुडा :
हस्ती आस्वस्थामियाचा ॥ ७ ॥ मग धाउनी वेगउत्तर : पाई धरीला तो
कुंजर : तयाचा केला संव्हार : वरकोदरे : ॥८॥ कुंजर अस्वस्थामा मारीला :
कौरवि हाहाकार केला : भीम गर्जीनला : सींहीनाद ॥ ९ ॥ आस्वस्थामा
मारीला : हा बोल प्रवतला : तव गजर जाला : रणतुरांचा ॥ १० ॥ कौरव-
दळ भंगले : ते पळतें द्रोणापासि गेलें : तेही सांगीतले : अस्वस्थामा वधीला :
॥ ११ ॥ आस्वस्थामा रणी पडिला : हा बोल समस्ति आईकीला : तव
भीमे दुत पाठविला : देवापासि ॥ १२ ॥ ऐसे श्रीकृस्णे आईकीले : मग
संखस्फुरान केलें : रण बंबाळ जाले : तियेवेळी ॥ १३ ॥ अस्वस्थामा
वधीला : वरकोदर वीजया जाला : तुराचा गजर जाला : हा आईकीला
सर्वत्रि ॥ १४ ॥ ते वेळी रुसीकेसी : संचारला द्रोनाचा मानसी : भ्रम
पाडिला त्यासी : तये वेळी ॥ १५ ॥ मग तो जाला भ्रमिस्त : विरा समस्ता
पुसत : आस्वस्थामायासी केला घात : काय भीमसेने : [सोध] ॥ १६ ॥
वीर भंगले होते : द्रोण पुसे त्याते : भीमे अस्वस्थामयाते : काये मारीले :
॥ १७ ॥ ते म्हणती पांडवाची आली गुढी : हे मात आईकीली फुडी :
द्रोणे सेवीली मृतीकेची कुडी : रथाखाली पाडला : ॥ १८ ॥ मग तेथे कर्न
आला : द्रोणासि म्हणता जाला : भीम आस्वस्थामा मारीला : हे सत्ये कि
लटिकें : ॥ १९ ॥ द्रोण धर्मापासि आला : त्यासी पुसता जाला : भीमे
आस्वस्थामा वधीला : हे सत्ये की मिथ्या : ॥ २० ॥ धर्म म्हणे द्रोणा :

आम्ही आईकीले वचना : वधीला आस्वस्थामा जाणा : नर अधवा कुंजर ।। २१ ।। नरो वा आईकीला कानी : कुंजर बोलती जनी : हे न कळे आम्हा लागुनी : मजप्रती ।। २२ ।। सकळ जन परीवारलें : वेगी वैकुंठासी गेले : आनंद पावले : सकळ जण ।। २३ ।। जे जे पढले जुझा : त्याचि होत असे पुजा : करी स्वर्गीचा राजा : इंद्र देखा ।। २४ ।। येथुनी चक्रवीहु जाला : स्रोतांजणी आईकीला : नामा वीष्णुदास बोलीला ।। दास श्रीकृस्णाचा : ।। २५ ।। प्रसंग शाहावा ।। ६ ।। ग्रंथसख्या वोवीया सा सत पंचवीस ।। ६०० ।। २५ ।। ६२५ ।।

बहुधान्येत्सर दीन सुक्रवार लीखीत जाले प्रहार पहीला : मास सुध स्रावण : चर्तुदिन लीखीत जाले देस श्रीवाळ ग्राम नावं गुळवंचे : चक्रवीहु संपला : हस्त अखेर : णी मुणी गोवींदाचे वीले सेवलीकर गेले ठेलें क्षमा करावी : प्रत लीखीत पें मम दोस ण लीपित : वाचीता वीजया होये ।।०।।

# शब्दकोश

## १ कृष्णदासांची बाळक्रीडा

अगळ– कडी, अडसर
अजोग– अयोग्य, उद्धट.
अनारिसें– अपूर्व (सं. अन्यादृश)
अपस्याच– अपसयाच, आपोआप
अंबुज– कमळ
अरळक– अलर्क, एक राजर्षि
अरळी– आरोळी
अवगणी– वेष
अवत्रोनु– अवतरून
असंक्षात– असंख्यात
अस्त्री– स्त्री
आगड– खंदक, हौद
आंगलग– जवळचे, जिव्हाळ्याचे
आंगवणे– पराक्रमानें जिंकणें
आटीव– पिळदार
आटोप– आवेश, पसारा
आतुर्बळी– महाबलाढ्य
आदट– पराक्रमी
आन– अन्य
आपरापरी– वाताहत
आपारणें– कमी करणें, ओसरणें
आभर– तृप्त
आरंबळणें– पोळणें
आरोगणें– जेवणें
आवत्रले– अवतरले
आसुध– रक्त
इडरी– धिरडें
उगळणें– वश होणें
उतटणें– उचंबळणे
उथली– उथळ
उपरवाया– विनाकारण
उपरी– माडी
ऊर्व– मोठें
एकदट– एकदम
एकीसवा– एकत्र
कंचोळे– पूजापात्र
कनव– दया
कविलास– कैलास
काठवट– पीठ मळण्याची परात
कानवडणे– कलंडणें
कामारी– कर्मकार
काशा– दर्भमुळ्या
कास्मीर– फटिक, संगमरवरी दगड
काहाळा– ढोल, नगारा
कुडावा– रक्षण
कुंचा– मोरपिसाचा कुंचला
कुरंगिनी– हरिणी
कुरुळी– चेष्टा
कोडी– कोटी
कोवसा– आधार, आश्रय
कोसी– काळसर
कौसाल्यमल्ल– मसलतचतुर
खरसिंग– एक वाद्य
खीर– दूध
खेताल– भूतप्रकार
खेवण– कोंदण
खोडवे– मडके, भांडे
गळवोशदी– (ओवी १४९) नवसाची औषधी १
गावाल– गव्हार, मूर्ख

गिडीबिडी– एक वाद्य
गिरी– गोसाव्यांची जात
गोमुखी– गाईच्या तोंडासारखें एक वाद्य
गोसा– धनुष्याचें टोंक
गुंब्रगुब्रीया– वाद्यप्रकार
चर्म– चामडें
चाम– चामडें, एक नाणें
चाटु– लाकडाची पळी
चोखाळणें– शुद्ध करणें
चौबार– चौक, चोहटा
जार– ओठावरची कोमल त्वचा
जीउती– एक देवता. तिची प्रतिमा लहान मुलाच्या गळ्यात बांधतात
जेंगट– एक वाद्य
जेठी– मल्ल
जोहार– वंदन
झळकुंबे– झळंबुके, गुच्छ
टमकी– टिमकी
टळमळा– तळमळून
टांग– तंगडी
टोणपे– दांडके
डाग– वस्तु
डांग– फांदी, काठी
डांभा– खुंटा
डावनी– धावनी, उत्तेजन
ढिसाळ– विशाल
तवक– जोर
ताकपीर– ताक पिणारा, ओंगळ
तारफ– वाद्याची तार
तुरंबणें– धारण करणें
तेजी– ( ओवी ८१५ ) तेज युक्त असा अर्थ
तेलोरी– तेलांत तळलेली पुरी
थाप– चपराक
दपटणें– दडपणें
दामोदर– ऐश्वर्यसंपन्न महाल
दुटी– वस्त्र
द्रुंडी– दुडी, घागर
देसवळ– खेडवळ. ओवीचा अर्थ बरोबर लागत नाही.
धनुवाडा– मोठा धनुर्धर
धावणी– धांवाधाव, पाठलाग
धावया– धावा केल्यानें
धुरा– मुख्य
धुरु - ध्रुव
नाथणें– नाश करणें, त्रास देणें
नावनीके– नामवंत
निभ्रांसणें– हाकलणें
निरुतें– खात्रीनें
निर्वाण– सायुज्यप्राप्ती, मोक्ष
पटिया– पट्या ( वाद्यांच्या )
पडखळणें– पडणें, अडखळणें
पडिभरु– अतिशय ( सं–प्रतिभार )
परवडी– तऱ्हा, रांग
परिये– झोका
पवाडा– पराक्रम
पहीत– वरण
पाटसुत– नवार
पाणियेडा– पाणवठा
पातडें– चोपडें
पाबल– किनारा
पाळी– बांध
पिंजण– पिंजण्याचें हत्यार
पीट– पाट
पुंडी– पांढरी
पुंस– पुच्छ
फाफट– फुसकें

बसवा— नंदी, बैल
बहासर— बासर, भटक्या
बहिरावणें— बधिर होणें
बहुडा— निरोप
बहुवस— सर्वज्ञ, व्यापक
बळाधिकर— (ओवी ७३९) बळाचा वापर या अर्थी
बापुला— बाप
बाबरझांटी— अकाळविकाळ
बाहिया— भाईया ?
बाळानी— सज्जा, खिडकी
बोभावणें— ओरडणें
बिदी— रस्त्यांत
बोहरी— नाश
बीद— पदक, चिन्हे
भलतेउतें— पाहिजे तसें
भानवस— भाणोसा, स्वयंपाकघर
भारती— गोसाव्यांची जात
भुरळे— मोह पाडणारे
भोवणें— गिरगिरणे
मठार— हातोडा, हत्यार
मदालसा— अलर्कमाता
मरगज— पाच
माचवे— पलंग, मंचक
मांदळ— मृदंग
मांदाड— समूह
मांदूस— पेटी
मालगंठी— मल्लांची वस्त्र नेसण्याची पद्धत
माळजेठी— माळा घातलेले मल्ल
मालखंड— युद्धभूमि, आखाडा
मालखडा— अजिंक्य मल्ल
मुडप— पागोटे
मुडपघसणी— पागोट्याला पागोटे लागते अशी गर्दी
मृकुट— मुरकुट, चिलट, क्षुद्र पदार्थ
मृड— शंकर
मैराळ— (ओवी २९१) भूतविशेष
मोरी— चित्रविचित्र रंगाची
मोवणे— मापणे
मोहटी— ओसरीचे छपर
मोहर— तुकडी
मोहरी— एक वाद्य
मौंजाल— मुज तृणाचें
येसणा— येवढा
रजक— परीट, धोबी
रवंदळ— तुडवातुडव
रहिवार— रथश्रेष्ठ
राघावळी— निळीनें रंगविलेलें वस्त्र
रातांजन— (ओवी ६७) एक झाड. त्या रंगाचें वस्त्र (रक्त-वर्णाचें)
रिझणें— संतोष पावणें
रोखभरट— पक्का रोख धरून असा अर्थ
रोजन — रुदन
लवडसवडी— तातडीनें
लहुडी— शस्त्र
लाट— ठोकळा, तुळई
लावक— एक पक्षी; हा स्त्रीलंपट असतो. भांडण
वरठा— धोबी
वरपडणे— प्राप्त होणे
वसु— बैल
वसुगळा— वोसंग म्हणजे मांडी यापासून अपभ्रष्ट शब्द
वळणवेश— (ओवी २०) वळणें हेच रुप, असा अर्थ असावा
वळसा— गडबड
वाइणे— वाजविणे

वाड– बलिष्ट
वाणीचे– वाणाचें पाहिजे. नवसाचे
वार्ति– दोरी
वास– वाट
विंचबु– संकट
विंदाण– युक्ति, चातुर्य
वीरगुंठी– वीराला शोभणारी डोक्यारील केसांची गांठ
वेंटी– दोर, तुरा, झूल
वेलाइत– कैवारी
वोचकणें– दचकणें
वोडण– ढाल
वोथरणें– मंदावणें, घाबरणें
वोपं– मुलामा, तेज
वोळग– सेवा, सभा
वोळवणें– वळणें, भरून येणें
शीत– धनुष्याची दोरी
शेषसया– शेषशाई
संदी– सांधा
सभरांभरी– जोरानें
संप्रधार– निश्चय
संमोखणें– समजावणें, टाकमारणें
सही– बरोबर, योग्य
सावचित– सावधान
सिनगार– शृंगार
सिंतरणें– फसविणे
सीक– शिक्षा, रीत
सुगड– कुशल
सुपति– गादी
हडपी– विडा देणारा नोकर
हातफळी– हातोहात
हुडा– बुरुज
क्षपणक– बौद्ध अथवा जैन साधु

## २ विष्णुदास नाम्याची चक्रव्यूह कथा

असिवार– खड्गधारी, घोडेस्वार
असुध– रक्त
आट– वेढा, आडवाट
अस्तुती– स्तुती
आदट– अदट, सामर्थ्यवान्
उजु– सरळ, अनुकुल
कढवंचा– कडेचा
कपाट– दार
कुढावा– कुडावा, रक्षण
केवा– प्रौढी, सामर्थ्य
केशधरणी– मारामारी, (केस धरणें)
कैवाड– कारस्थान
कौसाल्य– कट, गुप्त मसलत
खेर– केर, कचरा
खोचणें– भग्नोत्साह होणें
गुढी– बातमी, ध्वज
गुण– धनुष्याची दोरी
घायवट– घायाळ
घोरांधर– घनघोर
जार– ओठावरची कोमल त्वचा
तिखार– तिखट, झोंबणारे
तुरंद्र– तुरंत ? ताबडतोब (ओवी ३२) 'तुरे' असा शब्द असण्याचाही संभव आहे.
धावनी– उठावण, उत्तेजन
नाभिकार– भिऊ नको असें आश्वासन
नामनीके– नामवंत
नावेक– क्षणभर

९५५८० (८८)

निगुती– आर्तीच, निश्चयानें
निर्धात– दरिद्री
निवाडे– निश्चयानें
निशाण– रणभेरी
न्याहा– शब्द, कल्लोळ
पस्ये– पश्चात् या अर्थी असावें किंवा पस्येमान ( पश्यमाण ) हा एक शब्द असू शकेल
पस्येनीक– पराभूत होऊन
पायवणी– चरणतीर्थ
पापर– लाथ
पालाणणें– सज्ज करणें, बोलावणें
फुडी– खरी
बरवट– चिखल
बांदोडी– तुरुंग
ब्रह्मावो– स्तुतिपाठ
भंगाणी– नाश
भाक– वचन
मकरतोंडी– मगरासारखा पुढचा भाग असलेला
मात, मातु– बोलणे, खबर
मेलिकार– छावणी, जमाव
मोगर– पायदळ

येकवळा– एक ओळ, एक होणे
रणवट– रणातलें स्थान
रहिवर– श्रेष्ठ रथ
रिघु– प्रवेश
वळसण– वळण, प्रदक्षिणा
विंदान– चातुर्य, कारस्थान
वीरनाथ– दुसऱ्या प्रतीवरुन हे कर्णाचें विशेषण दिसतें
वोग्वर– ओहोट
वोज– चांगली रीत, व्यवस्था
वोळगणें– सेवा करणें
सत्राण– जोर
सामध– सन्नद्ध, तयार
सामा– माल, सामान ( मेळावा–पाठ )
सासार्जुन– सहस्रार्जुन
सीत– धनुष्याची दोरी
हुडा– बुरुज, कोट
क्षांति– शांति
क्षाती– ख्याती
क्षेवणी– क्षेपणी, फेक, कांहीं ठिकाणी अक्षोहिणी या अर्थी शब्द वापरलेला वाटतो.

REFBK-0015580

२०५८६० ... २०८८ ... २२।३।६